



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, गुरुवार २५ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# ठाकरे बंधू एकत्र

## मनसे-ठाकरे गटाची अधिकृत घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या अनेक दिवसांपासून राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी असलेली शिवसेना ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची युती अखेर बुधवारी अधिकृतपणे जाहीर झाली. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी वरळी येथील ब्ल्यू सी हाटेलमध्ये संयुक्त पत्रकार परिषद घेउन मनसे-ठाकरे गटाच्या युतीची घोषणा केली. या युतीअंतर्गत दोन्ही पक्ष मुंबईसह राज्यातील काही महानगरपालिकांच्या निवडणुका एकत्र लढवणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.या पत्रकार परिषदेपूर्वी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी शिवतीर्थावरील बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळाचे दर्शन घेतले. यावेळी रश्मी ठाकरे, शर्मिला ठाकरे, आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे यांच्यासह संपूर्ण ठाकरे कुटुंब उपस्थित होते. त्यामुळे या युतीला भावनिक आणि राजकीय दोन्ही अंगांनी विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.



पत्रकार परिषदेत बोलताना राज ठाकरे यांनी शिवसेना-मनसेची युती झाल्याची अधिकृत घोषणा करताना सांगितले की, कोणत्याही वादापेक्षा आणि भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. आपल्या एका मुलाखतीत केलेल्या या वक्तव्यापासूनच दोन्ही पक्ष एकत्र येण्याची प्रक्रिया सुरू झाली, असे त्यांनी नमूद केले. जागावाटपाबाबत सध्या कोणतीही घोषणा केली जाणार नसल्याचे सांगत त्यांनी सध्याच्या राजकीय परिस्थितीवर उपरोधिक टीका केली.

**■ महाराष्ट्रात सध्या लहान मुलं पळवणा-या खूप टोळ्या-** राज ठाकरे

कोण किती जागा लढवणार आकडा काय हे मी तुम्हाला सांगणार नाही, असं म्हणत महाराष्ट्रात सध्या लहान मुलं पळवणा-या खूप टोळ्या फिरत आहेत. त्यामध्ये दोन टोळ्या अजून जास्ती ॲड झालेल्या आहेत. ते राजकीय पक्षांमधली मुलं पळवतात. जे निवडणुका लढवणार आहेत, त्या उमेदवारांना दोन्ही पक्षांकडून उमेदवारी दिली जाणार आहे. योग्य वेळी उमेदवारांचे अर्ज भरण्याबाबत माहिती दिली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच, ज्यांचे महाराष्ट्र आणि मुंबईवर प्रेम आहे, त्यांनी या युतीच्या पाठीशी उभे राहावे, असे आवाहन त्यांनी पत्रकारांमार्फत जनतेला केले. मुंबईचा महापौर हा मराठीच असणार आणि तो आमचाच असणार, असा ठाम विश्वासही राज ठाकरे यांनी व्यक्तकेला. जे काही बाकी बोलायचं आहे ते जाहीर सभा सुरू होतील तेव्हा बोलू.

**■ मराठी माणसानं बलिदान देउन मुंबई महाराष्ट्राला मिळवून दिली-** उद्धव ठाकरे

मुंबई महाराष्ट्रानं मिळवल्यानंतर मुंबईमध्येच मराठी माणसाच्या उरावरती उरे नाचायला लागले. मुंबईचे लचके, मुंबईच्या चिंधड्या उडवायचे मनसुबे त्यावेळेला ज्यांना मुंबई पाहिजे होती, त्यांचे प्रतिनिधी वरती म्हणजेच आता दिल्लीत बसलेले आहेत, त्यांचे मनसुबे आहेत, असंही उद्धव ठाकरे म्हणालेत. आम्ही भांडत राहिलो तर संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील हुतात्म्यांचा अपमान होईल, म्हणून कर्तव्य म्हणून आम्ही एकत्र आलो आहोत, असे उद्धव ठाकरे म्हणाले. आम्ही एकत्र आलो आहोत ते कायम एकत्र राहण्यासाठीच, असे त्यांनी ठामपणे सांगितले. यापुढे मुंबई आणि महाराष्ट्राकडे वाकड्या नजरेने पाहणा-यांचा राजकीय खात्मा केल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. विधानसभेच्या वेळेला भाजपानं जो अपप्रचार केला होता, बटेंगे तो कटेंगे तसंच मी मराठी माणसाला सांगतोय, आता जर का (पान २ वर)

# काँग्रेस आणि वंचितचे फिस्कटले

## महापालिकांमध्ये काँग्रेस आणि वंचित एकत्र नसल्याची घोषणा

**अकोला/प्रतिनिधी :** काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची महापालिका निवडणुकांमध्ये आघाडीवरून फिस्कटले आहे. अकोलासह राज्यात इतर कोणत्याच महापालिकांमध्ये वंचित आणि काँग्रेसचे आघाडी होणार नसल्याचे जाहीर करण्यात आले. वंचितकडून ही घोषणा करण्यात झाल्याने, काँग्रेस राज्यात महापालिका निवडणुकांसाठी एकटी पडली आहे. मुंबई महापालिकेत देखील वंचितला बरोबर घेण्याच्या काँग्रेसच्या मनसुब्यावर पाणी फिरले आहे. वंचित आणि काँग्रेसमध्ये आघाडीचा पहिला प्रस्ताव देण्यावरून वाद पेटला आणि पहले आप, पहले आपमध्ये आघाडीची गाडी सुटून गेली. वंचितचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांनी यावरून काँग्रेसवर निशाणा साधला आहे. मुंबई महापालिकेत ठाकरे बंधूंची युती झाली. तशी अधिकृत घोषणा झाली. तत्पूर्वी बरच राजकीय घडामोडी घडल्या. या युतीपासून काँग्रेसने दूर राहण्याचे ठरविले. मनसेची विचारसरणीशी जुळत नसल्याचे कारण देत, काँग्रेस या युतीपासून लांब राहिले आणि वंचित बहुजन आघाडीबरोबर आघाडी करणार असल्याचे जाहीर केले.

वंचित बहुजन आघाडीबरोबर चर्चा सुरू असल्याचे काँग्रेसकडून सांगण्यात आले. मुंबईसह राज्यातील काही महापालिकांमध्ये आघाडी होईल, असे सांगण्यात आले. विजय वडेट्टीवार यांनी, तर आघाडी होणा-या महापालिकांचे नाव देखील सांगून टाकले. पण आज वंचितकडून आघाडी होणार नसल्याचे सांगण्यात आल्याने काँग्रेसची पुरती कोंडी झाली आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी कालच्या पत्रकार परिषदेत, राज्यात १२ ठिकाणी एकनाथ शिंदे शिवसेना आणि १० ठिकाणी अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसशी आघाडीची चर्चा सुरू आहे, असे सांगितले होते. तसेच भाजप वगळून इतर समविचारी पक्षांची आघाडीची तयारी आहे. पक्षांच्या प्रमुखांनी आघाडी आणि युती, करण्याचे अधिकार पक्षाच्या जिल्हाप्रमुखांना दिले आहेत. त्यानुसार वंचितच्या पदाधिका-यांना देखील दिले आहेत, असेही प्रकाश आंबेडकरांनी स्पष्ट केले.

**पहिला प्रस्ताव कोण देणार, यावरून वाद**

परंतु आघाडी फिस्कटल्याचे प्रकाश आंबेडकरांनी खापर काँग्रेसवर फोडले आहे. तसेच पक्षाचे माजी आमदार नतिकोद्दीन खतीब यांनी, आघाडी पहिला प्रस्ताव प्रस्ताव कोणी द्यावा, यावरून दोन्ही पक्षात ओढाताण होती. पहले आप, पहले आपवरूनच आता दोन्ही पक्षातील आघाडीची चर्चा थांबली. आघाडीबाबत काँग्रेसकडून प्रस्ताव आला नाही. त्यामुळे दिलेला वेळ संपला आणि महापालिकेत काँग्रेससोबत आघाडी होणार नाही असे सांगितले.


# काँग्रेसचे माजी मंत्री सुरूपसिंग हि-या नाईक यांचे निधन

**नंदुरबार/प्रतिनिधी :** काँग्रेसचे भीष्म पितामह माजी मंत्री सुरूपसिंग हि-या नाईक यांचे ८८ व्या वर्षी दुःखद निधन झाले आहे. गांधी परिवाराचा सच्चा सेवक म्हणून त्यांची ओळख होती. इंदिरा गांधींपासून तर राहुल गांधींपर्यंत नाईक कुटुंबांचे घरोब्याचे संबंध आहेत. इंदिरा गांधी यांनी सुरूपसिंग नाईक यांना आदिवासींचा सच्चा सेवक म्हणून गौरवले होते. ते काँग्रेसचे आमदार शिरीषकुमार नाईक यांचे वडील आहेत. गुरुवारी सकाळी ११ च्या सुमारास त्यांच्या गावी नवापूर तालुक्यातील नवागाव येथे अन्त्यसंस्कार करण्यात येणार आहेत. माजी मंत्री सुरूपसिंग नाईक यांचा जन्म १० सप्टेंबर १९३८ रोजी नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यातील नवागाव या लहानशा आदिवासी वस्तीत झाला. त्यांनी शिक्षण घेतले आणि नंतर आपल्या गावी १९६२ साली सरपंच म्हणून निवडून आले. त्यानंतर पंचायत समितीत अपक्ष म्हणून निवडून आले. त्यानंतर त्यांनी कधीही मागे वळून पाहिले नाही. काँग्रेस पक्षात प्रवेश करत संयुक्त असलेला धुळे-नंदुरबार काँग्रेसचे ते सदस्य झाले. तेथे केलेल्या कामामुळे ते सरचिटणीस पदापर्यंत पोहोचले. १९६२ ते १९७२ या काळात त्यांनी जे कार्य केले त्याने त्यांच्या पुढील राजकीय कारकीर्दीसाठी पायाभूत भूमिका बजावली.



# महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात गेल्या काही दिवसांपासून सतत हवामानात बदल होताना दिसून येत असून हवा प्रचंड प्रदूषित असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उपस्थित झाला असून हे प्रकरण कोर्टात पोहोचले आहे. कोर्टाने देखील फटकारे आहे. राज्यातील अनेक भागांमध्ये कडाक्याची थंडी आहे. उत्तरेकडे थंडीचा कडाका वाढत असून राज्यात शीत लहरी येत आहेत. संपूर्ण डिसेंबर महिना थंडी राहणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला. गेल्या दहा वर्षातील सर्वाधिक एक अंकी किमान तापमानाची नोंद झाली. पुण्यात यंदा हुडहुडी वाढली असून डिसेंबर महिन्याने थंडीचे गेल्या दहा वर्षातील सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. डिसेंबरच्या अवघ्या २३ दिवसांत तब्बल तेरा दिवस किमान तापमानाची नोंद एक अंकी झाली आहे. गेल्या दहा वर्षातील हा एक विक्रम ठरला आहे. २०१४ पासूनची आकडेवारी पाहता यंदाचा डिसेंबर सर्वाधिक थंड असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. थंडीसोबतच गारठा प्रचंड आहे. सकाळच्या वेळी मुंबईतही थंडी जाणवत आहे. राज्यातील काही भागात पारा ६ अंशावर पोहोचला आहे. जानेवारी महिन्यातही थंडीची लाट कायम राहणार असल्याचा अंदाज आहे. राज्यात जरी थंडीचा कडाका असला तरीही देशातील अनेक भागात पावसाचा इशारा देण्यात आला. निफाड येथे ५.८ तापमान होते. परभणीत ७.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. नाशिक, (पान २ वर)



# तरूण मुली, सुनांना स्मार्टफोन बंदी;

## ■ १५ गावांचा अजब निर्णय ■

**जालोर//वृत्तसंस्था :** एकीकडे देश डिजिटल क्रांतीकडे वाटचाल करत असताना, राजस्थानच्या जालोर जिल्ह्यातून एक धक्कादायक आणि विचित्र प्रकार समोर आला आहे. १५ गावांमध्ये सुना आणि तरुण मुलींना स्मार्टफोन वापरण्यास बंदी घातली असून त्यांना केवळ कीपॅड फोन वापरण्याचा आदेश दिला आहे. येत्या २६ जानेवारीपासून या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे.



गाजीपूर गावात आयोजित चौधरी समाजाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. १४ पट्टी उपविभागाचे अध्यक्ष सुजनाराम चौधरी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या बैठकीत १५ गावांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या नव्या नियमानुसार, महिलांना केवळ साधे कीपॅड फोन वापरता येतील. विशेष म्हणजे, लग्न समारंभ, सार्वजनिक कार्यक्रम किंवा शेजा-यांच्या घरी जातानाही स्मार्टफोन नेण्यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. एकिकडे या निर्णयावर टीका होत असताना पंचायतीने मात्र याचे समर्थन केले आहे. सुजनाराम चौधरी यांनी त्यामागची भूमिका स्पष्ट केली आहे. घरातील महिला स्मार्टफोन वापरत असताना मुलेही त्याकडे आकर्षित होतात.

## इंडिगोच्या वर्चस्वाला धक्का

# केंद्र सरकारकडून 2 नव्या विमान कंपन्यांना मान्यता

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** लवकरच भारतात नवीन दोन एअरलाईन्स सुरू होणार आहेत. देशातील विमान वाहतूक क्षेत्राला चालना देण्याच्या उद्धेशाने केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारकडून दोन नवीन एअरलाईन्सना आवश्यक परवानग्या देण्यात आल्याची माहिती माहिती नागरी उड्डयन मंत्री राम मोहन नायडू यांनी दिली. अल हिंद एअर आणि फ्लाय एक्सप्रेस अशी या दोन कंपन्यांची नावे आहेत. देशातील सर्वात मोठी एअरलाईन असलेल्या इंडिगोच्या प्रणालीत अलीकडे बिघाड झाला होता. यामुळे संपूर्ण देशाची विमानसेवा विस्कळीत झाली. हजारो प्रवाशांना तासन्तास विमानतळांवर थांबावे लागले, अनेक जण आपल्या गंतव्यस्थानी पोहोचू शकले नाहीत. या घटनेमुळे भारतीय विमानवाहतूक क्षेत्रात मोजक्या कंपन्यांचे वर्चस्व किती धोकादायक ठरू शकते, हे स्पष्ट झाले. या पार्श्वभूमीवर सरकारने हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.



**दोन कंपन्यांचे वर्चस्व कमी करण्याचा प्रयत्न-** सध्या देशांतर्गत विमानप्रवास करणा-या सुमारे ९० टक्के प्रवाशांकडून इंडिगो आणि टाटा समूहाच्या (एअर इंडिया) सेवांचा वापर केला जातो. अशा परिस्थितीत एका मोठ्या एअरलाईनमध्ये अडचण निर्माण झाली, तर संपूर्ण व्यवस्थेवर त्याचा परिणाम होतो. ही जोखीम कमी करण्यासाठी सरकारने नव्या एअरलाईन्सना प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला आहे. मंत्री राम मोहन नायडू यांनी सांगितले (पान २ वर)


# किडनी रॅकेट प्रकरणी मास्टरमाईंड अटकेत

**चंद्रपूर :** प्रतिनिधीकिडनी रॅकेट प्रकरणातील मुख्य सूत्रधाराला चंद्रपूर पोलिसांनी रविवारी रात्रीच्या सुमारास सोलापूर येथून अटक केली. कृष्णा, असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. त्याला सोमवारी न्यायालयात हजर केले असता चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली, अशी माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी मंगळवारी आयोजित पत्र परिषदेत दिली. नागभीड तालुक्यातील मिंथूर येथील ३६ वर्षीय शेतकरी रोशन शिवदास कुळे यांनी सावकारी कर्जाच्या जाचाला कंटाळून आपली किडनी विकल्याचे (पान २ वर)

# पर्यावरणप्रेमींच्या तीव्र विरोधासमोर केंद्र सरकार झुकले

## अरवलीला वाचवण्यासाठी घेतला मोठा निर्णय

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या अरवली पर्वताच्या संरक्षणासाठी केंद्र सरकारने आज अखेर महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केला आहे. सरकारने अरवली पर्वतरांगांमध्ये नव्या खाणकामासाठी परवाने देण्यावर पूर्णपणे बंदी घातली आहे. आता अरवली पर्वतरांगांच्या कुठल्याही भागात खाणकामासाठी नवी परवानगी मिळणार नाही, असे केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने राज्य सरकारांना स्पष्टपणे सांगितले आहे. केंद्र सरकारचा हा निर्णय बेकायदेशीर खाणकाम आणि त्यामधून निर्माण होणा-या माफियांच्या मुळावर घालण्यात आलेला मोठा घाव आहे, असे मानले जात आहे. पर्यावरण आणि सातत्याने घटत चाललेल्या पाण्याच्या पातळीबाबत कुठलीही तडजोड केली जाणार नाही, असे केंद्र सरकारने हा आदेश देताना स्पष्टपणे सांगितले आहे. अरवली पर्वताला एक निरंतर भौगोलिक पर्वतरांग म्हणून वाचवणे हा आज घेण्यात आलेल्या निर्णयामागचा मोठा उद्देश आहे. या पर्वतरांगेची बेकायदेशीर आणि अमर्याद खाणकामामुळे मोठ्या प्रमाणावर हानी झाली आहे. त्यामुळे दिल्ली एनसीआरपासून गुजरातपर्यंत पसरलेली ही पर्वतरांग तुटू नये, या हेतूने केंद्र सरकारने हा निर्णय घेतला आहे.



दरम्यान, आज लागू करण्यात आलेले निर्बंध संपूर्ण अरवली पर्वतरांगेच्या क्षेत्रात समान पद्धतीने लागू होतील, असे सरकारने स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता पर्वतांमध्ये खोदकाम करून नव्या खाणी तयार करण्याची परवानगी मिळणार नाही. सरकारने सध्या सुरू असलेल्या खाणींना त्वरित बंद करण्याची (पान २ वर)




## नववर्ष स्वागत

# हॉटेल्स व आस्थापनांमध्ये तपासणीचे निर्देश

**मुंबई/प्रतिनिधी :** नववर्षाचे आगमन, उत्सव आणि ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर हॉटेल्स, उपाहारगृहे व खाद्य आस्थापनांमध्ये तयार होणारे अन्न स्वच्छ, सुरक्षित व निर्भेळ असणे आवश्यक आहे. यासाठी अन्न सुरक्षा अधिका-यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील रेस्टारंट्स, हाटेल्स आणि खाद्य आस्थापनांची सखोल तपासणी करावी, असे निर्देश अन्न व औषध प्रशासन आणि विशेष सहाय्य विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिले.नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हाटेलमधील स्वच्छतेला विशेष महत्त्व असून यासंदर्भात हाटेल व्यावसायिकांमध्ये जनजागृती व प्रबोधन करावे. तपासणीदरम्यान मुदतबाह्य कच्च्या मालाचा वापर, अन्नपदार्थांमध्ये खाद्य व अखाद्य रंगांचा वापर, तसेच स्वच्छतेच्या निकषांचे पालन होत आहे की नाही, याची काटेकोर तपासणी केली जाईल. यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने राज्यभर मोठी मोहीम हाती घेतली असल्याचे मंत्री झिरवाळ यांनी स्पष्ट केले. उत्तम स्वच्छता व अन्नसुरक्षा मानकांचे पालन करणा-या हाटेल आस्थापनांना प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा व राज्यस्तरावर उत्कृष्ट हाटेल्सना पुरस्कार देण्यात येणार आहेत.

# एमपीएससी परीक्षेच्या उत्तरप्रत्रिकेत आता पाचवा पर्याय

## ● बैठक क्रमांकातही बदल ● 1 मार्च 2026 नंतरच्या परीक्षेसाठी नियम लागू

**पुणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेतल्या जाणा-या विविध वस्तुनिष्ठ बहुपर्यायी परीक्षांच्या उत्तरपत्रिकेत व्यापक बदल करण-यात आले आहेत. यासंदर्भातील अधिकृत प्रसिद्धीपत्रक आयोगाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आले असून, हे नवीन बदल १ मार्च २०२६ नंतर होणा-या सर्व परीक्षांसाठी लागू होणार आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोग उत्तरपत्रिकेत केलेले सर्व सुधारित नियम आणि नवीन उत्तरपत्रिका पद्धत १ मार्च २०२६ पासून आयोजित केल्या जाणा-या सर्व भरती प्रक्रिया आणि परीक्षांसाठी लागू होईल. उमेदवारांना मार्गदर्शनासाठी सविस्तर सूचना उत्तरपत्रिकेच्या दुय्यम प्रतीच्या (कार्बनलेस कॉपी) मागे देण्यात येणार आहेत, असेही आयोगाने स्पष्ट केले आहे. दरम्यान उत्तरपत्रिकेवर विहित ठिकाणी स्वाक्षरी केली नाही. काळ्या बाल पाईंट पेनव्यतिरिक्त इतर पेन वापरणे, उत्तरपत्रिकेवर अनावश्यक चिन्हे किंवा मजकूर लिहिणे, प्रश्नपुस्तिका क्रमांक नमूद न करणे, उत्तरपत्रिकेवरील दफ कोड किंवा टायमिंग ट्रॅक खराब करणे आदी चुका उमेदवारांनी केल्यास त्यांची उत्तरपत्रिका अवैध (पान २ वर)








# राष्ट्र निर्मितीसाठी समाज भावना मनात रुजवा - कुलगुरू डॉ.मिलिंद बारहाते

## कृत्रिम अंगरोपण वाटपाच्या कार्यक्रमाची केली प्रशंसा

**अमरावती/ प्रतिनिधीः-** राष्ट्रासाठी काहीतरी सामाजिक कार्य करण्याची भावना मनामध्ये रुजवावी असे आवाहन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मिलिंद बारहाते यांनी केले. उमेद पंख विश्वासाचे या उपक्रमांतर्गत आयोजित कृत्रिम अंगरोपण वाटपाच्या कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.



श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय येथे उमेद पंख विश्वासाचे या उपक्रमांतर्गत कृत्रिम अवयव वाटपाचा निशुल्क कार्यक्रम गेल्या १८ डिसेंबर पासून सातत्याने राबविण्यात येत आहे. या उपक्रमाची पाहणी करून कुलगुरू यांनी आयोजकांचे कौतुक केले व उपक्रमाची प्रशंसा केली.

'उमेद-पंख-विश्वासाचे' या सामाजिक उद्देशाने दिव्यांग बांधवांसाठी निशुल्क जयपुर फुट वितरणाचा उपक्रम दिनांक १८ ते २७ डिसेंबर या कालावधीत डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय अमरावती, इंडियन रेड क्रॉस सोसायटी अकोला, जयपुर फुट उपक्रमाचे प्रणेते आर्किटेक्ट रामेश्वर मणियार (पुणे) आणि अंबादास खोब्रागडे फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला आहे. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सिनेट सदस्य भैय्यासाहेब मेटकर, डॉ.गणेश पुंडकर,प्रशासकीय अधिकारी डॉ. स्वप्निल मोहोड, जयपुर फुट उपक्रमाचे प्रणेते आर्किटेक्ट रामेश्वर मनियार, दि अंबादास खोब्रागडे आर्ट फाउंडेशनच्या अध्यक्ष आर्टिस्ट रजनी अंबादे, आकाश अंबादे, प्रभजीत सिंह बच्छेर, मानद सचिव, इंडियन रेड क्रॉस सोसायटी, अकोला, कृषी उत्पन्न बाजार समिती अकोलाचे संचालक चंदूभाऊ खेडकर, उमेद-पंख-विश्वासाचे जयपूर फुट वितरण समन्वयक संदिप पुंडकर, माजी जिल्हा विस्तार माध्यम अधिकारी प्रकाश गवळी, डॉ. विनीत कौर, कौन्सिलर, सायकोथेरेपिस्ट, यांची उपस्थिती होती.

आपण राष्ट्राचे देणे लागतो विशेष म्हणजे तरुण पिढीने अशा प्रकारचे सामाजिक कार्यात स्वतःला झोकून द्यावे हा संदेश सर्वांनी घ्यावा असे विचार व्यक्त करून कुलगुरूंनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. यावेळी दि अंबादास खोब्रागडे आर्ट फाउंडेशनचे सचिव आकाश अंबाडे यांनी देखील विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ.ए.टी देशमुख यांनी केले.संचालन किशोर इंगळे यांनी केले.

# मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेबाबत आढावा

**अमरावती/ प्रतिनिधीः-** आगामी सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, आदर्श आचारसंहितेची काटेकोर व प्रभावी अंमलबजावणी करणे तसेच संपूर्ण निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, पारदर्शक आणि निर्भय वातावरणात पार पाडणे या अत्यंत महत्त्वाच्या मुद्द्यांवर बुधवारी, दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी अमरावती महानगरपालिकेतील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात निवडणूक कायदा व सुव्यवस्था आढावा बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी पोलीस आयुक्त राकेश ओला व निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक होत्या. निवडणूक काळात निर्माण होऊ शकणाऱ्या विविध आव्हानांचा आढावा घेत प्रशासन व पोलीस यंत्रणेतील समन्वय अधिक प्रभावी करण्यावर या बैठकीत विशेष भर देण्यात आला.

बैठकीदरम्यान संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रे, निवडणूक प्रचारादरम्यान कायदा व सुव्यवस्थेवर परिणाम होऊ शकणाऱ्या बाबी, मिरवणुका, सभा, रॅली तसेच सोशल मीडियावरील अफवा व गैरप्रचार यावर नियंत्रण ठेवण्यासाठी घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्यांवर तात्काळ व कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश यावेळी देण्यात आले.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी निवडणूक काळात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दल पूर्णतः सज्ज असल्याचे सांगत, प्रतिबंधात्मक कारवाई, गस्त वाढवणे, गुन्हेगारांवर लक्ष ठेवणे व कायद्याचा भंग होणार नाही यासाठी कठोर उपाययोजना राबविण्यात येतील, असे स्पष्ट केले. तसेच नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

या आढावा बैठकीस निवडणूक निर्णय अधिकारी, महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त, पोलीस उपायुक्त, महानगरपालिका उपायुक्त, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, विविध विभागांचे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, पोलीस अधिकारी, निवडणूक प्रक्रियेशी संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## १ व १० वरिल उर्वरित

### ठाकरे बंधू एकत्र

चुकाल तर संपाल, आता जर का फुटाल, तर पूर्णपणे संपून जाल. तुटू नका, फुटू नका, मराठीचा वसा टाकू नका. मराठी माणूस कोणाच्या वाट्याला जात नाही आणि कुणी त्याच्या वाट्याला आलं तर त्याला सोडत नाही. मराठी माणसाने आपला वसा जपावा आणि योग्य निर्णय घ्यावा, असे आवाहन करत त्यांनी आपले भाषण समाप्त केले.या युतीच्या घोषणेमुळे राज्याच्या राजकारणात नव्या समीकरणांना सुरुवात झाली असून, आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या एकत्र येण्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### महाराष्ट्रात मुसळधार पावसाची

जळगाव, नागपूर आणि भंडारा येथे १० अंश तापमानाी नोंद झाली. पुढील काही दिवसही राज्यात गारठा कायम राहण्याचा अंदाज आहे. मुंबईसह पुण्यात वायू प्रदूषण प्रचंड वाढल्याने नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. हवा घातक आहे.***अनेक राज्यांत मुसळधारची शक्यता-*** भारतीय हवामान विभागाने २५, २६ आणि २७ डिसेंबर रोजी देशातील अनेक राज्यांसाठी मुसळधार पावसाचा इशारा जारी केला आहे. हिमाचल प्रदेशमध्ये पुढील २४ तासांत मुसळधार पाउस होण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. जम्मू-कश्मीर, कर्नाटक, उत्तराखंड, लडाख, अंदमान, पुद्दुचेरी आणि कराईकल येथे मुसळधार पावसाची शक्यता आहे. देशातून म?न्सून जाउन काही महिने झाले आहेत. मात्र, तरीही अनेक भागात पाउस सुरू आहे.

### केंद्र सरकारकडून २ नव्या

की, बाजारातील एकाधिकार कमी करून प्रवाशांना अधिक पर्याय देणे हा या निर्णयाचा मुख्य उद्धेश आहे. गेल्या आठवड्यात मंत्रालयाने तीन नव्या विमान कंपन्यांच्या प्रतिनिधींशी बैठकाही घेतल्या आहेत.**टियर-२ आणि टियर-३ शहरांसाठी दिलासा** सरकारच्या उड्डान योजनेअंतर्गत स्टार एअर आणि फलाय९१ यांसारख्या लहान एअरलाईन्स आधीच कार्यरत आहेत. आता अल हिंद एअर, फलाय एक्सप्रेस आणि शंख एअरमुळे टियर-२ आणि टियर-३ शहरांची हवाई जोडणी अधिक मजबूत होण्याची शक्यता आहे. यामुळे प्रवाशांना अधिक पर्याय, स्पर्धात्मक भाडे आणि चांगली सेवा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### किडनी रॅकेट प्रकरणी

प्रकरण उघडकीस आले. अवैध सावकारांच्या कर्जामुळे ते प्रचंड मानसिक तणावात होते. कर्ज फेडण्यासाठी कोणताही मार्ग उरला नसल्याने त्यांनी किडनी विकण्याचा निर्णय घेतला. सोशल मीडियावरून याविषयीची माहिती मिळविली. यातूनच त्यांना कृष्णा नावाच्या प्रोफाईलची ओळख झाली. आरोपीने रोशन यांच्या हतबलतेचा फायदा घेत त्यांना किडनीच्या बदल्यात आठ लाख रुपये देण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर विमानाचे तिकिट आणि इतर कागदपत्रांची पूर्तता करून रोशन यांना कम्बोडियाला नेण्यात आले. कम्बोडियातील एका खासगी रुग्णालयात रोशन यांची किडनी काढण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर त्यांना ठरलेली रक्कम देण्यासाठी आरोपीने टाळाटाळ सुरू केली. केवळ नावापुरते काही पैसे देण्यात आले आणि त्यांना भारतात परत पाठवण्यात आले. पण, भारतात परतल्यावर एका किडनीवर जगताना रोशन यांची प्रकृती खालावली आणि दुसरीकडे सावकारांचा त्रासही कमी झाला नाही. अखेर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी धाडस करून पोलिसांत तक्रार दिली, असेही पोलिस अधीक्षक सुदर्शन म्हणाले. आरोपी कृष्णा याने २०१५ मध्ये एक छोटी कंपनी सुरू केली होती. ७०१८ पासून तो त्या रुग्णालयाच्या संपर्कात होता. आतापर्यंत १० ते १२ लोकांना किडनी काढण्यासाठी त्याने कम्बोडिया येथे नेल्याची माहिती पोलिस तपासातून उघडकीस आली आहे.

### पर्यावरणप्रेमींच्या तीव्र विरोधासमोर

परवानगी दिलेली नाही. मात्र तिथे राज्य सरकारांकडून पर्यावरण विषयक नियमांचं कठोरपणे पालन करून घेतलं जाईल, असेही केंद्र सरकारने स्पष्ट केलं आहे.

आता या मुद्द्यावरून आता राजकीय आरोप प्रत्यारोपांनाही उत आला आहे. काँग्रेसने सरकारच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. सरकार अरवलीची परिभाषा बदलून लोकांची दिशाभूल करत आहे, असा आरोप माजी पर्यावरण मंत्री जयराम रमेश यांनी केला आहे. एकीकडे सरकार खाणकामावर बंदी घालत आहे. मात्र दुसरीकडे सरकारचं धोरण स्पष्ट नसल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे.

### एमपीएससी परीक्षेच्या

ठरवली जाईल, असेही आयोगाने प्रसिध्दीपत्रक नमूद केले आहे.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने प्रसिध्दीपत्रक नमूद केले आहे की, मूळ उत्तरपत्रिका दोन भागांत विभागली जाईल. ती भाग-१ आणि भाग-२ अशी असेल. भाग-१: हा भाग केवळ उमेदवारांना प्रश्नांची उत्तरे नोंदवण्यासाठी असेल. तर भाग-२ : यामध्ये उमेदवाराचे नाव, बैठक क्रमांक, विषय संकेतांक, प्रश्नपत्रिका क्रमांक आणि स्वाक्षरी यांसारखा वैयत्तिक्र तपशील असेल.परीक्षा संपल्यानंतर समवेक्षक उत्तरपत्रिकेतील भाग-१ आणि भाग-२ वेगळे करतील. यामुळे उत्तरपत्रिकेच्या मूल्यमापन प्रक्रियेत अधिक गोपनीयता राखली जाणार असल्याची माहिती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिली आहे. सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे आता उत्तरपत्रिकेवर चार ऐवजी पाच पर्याय असतील. उमेदवाराला एखाद्या प्रश्नाचे उत्तर द्यायचे नसेल, तर त्याला पाचवा पर्याय निवडणे अनिवार्य आहे. प्रत्येक प्रश्नासाठी पाच पैकी एक तरी वर्तुळ छायांकित करणे आवश्यक आहे. उमेदवाराने पाच पैकी एकही वर्तुळ रंगवले नाही, तर त्या प्रश्नासाठी २५% (१/४) गुण वजा केले जातील, असेही आयोगाने स्पष्ट केले आहे.**नेगेटिव्ह मार्किंगचे नियम अधिक कडक-**चुकीचे उत्तर देणे, पाचपैकी एकही पर्याय न निवडणे, एकापेक्षा जास्त वर्तुळे छायांकित करणे, उत्तरामध्ये खाडाखोड किंवा दुरुस्ती करण्याचा प्रयत्न करणे अशा प्रकरणांमध्ये प्रत्येक प्रश्नामागे २५% किंवा १/४ गुण एकूण गुणांमधून वजा केले जाणार आहेत. तसेच गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरी ती तशीच ठेवली जाणार आहे.

### नकली फोन-पेनद्वारे सोनाराला

सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे एलसीबीच्या दोन पथकांनी महाजनपुरा परिसरात सापळा रचला. अंजनगाव सुर्जीकडून परतत असताना उमेर मिर्झा जाफर बेग मिर्झा (वय ३६, रा. सागर नगर) आणि मोहम्मद शोहेब मोहम्मद शकील (वय २६, रा. [illegible]

चौकशीत आरोपींनी नकली फोन-पे ॲपचा वापर करून फसवणूक केल्याची कबुली दिली. आरोपींच्या झडतीत सोन्याची अंगठी, दोन अँड्रॉइड मोबाईल, रोख रक्कम, गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण १,३१,०३४ किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींनी यापूर्वी नागपूर आणि वाशिम जिल्ह्यातही अशाच प्रकारच्या फसवणुका केल्याची कबुली दिली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. अंजनगाव सुर्जी पोलीस, अमरावती शहर गुन्हे शाखा आणि सायबर विभागाच्या संयुक्त प्रयत्नातून ही कारवाई यशस्वी ठरली.

### अमरावती मनपा निवडणूक :

पत्रे उचलली. त्यामुळे दोन दिवसांत उचलण्यात आलेल्या नामांकनांची एकूण संख्या १,८२० झाली आहे.आजच्या दिवशी झोन क्रमांक ६, प्रभाग १६-ड येथून अब्दुल रज्जाक या उमेदवाराने आपले नामांकन दाखल केले. मंगळवार, २३ डिसेंबर रोजी नामांकन प्रक्रियेचा पहिला दिवस होता. त्या दिवशी १,०२६ इच्छुक उमेदवारांनी नामांकन पत्रे उचलली होती. ही प्रक्रिया ३० डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. नामांकन प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी महापालिका प्रशासनाने शहरात ७ झोन कार्यालयांची व्यवस्था केली आहे. सातही झोन कार्यालयांमधून इच्छुक उमेदवारांना नामांकन पत्रे उपलब्ध करून देण्यात येत आहेत. दुसऱ्या दिवशी या सर्व झोन कार्यालयांतून एकूण ७९४ नामांकन पत्रांची उचल झाली असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

### आंतरराज्यीय टोळीतील आरोपी

०३१.८६ ची ऑनलाइन फसवणूक केली. सायबर पोलीस तपासानुसार, ९ नोव्हेंबर २०२५ रोजी फिर्यादी यांच्या व्हॉट्सॲपवर 'पाण्याचे कनेक्शन कापले जाणार' असा बनावट संदेश पाठविण्यात आला होता. त्यानंतर मोबाईल हॅक केला गेला. या हॅकिंगद्वारे झालेल्या ९ व्यवहारांपैकी दोन व्यवहार आरबीएल बँकेच्या क्रेडिट कार्डचा उपयोग करून १,४५,००० आणि १,२०,००० इतकी रक्कम ट्रान्सफर करण्यात आली. या गुन्ह्यातील पहिला आरोपी मृणाल पांडे झारखंड येथून ताब्यात घेण्यात आला. त्याच्या घरातून १० क्रेडिट/डेबिट कार्ड, २ पासबुक, २ चेकबुक, आधार कार्ड झेरॉक्स, २ मोबाईल फोन आणि रोख १४,५०० जप्त करण्यात आले. तर दुसरा आरोपी आशुतोष पांडे यास २४ डिसेंबर रोजी अटक करण्यात आली, आणि त्याच्या ताब्यातून फसवणुकीच्या रकमेपैकी ३९,८०० आणि मोबाईल जप्त करण्यात आला. सदर तपास पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. सायबर पोलीस अधिक तपास करत असून इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

### गाडगेनगर उड्डानपुलाखाली

वाहतूक पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी दाखल होत वाहतूक नियंत्रित केली. पर्यायी मार्गावरून वाहने वळविण्यात आली. त्यानंतर तांत्रिक मदतीने कंटेनर सुरक्षितरित्या काढून मार्ग मोकळा करण्याचे प्रयत्न करण्यात आले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र चालकाच्या निष्काळजीपणामुळे मोठा अपघात टळल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. दरम्यान, संबंधित उड्डाणपुलाखाली जड वाहनांना प्रवेशबंदी असल्याबाबत ठळक सूचना फलक नसल्याने अशा घटना वारंवार घडत असल्याचा संताप नागरिकांनी व्यक्त केला. भविष्यातील धोके टाळण्यासाठी प्रशासनाने योग्य उंचीचे फलक, तसेच कडक अंमलबजावणी करावी, अशी मागणी परिसरातून होत आहे.

### बांगलादेशातील हिंदूंवरील

सूर उमटत आहे. याच पार्श्वभूमीवर यवतमाळ येथील हिंदू संघटनांनी निषेध आंदोलन करून बांगलादेशातील परिस्थितीचा तीव्र शब्दांत निषेध केला.

आंदोलनादरम्यान बोलताना विश्व हिंदू परिषदेचे प्रांत सेवा प्रमुख राम लोखंडे यांनी सांगितले की, बांगलादेशात सत्ता परिवर्तनानंतर हिंदू समाजावर सातत्याने अत्याचार होत असून तेथे हिंदूंच्या जीवित व मालमत्तेचे रक्षण करण्यात शासन अपयशी ठरत आहे. बांगलादेशातील हिंदूंना तात्काळ सुरक्षा पुरवावी, त्यांच्यासाठी स्वतंत्र राज्याची मागणी विचारात घ्यावी, तसेच भारत सरकारने बांगलादेश सरकारवर आंतरराष्ट्रीय दबाव निर्माण करावा, अशी मागणी त्यांनी केली. यासोबतच बांगलादेशशी असलेले राजनैतिक संबंध व आर्थिक देवाण-घेवाण यावर निर्बंध घालण्याचीही मागणी करण्यात आली.

या आंदोलनात सकल हिंदू समाजातील नागरिकांसह मोठ्या संख्येने महिला, विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### आरोग्याला धोका : भेसळयुक्त

डबे शहरात विक्रीला आणल्या जातात. या तेलाची मात्र तपासणी होत नाही. त्यामुळे जनतेचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे सोयाबीन तेलाच्या नावाखाली हा प्रकार सर्रास सुरू असल्याचे बोलल्या जात आहे. अन्न प्रशासन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे तातडीने लक्ष देऊन खाद्यतेलाचे नमुने तपासणी करिता प्रयोगशाळेकडे पाठवण्याची मागणी नागरिक करीत आहे.

### अंजनगाव शहरात दुषित पाणा

उलट्या, जुलाब तसेच संसर्गजन्य आजार पसरण्याची भीती व्यक्त होत आहे.विशेष म्हणजे, शहरातील नागरिक नियमितपणे पाणीपट्टी व कर भरत असतानाही त्यांना मूलभूत सुविधा असलेल्या शुद्ध पाण्यापासून वंचित ठेवले जात आहे. जलशुद्धीकरण केंद्राची योग्य देखभाल न होणे, पाईपलाईनमधील गळती, तसेच गाळ काढण्याकडे होत असलेले दुर्लक्ष हे सर्व जीवन प्राधिकरणाच्या भोंगळ व निष्काळजी कारभाराचे ज्वलंत उदाहरण असल्याची टीका होत आहे.नागरिकांनी अनेकदा तोंडी व लेखी तक्रारी करूनही संबंधित अधिकाऱ्यांकडून फक्त आश्वासनांपलीकडे काहीच झालेले नाही. प्रशासनाची ही उदासीन भूमिका पाहता 'कोणाच्या मृत्यूनंतर कारवाई होणार का?' असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.गढूळ पाणीपुरवठ्यामुळे दैनंदिन जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. स्वयंपाक, पिणे, अंघोळ, कपडे धुणे यासाठी नागरिकांना मोठी कसरत करावी लागत असून अनेकांना पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागत आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक भारही वाढत आहे.

### एम.डी. विक्रीचा पर्दाफाश;

अमरावती) या दोघांना पोलिसांनी मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले. आरोपींच्या झडतीदरम्यान आरोपींकडून ५७ ग्रॅम मॅफेड्रॉन (एम.डी.) पावडर (किंमत अंदाजे ५.७० लाख), ३ मोबाईल फोन (३० हजार), इलेक्ट्रिक वजन काटा (१ हजार) असा एकूण ६,०१,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तपासादरम्यान आरोपींनी ही एम.डी. शेख शहजाद उर्फ गुड्डु तुफान (रा. गौस नगर) आणि शेख शाहरूख शेख नासीर (रा. लालखडी, अमरावती) यांची असल्याची माहिती दिली. हे दोन्ही आरोपी सध्या फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध एन.डी.पी.एस. कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर एम.डी. अमरावती शहरात कुठून आणली गेली व कोणामार्फत पुरवठा करण्यात आला, याबाबत गुन्हे शाखेकडून सखोल तपास सुरू आहे. शहरातील अंमली पदार्थ विक्रेते, वाहतूक करणारे व सेवन करणाऱ्यांविरोधात लवकरच आणखी धडक मोहीम राबविण्यात येणार असल्याचे पोलीस आयुक्तांनी स्पष्ट केले आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गुन्हे शाखेच्या पथकात सहायक पोलिस निरीक्षक महेश इंगोले यांच्यासह अनेक अधिकारी व अंमलदार सहभागी होते.

### जिल्हाभर एकाचवेळी

आली. या ठिकाणी अमली पदार्थांची साठवणूक, निर्मिती किंवा वाहतूक तर होत नाही ना, याबाबत प्रत्येक ठिकाणी सखोल पाहणी करण्यात आली. यासोबतच पोलीस ठाणे स्तरावर बिट अमलदार , पोलीस पाटील आणि ग्रामस्थांना अमली पदार्थविरोधी सतर्कतेचे निर्देश देण्यात आले. त्यांच्या परिसरात संशयास्पद हालचाली, निर्जन ठिकाणी रात्रीच्या वेळी वाहतूक, रसायनांचे ड्रम, प्रयोगशाळेतील साहित्य किंवा संशयास्पद साठवणूक आढळून आल्यास तात्काळ पोलिसांना कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गुप्तचर यंत्रणाही अधिक सतर्क करण्यात आली आहे. अमरावती ग्रामीण पोलीस दल अमली पदार्थांच्या व्यवसायात सहभागी असणाऱ्यांविरुद्ध शून्य सहनशीलतेच्या धोरणाने कठोर कारवाई करण्यास कटिबद्ध असून, अशी शोध मोहीम पुढील काळातही सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे पोलिस अधीक्षक कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, अमली पदार्थमुक्त समाजनिर्मितीसाठी नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन अमरावती ग्रामीण पोलिसांतर्फे करण्यात आले आहे.

### नांदरुन पाथरविरा ग्रामपंचायतच्या

झाले आहे. गतवर्षी नाल्यातील गाळ उपसा करण्यात आला होता. यावर्षी नाल्यातील गाळ उपसा करण्याकडे ग्रामपंचायत प्रशासनाने कानाडोळा केला की काय?त्यामुळे ही समस्या उद्भवली आहे. हा रस्ता गावामधून येण्या जाण्याचा मुख्य रस्ता असल्याने या रस्त्यावर सांडपाणी वाहत असल्याने गावातील नागरिकांना नाईलाजास्तव या घाणपाण्यातून येणे जाणे करावे लागत आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने थोडी जरी तसदी घेतली असती तर ही गंभिर समस्या निर्माण झाली नसती. या रस्त्याची उंची व नाली बांधकाम नव्याने करून मजबुतीकरण करणे आवश्यक आहे. काही वर्षांपूर्वी या रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण झाले. मात्र, अल्पावधितच पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकण्या करिता हा रस्ता उखडून मातीमोल झाला आहे. गावातील मूलभूत समस्या सोडवण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणी गावातील नागरिकांमधून होत आहे.

### 'माझी संकल्पना- सर्वोत्कृष्ट

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,येथे दि.२४ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत अमरावती विभागातील अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ आणि वाशिम या पाच जिल्ह्यातील वय वर्ष १६ ते २४ या वयोगटातील ६३ प्रकारच्या परंपरागत आणि आधुनिक कौशल्य गटातील उमेदवारांनी सहभाग घेतला होता. या विभागीय कौशल्य स्पर्धेत ११४ उमेदवारांची स्कील टेस्ट घेण्यात आली. ही स्पर्धा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील वेगवेगळ्या केंद्रांवर तसेच डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, संत गाडगेबाबा औद्योगिक प्रशिक्षण अमरावती, CADD Info, रेडीयंट हॉस्पीटल येथे आयोजित करण्यात आली होती.

या पात्रता फेरीचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहाते, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांनी केले तसेच या कार्यक्रमास प्र. कुलसचिव डॉ . नितीन कोळी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, उपायुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता ठाकरे, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मार्गदर्शन केंद्र , श्रीमती प्रांजली बारस्कर, संचालक निशांत शिंघल, हेल्थी रिफायनरी प्रायवेट लिमिटेड अमरावती, पुष्कर हाते, संचालक तसेच महाराष्ट्र राज्य प्रमुख, CII, उपसंचालक सुधा ठोंबरे, शासकीय ओद्योगिक प्रशिक्षण संस्था अमरावती, संचालक इनक्युबेशन सेंटर स्वाती शेरेकर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती हे उपस्थित होते. या उद्घाटनिय कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अमोल मोहोड, कौशल्य विकास विभाग यांनी केले.कार्यक्रम प्रसंगी उद्घाटकीय मार्गदर्शनामध्ये कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी सदर उपक्रमाची प्रशंसा करून यामुळे तळागाळातल्या कौशल्यांना व्यासपीठ प्राप्त झाल्याचे समाधान व्यक्त केले. या तसेच अमरावती विभागातील युवकांच्या कौशल्यांना जागतीक स्तरावर नेण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग प्रयत्नशील असून नक्कीच येथील तरूणाईमध्ये ती कौशल्ये असल्याचा विश्वास व्यक्त केला.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कौशल्य विकास विभागीय कार्यालय, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तसेच CII चे पदाधिकारी तसेच इंक्युबेशन सेंटर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी मेहनत घेतली.

धर्मादाय सहआयुक्त कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, दुसरा मजला, गृह निर्माण भवन, मालटेकडी जवळ, अमरावती 444601
जा.क्र.ध.स. आ/अधि/8330/2025 दिनांक : 09/12/2025

**जमीनी विक्रीबाबत जाहीर प्रकटन व आक्षेप मागविणे**

अर्ज क्रमांक ०९३ / कलम ३६ (१) (अ)/ २०२३
श्री. नागेश्वर महादेव संस्थान ट्रस्ट, मुर्तीजापूर, जि. अकोला, नोंदणी क्रमांक ए-२४६ / अकोला

[illegible]

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, २५ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com



# ‘बिस्मिल की महफिल’च्या नावाखाली श्रोत्यांची शुद्ध फसवणूक

## ‘ मैं हुं सुफी ’ चा फार फुसका : लाखोंचा चुना

***अकोला : गेल्या आठवड्यात शनिवारी २० डिसेंबर रोजी शहरात मोठ्या थाटामाटात आयोजित करण्यात आलेल्या ‘बिस्मिल की महफिल – मैं हूँ सुफी’ या गोंडस नावाखाली कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात अकोलेकरांची मोठी आर्थिक फसवणूक झाल्याचा गंभीर आरोप आता प्रेक्षकांकडून पुढे येत आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून सुफी संगीताच्या नावाखाली लाखो रुपयांचा चुना नागरिकांना लागल्याची चर्चा शहरात जोर धरू लागली आहे.***

‘इल्यूजन स्पार्क एंटरटेनमेंट’ या फर्मच्या माध्यमातून २० डिसेंबर रोजी शहराबाहेरील एका बड्या ’ ग्रँड ’ हॉटेलमध्ये हा ’ जलसा ’ आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या प्रचारासाठी मोठ्या प्रमाणावर जाहिरातबाजी करण्यात आली होती. सोशल मीडियावर पोस्टर्स, भव्य मंचरचना, बसण्याची विशेष व्यवस्था, व्हीआयपी, प्लॅटिनम, गोल्ड अशा विविध श्रेणीतील तिकिटांचे आकर्षक पॅकेजेस जाहीर करण्यात आले होते. त्यानुसार आपल्या शहरात प्रथमच एवढ्या मोठ्या उच्च श्रेणीचे आयोजन होत असल्याने रसिक अकोलेकरांनी सुद्धा याला सकारात्मक प्रतिसाद देत मोठ्या प्रमाणात तिकिटांची उच्च दरात सुद्धा खरेदी केली.

यामध्ये प्रथम श्रेणीत असलेल्या टेबल खुर्ची बसण्याच्या व्यवस्थेची १० जणांच्या ग्रुपची तिकिटे तर तब्बल सव्वा लाखाच्या घरात गेली असल्याची माहिती खुद्द तिकीट विकत घेणाऱ्यांनी दिली आहे. मात्र तिकीट घेतेवेळी दिलेल्या एकाही आश्वासनाची पूर्तता आयोजकांकडून करण्यात आली नसून ही तर शुद्ध फसवणूक आयोजन समितीने केली असल्याची ओरड अनेकांनी कार्यक्रम आटोपताच केली. परिणामी प्रेक्षकांच्या घामाच्या कमाईचा चुराडा झाला असल्याचे दिसून येत आहे. तर या कार्यक्रमाच्या आयोजनात आयोजक फर्म सोबत स्पॉन्सर म्हणून जुळलेले व्यावसायिक, ब्रेवरेज पार्टनर,



फूड पार्टनरसह सर्वच मोठ्या प्रमाणात नाराज झाले आहे.

परिणामी, या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, दोषींवर कारवाई करण्यात यावी आणि नागरिकांचे पैसे परत मिळावेत, अशी जोरदार मागणी अकोलेकरांकडून होत आहे. सुफी संगीताच्या पवित्र नावाला काळिमा फासणाऱ्या अशा प्रकारांवर प्रशासनाने वेळीच लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**तिकीट विक्री जोरात, पण व्यवस्थेचा बोजवारा :** कार्यक्रमाच्या तिकिटांची विक्री सुरुवातीपासूनच मोठ्या प्रमाणावर झाली. अनेक प्रेक्षक रसिकांनी महागडी तिकिटे खरेदी केली. मात्र प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या दिवशी आवश्यक त्या सुविधा, आसन व्यवस्था, वेळेचे नियोजन आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कार्यक्रमाची गुणवत्ता यांचा पूर्णतः अभाव दिसून आला.

**अपेक्षेवर पाणी फेरले :** प्रसिद्ध सुफी गायक बिस्मिल यांच्या नावावर तिकिटे विकली गेली असली तरी कार्यक्रम अपेक्षेप्रमाणे सादर न झाल्याने प्रेक्षकांमध्ये तीव्र नाराजी पसरली. दोन तासांच्या कार्यक्रमात सुफी गायक बिस्मिल यांनी केवळ काही मिनिटे सादरीकरण केले आणि त्यानंतर कार्यक्रम गुंडाळण्यात आल्याचा आरोप उपस्थितांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे सुफी संगीताच्या भावविश्वात रमण्याची अपेक्षा घेऊन आलेल्या रसिकांचा मोठा हिरमोड झाला.

**आयोजकांची मौन भूमिका :** कार्यक्रमानंतर नागरिकांनी आयोजकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता समाधानकारक उत्तरे देण्यात आली नसल्याचे सांगितले जात आहे. ना अधिकृत खुलासा, ना दिलासा – अशी आयोजकांची भूमिका संशयास्पद ठरत आहे. त्यामुळे ही केवळ नियोजनातील चूक की मुद्दामहून केलेली आर्थिक फसवणूक, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**पोलिस परवानगीही संशयाच्या भोवऱ्यात ? :** या कार्यक्रमात आयोजकांनी व्हीव्हीआयपी तिकिटे विक्री केलेल्या प्रेक्षकांकरिता खास म्हणून महागडी दारू, फूड ची व्यवस्था बसल्या ठिकाणी टेबलवर केली होती. त्यानुसार कार्यक्रम स्थळी हे सर्व व्यवस्था पोहोचली सुध्दा मात्र आयोजक असलेल्या ‘इल्यूजन स्पार्क एंटरटेनमेंट’च्या टीम कडून ही व्यवस्था अनेक प्रेक्षकांच्या टेबलवर पोहोचलीच नसल्याची ओरड प्रेक्षकांनी केली आहे. आता यामध्ये मात्र या सर्व सुविधा पुरविण्यासाठी आयोजकांनी घेतलेली पोलिस परवानगी ही कोणत्या निकषांचा आधार घेत घेतली आहे हे सुद्धा तपासणे गरजेचे असून ही परवानगीच संशयाच्या भोवऱ्यात अडकली आहे.

# १० महिला ठरविणार शहराच्या विकासाची दिशा

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

येथील नगरपच्यातच्या निवडणुकीत १० महिला आपल्या प्रभागाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. विशेष म्हणजे या १० ही जणी महिला प्रतिनिधी कामकाज पाहणार आहेत त्या राजकारनात नवीन आहेत .

त्यामुळे शहराच्या विकासाची दिशा ठरविण्याचे अधिकार आता महिलांच्या हाती आले असून, आगामी काळात मूलभूत सुविधांसह शहर विकासाच्या अपेक्षा या महिला सदस्यांकडून व्यक्त केल्या जात आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत महिलांना ५० टक्के आरक्षण जाहीर झाल्यानंतर राजकारणात महिलांची संख्या वाढत आहे. शहराच्या राजकारणातून जिल्हा आणि राज्यस्तरावरील राजकारणात जाण्याची संधी यानिमित्ताने महिलांना मिळणार आहे. रविवारी मतमोजणी प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीत नागरिकांनी आपल्या प्रभागाचे प्रतिनिधी निवडले. १७ उमेदवारांच्या गळ्यात विजयाची माळ पडली असून, त्यात १० महिला आहेत.येथील १० महिला नगरसेवकांचा समावेश आहे. त्यामुळे महिला नगरसेवकांकडून नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत.

**या महिलांची पालिकेत एन्ट्री :** प्रभाग क्रमांक १ - सौ.वनमाला प्रेमानंद डाखोरे (काँग्रेस) प्रभाग क्रमांक २- सौ.रज्जू गजानन काळे (शिंदे सेना) प्रभाग क्रमांक ४-शहा मरियमबी शाबीर शहा (काँग्रेस) प्रभाग क्रमांक ६- सविता संजय सारडा ( शिंदे सेना) प्रभाग क्रमांक ७- ज्योती सखाराम सौभागे (काँग्रेस) प्रभाग क्रमांक ८- इंदिराबाई कैलास गुजरे (शिंदे सेना) प्रभाग क्रमांक १०- प्रियंका अभय घुगे (शिंदे सेना) प्रभाग क्रमांक ११-राधा महादेव खवले (शिंदे सेना )प्रभाग क्रमांक १३-राधा दयाराम गायकवाड(शिंदे सेना) प्रभाग क्रमांक १४-सलीमाबी हारून शेख(काँग्रेस) या १० महिला पहिल्यांदाच नगर पंचायत मध्ये नगरसेवका म्हणून येणार आहेत.

# भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार सोहळा कार्यक्रम

## शेतकरी मेळाव्याचे जळगाव येथे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सर्वांचे प्रेरणास्थान असलेले भारताचे पहिले कृषीमंत्री भाऊसाहेब उपाख्य डॉ. पंजाबराव देशमुख यांची १२७ वी जयंती उत्सव व डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, कृषिभूषण, कृषि प्रक्रिया उद्योग पुरस्कार सोहळा, शेतकरी मेळाव्याचे आयोजन २७ डिसेंबर कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव येथे करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. कृष्ण बीर चौधरी राष्ट्रीय अध्यक्ष, भारतीय कृषक समाज नवी दिल्ली, मुख्यअतिथी स्मिता वाघ खासदार, जळगांव पुनित श्रीवास्तव अध्यक्ष, पर्यावरण, वन एवं जलवायु परिवर्तन संवर्धन परिषद (भारत), डॉ. अजयसिंग राजपुत रिजनल डायरेक्टर, सेंट्रल मिनिस्ट्री ऑफ ॲग्रिकल्चर, नागपुर, मनोहर खके एम. एस्सी.ॲग्री(कृषितज्ञ, पुणे) ब्रि. राजाराम यादव डायरेक्टर नॅशनल



को-ऑप. हरियाणा तर प्रमुख मान्यवर यशवंत तळेले (कृषितज्ञ, जळगांव), विनोद पाटील (कुलसचिव, कवियत्रि बहिणाबाई चौधरी विद्यापीठ, जळगांव, मंगेश देशमुख महासंचालक, छत्रपती शिवाजी लोक विद्यापीठ, किरण पटवर्धन सी.ई.ओ., धुळे, महेंद्रसिंग पाटील, अभिषेक, महेंद्र बजाज प्रिती सिंह, ॲड. अजित तेवतिया, चित्रलेखा मोहंती ओडिसा, पुजा गेरा महिला अध्यक्षा, डॉ. प्रशांत भैस उपस्थितीत संपन्न होणार असुन महाराष्ट्रातील उत्कृष्ट नाविन्यपूर्ण काम करणाऱ्यांना डॉ. भाऊसाहेब उपाख्य पंजाबराव देशमुख कृषिरत्न, कृषी भुषण, कृषी प्रक्रिया उद्योग पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. जयंती उत्सव डॉ. सुभाष नलांगे अध्यक्ष महाराष्ट्र राज्य, ज्योती सुरसे प्रभारी यांचे मार्गदर्शनात आयोजित करण्यात आला आहे. स्वाती बोरीकर महिला अध्यक्षा महिला उपाध्यक्षा, किरण देशमुख, रुपाली गायकवाड महिला उपाध्यक्षा, विजय संतान, मनोज वानखेडे, संदीप नाईक कार्याध्यक्ष, रावसाहेब पाटील, स्वागताध्यक्ष प्रविण पाटील जिल्हाध्यक्ष, जळगांव यशस्वीतेसाठी प्रयत्नशील आहे. डॉ. पंजाबराव भाऊसाहेब देशमुख यांचे १२७व्या जयंती उत्सवाला भारतीय कृषक समाजाचे राज्यातील शेतकरी, महिला व युवा मोठ्या संख्येने उपस्थित राहाण्याचे आवाहन दिलीप कव्हर वाशीम जिल्हा अध्यक्ष यांनी केले आहे.

# आज वंचितच्या वतीने स्त्रीमुक्ती दिन व मनुस्मृती दहन दिनाचे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर, राष्ट्रीय अध्यक्ष वंचित बहुजन आघाडी यांच्या आदेशानुसार वंचित बहुजन महिला आघाडीच्या वतीने आज दरवर्षी २५ डिसेंबर हा स्त्रीमुक्ती दिन म्हणून साजरा करण्यात येतो. याच अनुषंगाने वंचित बहुजन महिला आघाडी जिल्हा वाशिम यांच्या वतीने स्त्रीमुक्ती दिन व मनुस्मृती दहन दिन साजरा करण्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.**

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्योतीताई मिलिंद इंगळे, जिल्हाध्यक्ष वंचित बहुजन महिला आघाडी, वाशिम राहणार आहेत. कार्यक्रमासाठी प्रा. जयश्री भिसे राजस्थान आर्य कॉलेज वाशिम, किरणताई गिर्हे राज्य सदस्य, वंचित बहुजन महिला आघाडी, प्रा. रंगनाथ धांडे जिल्हा महासचिव, डॉ. तुषार गायकवाड वाशिम–मंगरूळपीर विधानसभा समन्वयक, ?ड. प्रा. मुकुंद वानखेडे जिल्हा कोषाध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत.कार्यक्रमास सूर्यकांत गायकवाड जिल्हाध्यक्ष, युवा आघाडी, प्रा. मिलिंद इंगळे प्रियदर्शनी ज्युनिअर




कॉलेज, आसेगाव पेन यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.याशिवाय वंचित बहुजन आघाडी, महिला आघाडी, युवा आघाडी व भारतीय बौद्ध महासभेचे पुढील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत :सोनाजी इंगळे माजी जिल्हा महासचिव, वाशिम, गिरिधर शेजुळ जिल्हा उपाध्यक्ष, महेश तिडके तालुकाध्यक्ष, रिसोड, दिलीप भगत तालुकाध्यक्ष, विनोद भगत जिल्हा सचिव, संदीप सावळे जिल्हा प्रवक्ते, सारनाथ अवचार तालुकाध्यक्ष, मालेगाव, बाळू खंडारे जिल्हा उपाध्यक्ष, नरेंद्र राऊत तालुकाध्यक्ष, मंगरूळपीर, भारत भगत तालुकाध्यक्ष, कारंजा, अमोल पखाले शहर अध्यक्ष मालेगाव, शालिग्राम पठाडे उपाध्यक्ष, भारतीय बौद्ध महासभा, संस्कार विभाग.,महिला आघाडी व भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने प्रतिभाताई अंभोरे जिल्हा महासचिव, महिला आघाडी, मंदाताई धांडे जिल्हा उपाध्यक्ष, प्रतिभाताई मडामे जिल्हा उपाध्यक्ष, प्रमिलाताई शेवाळे माजी जिल्हाध्यक्ष, महिला आघाडी, संध्याताई पंडित जिल्हाध्यक्ष, भारतीय बौद्ध महासभा महिला,मायाताई अंभोरे तालुकाध्यक्ष, रिसोड, विमलताई सावळे तालुकाध्यक्ष, वाशिम), वंदनाताई गायकवाड(तालुकाध्यक्ष, मालेगाव, मिलनताई बनसोड भारतीय बौद्ध महासभा, सुनिता खाडे, ज्योती पवार, जया भालेराव यांचीही उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांचे हक्क, स्त्री–पुरुष समानता, संविधानिक मूल्ये, सामाजिक न्याय व मनुवादी व्यवस्थेविरोधातील संघर्ष यावर प्रबोधन करण्यात येणार असून स्त्रीमुक्तीच्या लढ्याला बळ देण्याचा संकल्प करण्यात येणार आहे. तरी वाशिम जिल्ह्यातील सर्व जिल्हा, तालुका व शहर पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला भगिनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने आज दुपारी २ वाजता आनंद बुद्ध विहार, आनंदवाडी, अकोला नाका, वाशिमउपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे सीईओ अर्पित चौहान यांच्या हस्ते थाटात विमोचन




■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतसंस्था, वाशिम यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या नवीन दिनदर्शिकेचे विमोचन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पीत चव्हाण साहेब यांच्या शुभहस्ते नुकतेच करण्यात आले. या कार्यक्रमास उपशिक्षणाधिकारी डाबेराव, बिरादार साहेब यांची प्रमुख उपस्थिती लाभली.या दिनदर्शिकेच्या माध्यमातून शिक्षक सहकारी पतसंस्थेने राबविलेल्या विविध उपक्रम, योजना व आर्थिक सुविधा यांची सविस्तर माहिती सभासदांपर्यंत पोहोचणार असून, शिक्षक सभासदांना दैनंदिन कामकाजात तसेच आर्थिक नियोजनात याचा मोठा उपयोग होणार आहे. तसेच, या दिनदर्शिकेमुळे शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे नियोजन अधिक प्रभावीपणे करण्यासही सहाय्य मिळणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

दिनदर्शिकेच्या विमोचनप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पीत चव्हाण यांनी पतसंस्थेच्या कार्यपद्धतीची माहिती घेतली. पतसंस्थेच्या माध्यमातून शिक्षक वर्गासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे कौतुक करताना, संस्थेच्या आर्थिक प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले. शिक्षकांच्या हितासाठी पतसंस्थेने केलेले कार्य आदर्शवत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमास पतसंस्थेचे अध्यक्ष विजय मनवर, उपाध्यक्ष राजुभाऊ मते, संचालक रा. सू. इंगळे, तसेच मंचकराव तायडे, सतिश सांगळे, सतिश घुगे, अजयकुमार कटके, तज्ञ संचालक मधुकर महाले, राहुल इंगोले, संदीपराव सानप यांच्यासह अनेक मान्यवर व सभासद उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या या दिनदर्शिकेमुळे सभासदांना उपयुक्त माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असून, संस्थेच्या कार्याला नवी दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# वाचन संस्कृतीला नवी दिशा देणारा जिल्हा ग्रंथालयाचा अभिनव उपक्रम

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्राम गृहाच्या पाठीमागे, सिव्हिल लाईन कडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर सुसज्ज जिल्हा ग्रंथालय आहे. जिल्हा ग्रंथालयात जवळपास ६० हजार पुस्तके उपलब्ध आहेत. (https://eg4.nic.in/OPAC/Default.aspx?CL_NAME=DOLMH) या लिंकवर क्लिक केल्यास वाशिम जिल्हा निवड करून ग्रंथालयात असलेल्या पुस्तकाची यादी बघता येते. जिल्ह्यामध्ये वाचन संस्कृतीस चालना मिळावी यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील आहे.

वाचन संस्कृतीचा प्रसार, ज्ञानवृद्धी आणि समाजाच्या बौद्धिक विकासासाठी ग्रंथालये ही अत्यंत महत्त्वाची केंद्रे आहेत. बदलत्या काळात वाचकांच्या आवडी-निवडी, अभ्यासाच्या गरजा आणि ज्ञानाच्या क्षेत्रात होणारे नवनवीन बदल लक्षात घेऊन ग्रंथसंपदा अद्ययावत करता येते. या उद्देशाने वाचकांकडून त्यांच्या अवाडीच्या पुस्तकांना सुचविण्याचा नविन उपक्रम राबविण्यात येत आहे.जिल्हा ग्रंथालयामध्ये वरील यादिव्यतिरिक्त वाशिम जिल्ह्यातील रसिक वाचकांची आवडीची, उपयुक्त व प्रेरणादायी पुस्तके अजून जास्त संख्येने उपलब्ध करून देण्याचा जिल्हा प्रशासनाचा मानस आहे. तरी या गूगल फॉर्मद्वारे जिल्ह्यातील साहित्यप्रेमी नागरिक, विद्यार्थी तसेच सर्व वयोगटातील वाचकांनी त्यांना अपेक्षित असणारी दर्जेदार पुस्तके सुचवावीत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. ज्या पुस्तकांसाठी जास्त वाचकांची पसंती असेल आणि शासकीय निकषानुसार शक्य असेल अशी जास्तीत जास्त नवीन पुस्तके उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल.

**ग्रंथालयासाठी पुस्तक प्रस्तावासाठी**

(https://tinyurl.com/washimlibrary) या लिंक वर क्लिक करुन किंवा सोबत दिलेला Code स्कॅन करुन देखील पुस्तकाचे नाव नोंदविता येईल. हा गुगलफॉर्म ग्रंथालयासाठी वाचकांकडून पुस्तकांच्या सूचना / प्रस्ताव गोळा करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

# जिल्हा न्यायालयातील बढतीचा सन्मान

## रेखा सोनटक्के यांचा गौरवपूर्ण सत्कार

■ प्रतिनिधी | कारंजा ■

वाशीम जिल्हा न्यायालयात अधीक्षकपदी बढती मिळाल्याबद्दल रेखा गोविंदराव चिमणकर (सौ. रेखा मधुकरराव सोनटक्के) यांचा कारंजा येथील चर्मकार समाजबांधवांच्या वतीने गौरवपूर्ण सत्कार करण्यात आला. त्यांच्या निवासस्थानी शाल व पुष्पगुच्छ देऊन हा सत्कार संपन्न झाला. न्यायालयीन प्रशासनात दीर्घ काळ प्रामाणिकपणे बजावलेल्या सेवेला मिळालेली ही बढती समाजासाठी अभिमानाची बाब असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. रेखा सोनटक्के यांची कारकीर्द ही कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि सातत्यपूर्ण परिश्रमांचे प्रतीक असल्याचे मत समाजबांधवांनी व्यक्त केले.

सत्काराला उत्तर देताना सौ. सोनटक्के यांनी समाजबांधवांनी दाखविलेल्या प्रेम, विश्वास व सन्मानाबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त केली. भविष्यातही न्यायालयीन कामकाजात अधिक जबाबदारीने सेवा देण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# सीए विद्यार्थ्यांच्या ‘अर्थशा’ या दोन दिवसीय परिषदेस प्रतिसाद

■ प्रतिनिधी | अकोला ■

दि इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया अंतर्गत विकासा अकोला शाखेद्वारे सीए स्टुडंट्स कॉन्फरन्स ‘अर्थशा’ या दोन दिवसीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या परिषदेत सीए विद्यार्थ्यांना तांत्रिक तसेच व्यावसायिक दृष्टिकोनातून मोलाचे मार्गदर्शन मिळाले.परिषदेची सुरुवात उद्घाटन सत्राने झाली.

उद्घाटनपर भाषणात विकासा अध्यक्ष सीए प्रतीक मंत्री यांनी सीए विद्यार्थ्यांसाठी अशा परिषदांचे महत्त्व स्पष्ट करत आर्टिफिशियल इंटेलिजन्स, स्टार्ट-अप, फॉरेन्सिक ऑडिट, म्युच्युअल फंड्स व कॅपिटल मार्केट्स यांसारख्या विषयांवरील सत्रे विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी कशी उपयुक्त ठरतात, हे सांगितले.यावेळी परिषदेचे प्रमुख पाहुणे पोलीस अधीक्षक आर्चित चांडक होते.त्यांनी विद्यार्थ्यांना अत्यंत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. अभ्यासात वेळेचे व्यवस्थापन किती महत्त्वाचे आहे यावर त्यांनी भर दिला तसेच



अपयशाने खचून न जाता सातत्याने प्रयत्न करण्याचा संदेश दिला.उद्घाटन सत्रात विकासा,डब्लूआयसीएएसए अध्यक्ष सीए जितेंद्र सगलानी, अकोला शाखा अध्यक्ष सीए धीरज चांडक,विकासा अकोला उपाध्यक्ष राज इसाल व सचिव नीरव मुरारका उपस्थित होते. तसेच अकोला शाखेचे माजी अध्यक्ष सीए बी.एम. अग्रवाल, सीए आर.एम. गुप्ता, सीए रमेश चौधरी, सीए प्रफुल्ल संघवी, सीए संजय कोटक व सीए दीपक अग्रवाल यांनी कार्यक्रमास विशेष प्रोत्साहन दिले.प्रथम दिन सत्रात कॅपिटल मार्केट्स वर सीए जितेंद्र सगलानी, लाईफ मॅनेजमेंटवर स्वामी कृष्णदास,

ए टू झेड ऑफ म्युच्युअल फंड्स वर सीए कृष्णा मोहता यांनी उद्बोधन केले.द्वितीय दिनी स्टार्ट-अप जर्नी, आयडिया ते इम्पॅक्ट वर सीए हेमराज जोशी,फॉरेन्सिक ऑडिटवर सीए नेहा फडके, कोषाध्यक्ष, पुणे शाखा,डब्लूआयसीएएसए, आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर सीए रश्मी राधिका यांनी उद्बोधन केले.संपूर्ण दोन दिवसीय परिषद विकासा अध्यक्ष सीए प्रतीक मंत्री, मुख्य समन्वयक सीए धवल कोटक, उपाध्यक्ष राज इसाल, सचिव नीरव मुरारका, माहेक भाटिया व वैष्णवी लाहोटी यांच्या सक्षम नेतृत्वाखाली यशस्वीरीत्या पार पडली. तसेच अकोला शाखा डब्लूआयसीएएसएचे अध्यक्ष सीए धीरज चांडक, उपाध्यक्ष सीए रोमिल सोजातिया, सचिव सीए श्याम महेश्वरी व कोषाध्यक्ष सीए विशाल राजपाल यांच्या मार्गदर्शनामुळे कार्यक्रम अधिक प्रभावी ठरला.परिषदेसाठी तांत्रिक सत्रांचे अध्यक्ष म्हणून सीए हेमंत अग्रवाल, सीए शिवम रांदड, सीए तेजस चांडक, सीए आशीष अग्रवाल व सीए विशाल राजपाल यांनी दिलेल्या मार्गदर्शनाबद्दल विशेष आभार व्यक्त करण्यात आले.दोन्ही दिवसांचे संचालन महेक भाटिया, वैष्णवी लाहोटी, निधी जैन व रिया वखारिया यांनी प्रभावीपणे केले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३० ■ गुरुवार, २५ डिसेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## सत्ता, पैसा, यंत्रणा असूनही भाजपचा वर्ध्यात सपशेल पराभव

# एक खासदार सहा नगरपालिका जिंकतो...

# पालकमंत्री-पाच आमदार फक्त तीनवरच थांबतात

**वर्धा । रवींद्र लाखे :** वर्धा जिल्ह्यातील २०२५ च्या नगरपरिषद निवडणुकीने भाजपच्या राजकीय ताकदीचा फुगा जोरात फुटला आहे. सत्तेचा माज, पदांचा डौल आणि यंत्रणेचा गैरवापर असूनही भाजपला जिल्ह्यात नामुष्कीजनक पराभव स्वीकारावा लागला आहे. २०१६ मध्ये तत्कालीन खासदार रामदास तडस यांच्या नेतृत्वाखाली सहाही नगरपालिका भाजपच्या ताब्यात होत्या. मात्र नऊ वर्षांनंतर पालकमंत्री पंकज भोयर, तब्बल पाच आमदार, सत्ताधारी पक्षाचा वरचष्मा असूनही भाजप फक्त तीन नगरपालिकांवरच ताबा ठेवू शकला. उर्वरित तीन नगरपालिका काँग्रेस आणि अपक्षांनी खेचून नेल्या.

**वर्धा-देवळी-पुलगाव भाजपच्या हातातून निसटले**

-नगरसेवक असूनही सत्ता नाही; हे कसले नेतृत्व?

वर्धा जिल्ह्यातील वर्धा, देवळी, पुलगाव, आर्वी, हिंगणघाट आणि सिंदी या सहा नगरपालिकांपैकी वर्धा, देवळी आणि पुलगाव येथे भाजपचा पूर्णपणे फज्जा उडाला. काही ठिकाणी नगरसेवक निवडून आले, ढोल-ताशे वाजले, पण शेवटी नगराध्यक्ष पद हातातून गेल्याने सत्ता काँग्रेस व अपक्षांच्या झोळीत पडली. म्हणजे भाजपकडे संख्याबळ असूनही निर्णयक्षमता आणि नेतृत्व पूर्णपणे अपयशी ठरले.

**आमदार नसतानाही रणजीत कांबळेंचा 'दणका'**

-२०१६ ची कसर २०२५ मध्ये भरून काढली

२०१६ मध्ये जिल्ह्यात काँग्रेसकडे केवळ एकच आमदार होता आणि एकही नगरपालिका त्यांच्या ताब्यात नव्हती. पण २०२५ मध्ये चित्र पूर्णपणे उलटले. आमदार नसतानाही रणजीत कांबळे यांनी वर्धा आणि पुलगाव या दोन महत्त्वाच्या नगरपालिकांवर काँग्रेसचा झेंडा फडकावला. देवळी येथे अपक्ष नगराध्यक्ष निवडून आल्याने भाजपचा आणखी एक गड कोसळला. ही बाब भाजपच्या नेत्यांसाठी आत्मपरीक्षणाची घंटा असायला हवी.

**हिंगणघाट-सिंदी वाचवले, आर्वीत कसाबसा जीवदान**



हिंगणघाट येथे आमदार समीर कुणावार यांच्या विधानसभा क्षेत्रात दोन नगरपालिका येतात त्यांच्या प्रयत्नांमुळे दोन्हीही नगरपालिका ताब्यात घेतल्या यात हिंगणघाट भाजपच्या नयना तुळसकर नगराध्यक्ष झाल्या, तर सिंदी (रेल्वे) येथे राणी कलोडे यांनी भाजपचा चेहरा वाचवला. आर्वी नगरपालिकेत विधान परिषद व विधानसभेचे दोन आमदार असूनही भाजपला अतिशय अटीतटीचा विजय मिळवावा लागला. म्हणजेच ताकद असूनही पक्षाची पकड सैल झाल्याचे हे जिवंत उदाहरण आहे.

याउलट देवळीचे आमदार राजेश बकाने यांची कामगिरी या निवडणुकीत पूर्णपणे कुचकामी ठरली. देवळी आणि पुलगाव या दोन्ही नगरपालिका त्यांच्या मतदारसंघात असूनही दोन्ही ठिकाणी भाजप सत्ता गमावतो, याला काय म्हणायचे? पक्षाच्या अपयशाचे हे सर्वांत ठळक उदाहरण ठरत आहे.

**पालकमंत्र्यांचा गड कोसळला; भाजपची नाचक्की**

-वर्धा काँग्रेसकडे, भोयर यांच्यावर थेट आरोप

वर्धा नगरपालिका हा पालकमंत्री पंकज भोयर यांचा बालेकिल्ला मानला जात होता. मात्र याच ठिकाणी काँग्रेसचे सुधीर पांगुळ यांनी स्पष्ट मताधिक्याने विजय मिळवून पालकमंत्र्यांची राजकीय हवा काढून टाकली. सत्ता, पैसा आणि यंत्रणा असूनही स्वतःच्या प्रभावक्षेत्रात पराभव म्हणजे नेतृत्वाची नामुष्की नव्हे तर काय?

**सात हजारांचा राजकीय उलटफेर : सत्तेला जोरदार धक्का**

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत पंकज भोयर हे सात हजार मतांनी विजयी झाले. पण अवघ्या वर्षभरातच नगरपालिकेच्या लढतीत सत्तेचा फुगा फुटला. अध्यक्षपदासाठी उतरलेले त्यांचे निकटवर्ती निलेश किटे यांना याच सात हजार मतांनी पराभव पत्करावा लागला. आमदारकीला विजय, नगरपालिकेत नामुष्की हा योगायोग नसून मतदारांचा ठळक इशारा आहे. विधानसभा जिंकली, पण स्थानिक सत्ता हातातून निसटली.


**२०१६ विरुद्ध २०२५ : भाजपची घसरण उघड**

-नगरसेवक जिंकले, पण सत्तेची चावी हरवली

राजकीय विश्लेषकांच्या मते भाजप वर्ध्यात संपलेला नसला तरी नेतृत्वाच्या पातळीवर मोठे अपयश उघडे पडले आहे. नगरसेवक निवडून येतात, पण सत्ता मिळत नाही, हे संघटनात्मक अपयशाचे स्पष्ट लक्षण आहे. काँग्रेस आणि अपक्षांनी परिस्थितीचा पुरेपूर फायदा घेत आपली ताकद वाढवली आहे. या पराभवाचे खापर शेवटी पालकमंत्री पंकज भोयर आणि निष्क्रिय आमदारांवरच फुटणार, हे आता अटळ आहे.

## रेती फुकट पण खिसा रिकामा : भराई वाहतूक खर्चाने घरकुलधारकांची कोंडी

**वडनेर । जनमाध्यम :** घरकुलच्या लाभार्थ्यांचे पक्क्या घराचे स्वप्न साकार करण्यासाठी शासनाने 'मोफत रेती' देण्याचे धोरण जाहीर केले खरे; मात्र प्रत्यक्षात हीच मोफत रेती आता लाभार्थ्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे. रेती फुकट असली, तरी घाटातून उचल, मजुरांची भराई आणि अवजड वाहनांचा वाहतूक खर्च इतका जादा आहे की, आधीच आर्थिक अडचणीत असलेले घरकुलधारक मेटाकुटीस आले आहेत. परिणामी घरकुलच्या लाभार्थ्यांमध्ये तीव्र रोष उसळू लागला आहे.



हिंगणघाट तालुका येथे घरकुलच्या लाभार्थ्यांसाठी काही रेती घाट राखीव ठेवण्यात आले असून कापसी येथील वर्धा नदी घाटावरून २३ डिसेंबरपासून मोफत रेती देण्यास सुरुवात झाली आहे. अल्लीपूर, सिरसगाव, कानगाव सर्कलमधील घरकुल लाभार्थी रितसर परवानगी घेऊन रेती उचलत आहेत. मात्र शासनाकडून 'फुकट' मिळणारी रेती प्रत्यक्षात घाटावर पोहोचताच महाग पडत असल्याचे वास्तव समोर आले आहे.

### शासनाच्या धोरणातून दलाल वाहतूकदारांची चांदी'-लाभार्थ्यांचा संताप

घाटावर रेती भरण्यासाठी मजूर जादा मजुरी मागत आहेत, तर वाहतुकीसाठी टिप्पर, ट्रॅक्टर चालकांनी मनमानी भाडेवाढ केल्याने लाभार्थ्यांवर आर्थिक भूर्दंड बसत आहे. घरकुल आमच्यासाठी आहे की वाहतूकदारांसाठी? असा प्रश्न आता लाभार्थ्यांकडून केला जात आहे. शासनाच्या धोरणामुळे रेती वाहतूक करणाऱ्यांची चांगलीच चांदी होत असताना, घरकुलच्या लाभार्थ्यांच्या अडचणीत मात्र भरच पडली आहे.

घरकुलचे लाभार्थी आधीच आर्थिकदृष्ट्या कमकुवत असतात. त्यातच भराई व वाहतुकीचा खर्च परवडणारा नसल्याने अनेक लाभार्थी रेती उचलण्यास असमर्थ ठरत आहेत. त्यामुळे धोरण चांगले, अंमलबजावणी ढिसाळ अशी तीव्र भावना व्यक्त होत आहे. शासनाने नियमांमध्ये बदल करून भराई व वाहतूक खर्चाबाबत दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

प्रति लाभार्थी ५ ब्रास रेती शासनाच्या धोरणानुसार प्रत्येक घरकुल लाभार्थ्याला घर बांधकामासाठी ५ ब्रास रेती नि:शुल्क दिली जाते. यापूर्वी जप्त केलेली रेती डेपोमधून दिली जात असताना भराईचा खर्च नव्हता; केवळ वाहतुकीचा खर्च लाभार्थ्यांना करावा लागत होता. मात्र आता घाटातून थेट रेती उचलताना भराई वाहतूक या दुहेरी खर्चाने लाभार्थ्यांची कोंडी झाली आहे. वर्धा नदीच्या कापसी घाटातून घरकुल लाभार्थ्यांना रेती नि:शुल्क दिली जात आहे. मात्र भराई व वाहतुकीचा खर्च लाभार्थ्यांनाच करावा लागेल. यापूर्वी जप्त रेती डेपोतून जेसीबीच्या मदतीने भरून दिली जात होती; पण रेती घाटावर नियमांनुसार जेसीबी वापरता येत नाही, योगेश शिंदे, तहसीलदार, हिंगणघाट

## बांग्लादेशातील हिंदूंना न्याय द्या

### वर्ध्यात विहिप, बजरंग दलचे शांततामय आंदोलन

**वर्धा जनमाध्यम :** बांग्लादेशमध्ये अल्पसंख्यांक हिंदू समाजावर होत असलेल्या हिंसाचाराच्या घटनांचा तीव्र निषेध व्यक्त करण्यासाठी विश्व हिंदू परिषद (विहिप) व बजरंग दल यांच्या संयुक्त विद्यमाने वर्धा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मंगळवारी शांततापूर्ण आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात विविध हिंदू संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी आंदोलकांनी बांग्लादेशातील हिंदूंवर होत असलेल्या अत्याचारांचा निषेध करत जोरदार घोषणाबाजी केली. आंतरराष्ट्रीय पातळीवर या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन पीडित हिंदूंना तातडीने न्याय मिळवून द्यावा, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली. या आंदोलनात विहिप शरद कोनप्रतिवार, अरविंद कोकाटे,



मुन्ना यादव, बजरंग दल जिल्हा संयोजक महेश राऊत, अमोल अतकर, अंबुज पांडे, प्रशांत यादव, चेतन लड्ढा, किरण उपाध्याय, दुर्गावाहिनी जिल्हा संयोजिका पूनम भोयर, अश्विनी ठाकूर, नगर संयोजिका स्वाती दोडके यांच्यासह अतुल देशपांडे, रविकांत बडवाई, मोनू तिवारी, प्रथम यादव, गोविंद पांडे, यश पांडे, कुणाल भोयर, मयूर जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते. जागतिक समुदायाने बांग्लादेशातील हिंदूंवरील हिंसाचार थांबवण्यासाठी कठोर पावले उचलावीत, अशी मागणी केली. करण्यात आलेले आंदोलन पूर्णतः शांततेत पार पडले.

## आज क्रिसमस डे (नाताळ)



प्रेम, शांती आणि करुणेचा संदेश घेऊन नाताळ उजाडतो. दिव्यांच्या उजेडात आशेचा नवा किरण चमकतो. प्रभू येशूंच्या जन्माने मानवतेला विश्वास मिळतो, तर लहानग्यांच्या हास्यातून खरा आनंद उमटतो.

**फोटो : राहूल तेलरांधे, वर्धा**

## वर्ध्यात तीन दिवसीय विदर्भ-राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा

### -अतुल तराळे यांची पत्रकार परिषदेत माहिती

**वर्धा जनमाध्यम :** सहयोग शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने स्व. प्रदीप महाजन आणि स्व. वसंत कोकाटे यांच्या स्मृतीसाठी आयोजित विदर्भ-राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा २६ ते २८ डिसेंबर दरम्यान वर्धा येथील जुने आरटीओ मैदानात होणार आहे.

कार्याध्यक्ष अतुल तराळे यांनी आज पत्रकार परिषदेत माहिती दिली. स्पर्धेत विदर्भातील पुरुष १३ आणि महिला १० संघ सहभागी होतील. राष्ट्रीय पंच अधिकारी म्हणून ५० तज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत, तर स्पर्धेसाठी १०० कार्यकर्ते सहकार्य करीत आहेत.

उद्घाटन सोहळा शुक्रवार २६ डिसेंबर सायंकाळी ६ वाजता होईल. खेळाडूंच्या निवासाची सोय शिववैभव मंगल कार्यालय, बॅचलर रोड येथे करण्यात आली आहे. पुरुष विभागात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावर अनुक्रमे ३१,०००, २१,००० आणि ११,००० रुपयांचे पारितोषिक मिळणार आहे. महिला विभागात ही रक्कम अनुक्रमे २१,०००, १५,००० आणि ७,००० रुपये आहे.





प्रत्येक सामन्यातील उत्कृष्ट खेळाडूला सामनावीर पुरस्कार, अंतिम सामन्यातील उत्कृष्ट आक्रमक, संरक्षक आणि अष्टपैलू खेळाडूला मालीकावीर पुरस्कार दिला जाईल.

स्पर्धेत नागपूर, अमरावती, अकोला, यवतमाळ, चंद्रपूर आणि वर्धा येथील २३ संघांनी नोंदणी केली आहे. समारोप सोहळा रविवार २८ डिसेंबर सायंकाळी होईल. तराळे यांनी सांगितले की, सन १९८५ पासून येथे खो-खो सराव सुरू आहे आणि यावर्षी ही ८ वी बॅच आहे. या सरावातून खेळाडूंना पोलिस विभागासह विविध खेळ कोट्यांमधून नोकरीच्या संधीही मिळाल्या आहेत.

### रामनगर पोलिसांची कारवाई

## अवैध दारू वाहतुकीचा पर्दाफाश, चारचाकीसह २.५२ लाखांचा मुद्देमाल जप्त



**वर्धा । जनमाध्यम :** अवैध दारू व्यवसायावर आळा घालण्यासाठी रामनगर पोलिसांनी प्रभावी कारवाई करत मोठा धक्का दिला आहे. रामनगर पोलीस ठाणे हद्दीत करण्यात आलेल्या या कारवाईत देशी व विदेशी दारूचा मोठा साठा जप्त करण्यात आला असून चारचाकी वाहनासह एकूण २ लाख ५२ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. या प्रकरणी संबंधित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रामनगर परिसरात नियमित पेट्रोलिंग सुरू असताना पोलिसांना एक संशयास्पद चारचाकी वाहन आढळून आले. वाहनाच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी तत्काळ ते थांबवून तपासणी केली. वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये अवैधरीत्या वाहतूक केली जात असलेली विविध कंपन्यांची देशी तसेच विदेशी दारू मोठ्या प्रमाणात आढळून आली. पंचनामा करून संपूर्ण दारूचा साठा पोलिसांनी जप्त केला.

या कारवाईत वापरण्यात आलेले एमएच ३४ के ००१३ क्रमांकाचे चारचाकी वाहनही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. जप्त दारू व वाहनाची एकूण किंमत २,५२,३०० रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली रामनगर पोलीस स्टेशन येथील पोलीस निरीक्षक अजय भुसारी यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. राजेश साहू, सुरज राठोड, भुषन दांडेकर, प्रशांत साहू आदी कर्मचाऱ्यांनी या मोहिमेत सहभाग घेतला. अवैध दारूविरोधात पुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### शासकीय कागदपत्रांचा खेळखंडोबा

## ब्राह्मणकरने दिली १०० हून अधिक बोगस ९०-दिवसांची प्रमाणपत्रे

-रामनगर पोलिसांचा तपास वेगात; जीएलओ कार्यालयास धडक पत्र

-'बनवाबनवीला आशीर्वाद कुणाचा? मोठ्या साखळीचा संशय

**वर्धा । जनमाध्यम :** वर्ध्यात शासकीय यंत्रणेलाच हादरवून सोडणारा बनावट प्रमाणपत्रांचा घोटाळा उघडकीस आला आहे. कंत्राटदार मोहन रामाजी ब्राह्मणकर याने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी गवंडी कामगारांना नियमबाह्य ९० दिवसांच्या कामाची १०० हून अधिक बोगस प्रमाणपत्रे दिल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. शासकीय कागदपत्रांमध्ये खोडतोड, खोटी नावे व चुकीची पदनामे वापरून फसवणूक केल्याप्रकरणी रामनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असून, तपासात धक्कादायक बाबी समोर येण्याची दाट शक्यता आहे.

तपासात असे निष्पन्न झाले की ब्राह्मणकर याच्या नावाने दाखविण्यात आलेले नोंदणी प्रमाणपत्र (क्र. २१५३००२३१००००९४०२) हे १८ फेब्रुवारी २०२५ रोजी नागपूर येथील अपर कामगार आयुक्त कार्यालयातून निर्गमित झाल्याचे भासवण्यात आले. मात्र, सरकारी कामगार अधिकारी (जीएलओ) कार्यालयाच्या सखोल चौकशीत हे प्रमाणपत्र पूर्णतः बनावट असल्याचे स्पष्ट झाले. प्रमाणपत्रावर अस्तित्वात नसलेले नाव, चुकीचे पद व अधिकार नसलेली सही आढळून आल्याने प्रकरणाने गंभीर वळण घेतले.

या प्रकाराचे गांभीर्य ओळखून नागपूर येथील सहाय्यक कामगार अधिकारी (उ.सू.) लोया यांनी थेट फौजदारी कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार ११ नोव्हेंबर २०२५ रोजी आवश्यक पुरावे संलग्न करून रामनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. मात्र, काही काळ हे प्रकरण थंड बस्त्यात असल्याचे चित्र दिसून आले. 'जनमाध्यम'ने बनवाबनवीला आशीर्वाद कुणाचा? या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध करताच प्रशासन खडबडून जागे झाले.

त्यानंतर रामनगर पोलिसांनी तक्रारीच्या अनुषंगाने जीएलओ कार्यालयास अधिकृत पत्र पाठवून कागदपत्रांची पूर्तता, नोंदी व जबाब नोंदविण्याची प्रक्रिया सुरू केल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे. तपास पुढे जात असताना लाभार्थी कामगारांची अचूक संख्या, बनावट प्रमाणपत्रांचा वापर कुठे झाला, आणि या गैरप्रकाराला कुणाचा पाठिंबा होता याचा पर्दाफाश होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

हा घोटाळा केवळ एका कंत्राटदारापुरता मर्यादित नसून, मोठ्या साखळीची दारे उघडणारा असल्याची चर्चा आहे. पोलिस तपास वेग घेत असल्याने आर्थिक गैरव्यवहार, अधिकारांचा गैरवापर आणि शासकीय यंत्रणेतल्या ढिलाईवरही बोट ठेवले जाणार आहे. येत्या काही दिवसांत धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दाखल तक्रारीच्या अनुषंगाने रामनगर पोलिसांचे पत्र सरकारी कामगार अधिकारी कार्यालयास प्राप्त झाले आहे. मी स्वतः बुधवार, ३१ रोजी रामनगर पोलिस ठाण्यात जाऊन सहकार्य करणार आहे.

**-सीमा शिंदे,** सरकारी कामगार अधिकारी, वर्धा

### अडेगाव गेटला अखेर हिरवा कंदील

## शनिवारपासून बोरची जंगल सफारी पुन्हा खुली

**वर्धा । जनमाध्यम :** वन्यजीव पर्यटनाचे वैभव ठरलेल्या बोर व्याघ्र प्रकल्प येथील अडेगाव गेट अखेर पर्यटकांसाठी खुले होणार आहे. मान्सूननंतरही विविध कारणांमुळे बंद ठेवण्यात आलेल्या या गेटला २४ डिसेंबर रोजी उपसंचालकांनी प्रत्यक्ष पाहणी करून हिरवा कंदील दिला असून, शनिवार २७ डिसेंबर पासून अडेगाव गेटमधून जंगल सफारी सुरू होणार आहे. त्यामुळे पर्यटकांसह स्थानिक पर्यटन व्यवसायिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

मान्सून संपल्यानंतर बोरधरण येथील प्रवेशद्वार खुले करण्यात आले होते; मात्र अडेगाव गेट हा बोर धरणाच्या बॅकवॉटर पर्यटन रस्त्यावर येत असल्याने १ ऑक्टोबरपासून हा मार्ग बंद करण्यात आला होता. परिणामी अडेगाव परिसरातून येणाऱ्या पर्यटकांना जंगल सफारीसाठी पर्यायी मार्गांचा वापर करावा लागत होता. यामुळे अडेगाव गेट पुन्हा कधी खुले होणार, याबाबत संभ्रम निर्माण झाला होता.

दरम्यान, २४ डिसेंबर रोजी बोर व्याघ्र प्रकल्पाचे उपसंचालक मंगेश ठेंगडी यांनी बोरधरण येथील वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांसह पर्यायी वन पर्यटन मार्गाची सखोल पाहणी केली. पाहणीनंतर हा मार्ग सुरक्षित व नियमसंगत असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर अडेगाव गेट जंगल पर्यटनासाठी पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे आता पर्यटकांना अडेगाव गेटमधून थेट जंगल सफारीचा अनुभव घेता येणार आहे.

सुमारे १३ हजार ८०० हेक्टर कोअर क्षेत्र आणि ६७ हजार ८१४.४६ हेक्टर बफर क्षेत्र असलेला बोर व्याघ्र प्रकल्प जैवविविधतेने नटलेला आहे. बफर क्षेत्राचे एकसंघ नियंत्रण वन्यजीव विभागाकडे आल्याने संवर्धन व पर्यटन या दोन्ही आघाड्यांवर प्रकल्प अधिक सक्षम झाला आहे. या प्रकल्पाला आतापर्यंत सिने क्षेत्रातील मान्यवर, विविध व्हीव्हीआयपी तसेच देश-विदेशातील पर्यटकांनी भेटी देत जंगल सफारीचा आनंद घेतला आहे.

## निरोगी समाजासाठी स्नेह-सदाचार आवश्यक

### पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल

-भितीवर मात करायची असल्यास विश्वास निर्माण करा

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा शहरात राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन सहज दिसते, असे वर्धा जिल्हा पोलीस अधिक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी सांगितले. महात्मा गांधी व आचार्य विनोबा भावे यांच्या विचारांचा प्रभाव सर्वांवर असल्यामुळे हे शहर सर्वधर्मांची पंढरी ठरले आहे.

पोलीस अधीक्षक अग्रवाल म्हणाले की, भिती व अविश्वासाच्या वातावरणात एकमेकांवर विश्वास निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे. विश्वासातून माणसे जवळ येतात, भिती कमी होते आणि समाजात शांतता व सहिष्णुता वाढते. त्यांनी स्पष्ट केले की, निरोगी समाजासाठी आपुलकी, कर्तव्यनिष्ठा, सकारात्मक दृष्टी, स्नेह व सदाचार आवश्यक आहेत.

हे मत त्यांनी पोलीस अधिक्षक कार्यालयात सामाजिक कार्यकर्त्यांच्या सादिच्छा भेटीत सत्कार स्वीकारताना व्यक्त केले. या वेळी प्रमुख उपस्थितीत साहित्यकार इमरान राही, सत्याश्रम मंडळाचे अध्यक्ष विजय सत्यम, शास्त्री सोशल फोरमचे राजू लभाणे, गोदावरी मोहिते संस्थेचे प्रा. मोहन मोहिते, आणि लॉयन्स कराटे असोसिएशनचे उल्हास वाघ उपस्थित होते.

## मनोरमा डाखोळे यांचे निधन



**वर्धा जनमाध्यम :** स्थानिक रामनगर येथील रहिवासी मनोरमा जानरावजी डाखोळे (वय ९५) यांचे बुधवार (दि. २४ डिसेंबर) पहाटे ३ वाजता दु:खद निधन झाले. त्या स्व. जानराव डाखोळे, माजी सभापती नगरपरिषद यांच्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
paper www.janmadhyam.com

# नगरपरिषदा, नगरपंचायतीच्या थेट निवडून आलेल्या अध्यक्षास सदस्यत्व, मताचाही अधिकार

## अधिनियमातील सुधारणेसाठी अध्यादेश काढणार

**मुंबई/प्रतिनिधी :** नगरपरिषदा, नगरपंचायतीमध्ये थेट निवडून आलेल्या अध्यक्षास सदस्यत्व आणि मताचा अधिकार देण्यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करण्यासाठी अध्यादेश काढण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

नगरपरिषदा आणि नगरपंचायतींचा सदस्य म्हणून निवडून येण्यास पात्र असलेली व्यक्ती अध्यक्ष म्हणून निवडून येण्यास पात्र असते. त्यामुळे एखादी व्यक्ती अध्यक्ष म्हणून आणि त्याचवेळी सदस्य म्हणून निवडून येउ शकते आणि दोन्ही पदावरही निवडून येउ शकते. अशा व्यक्तीला दोन्ही पदांसाठी जनादेश मिळालेला असतो. म्हणूनच सदस्यांमधून अध्यक्ष म्हणून निवडून आलेली व्यक्ती सदस्य राहते आणि त्याचबरोबर अध्यक्ष व सदस्य म्हणूनही काम करते. थेट निवडून आलेल्या आणि सदस्यांमधून निवडून आलेल्या अध्यक्षास जनादेश असतोच. त्यामुळे या सुधारणेनुसार आता अध्यक्ष म्हणून थेट निवडून आलेली व्यक्ती आणि सदस्य म्हणून थेट निवडून आलेली व्यक्ती एकाचवेळी दोन्ही पदे धारण करू शकते, अशी सुधारणा करण्यात येणार आहे. तसेच अध्यक्षाला सदस्य म्हणून एक मत देण्याचा अधिकार मिळणार आहे. अशा व्यक्तीला अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून एक मत देण्याचा अधिकार असेल आणि मतांची बरोबरी झाल्यास, अध्यक्षाला निर्णायक मत देण्याचा अधिकार राहणार आहे, अशी सुधारणा या अधिनियमात केली जाणार आहे. त्याबाबतचा अध्यादेश काढण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली.

## राज्यातील २९१ आरोग्य सेविकांच्या नियुक्त्या नियमित होणार

राज्यातील जिल्हा परिषदांतर्गत आरोग्य विभागामध्ये कार्यरत व सेवानिवृत्त झालेल्या बंधपत्रित २९१ आरोग्य सेविकांच्या नियुक्त्या नियमित करण्याबाबत विभागीय आयुक्तांना अधिकार देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयानुसार जिल्हा परिषदांतर्गत आरोग्य सेवक (महिला) यांची पदे ही सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित संचालक, आरोग्य सेवा संचालनालयामार्फत शासकीय परिचर्या महाविद्यालयातून प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांमधून दोन वर्षाच्या कालावधीसाठी भरण्यात येत असत. हा कालावधी संपल्यानंतर या उमेदवारांना कार्यमुक्त केले जात असे. त्यानंतर संबंधित जिल्ह्यातील रुग्णसेवेची निकड व जिल्ह्यातील रिक्त पदांची स्थिती लक्षात घेता त्यांना ११ महिन्यांची अस्थायी नियुक्ती देण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना होते. विभागीय आयुक्तांचा हा अधिकार २०१८ मध्ये रद्द करण्यात आला होता. मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार आता राज्यातील जिल्हा परिषदेअंतर्गत आरोग्य विभागात १५ एप्रिल २०१५ पूर्वी नियुक्त झालेल्या तसेच सेवानिवृत्त झालेल्या व सध्या कार्यरत अशा २९१ बंधपत्रित आरोग्य सेविका यांच्या सेवा नियमित करण्याबाबतचे अधिकार विभागीय आयुक्त यांना देण्यात आला आहे.




## ग्राम, तालुका, जिल्हा प्रशासनाच्या सक्षमीकरणासाठी कर्मयोगी 2.0 आणि सरपंच संवाद कार्यक्रम

ग्राम, तालुका व जिल्हा स्तरावर विकासाभिमुख कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी राज्यात जिल्हा कर्मयोगी कार्यक्रम २.० व राज्यातील सरपंचांच्या क्षमता विकसित करण्यासाठी सरपंच संवाद कार्यक्रम राबविण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. हे दोन्ही कार्यक्रम मित्रा संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येतील.

जिल्हा कर्मयोगी २.० कार्यक्रम गाव, तालुका व जिल्हा अशा स्तरांवर राबविण्यात येईल. यात सेवा देणा-या थेट संबंधित अधिका-यांपासून ते स्थानिक प्रशासनातील शेवटच्या टप्प्यातील अधिकारी, कर्मचारी यांचे कौशल्य वाढविण्यात येणार आहे. यातून जिल्ह्याचा जीडीपी वाढविण्याकरिता सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग औद्योगिक युनिट्स, तसेच शेतकरी उत्पादक संघटना -एफपीओज् यांसारख्या कृषी - संबंधित आर्थिक घटकांना भेडसावणा-या समस्या दूर करण्यावर भर दिला जाणार आहे. जिल्हा स्तरावर शासन-ते-व्यवसाय सेवा सुधारणेवर भर दिला जाईल. विविध विभागांमधील सहकार्य वाढवून डेटा संकलन, समन्वय आणि निर्णय प्रक्रियेमधील सहभागाला प्रोत्साहन दिले जाईल. थेट लोकांमध्ये जाउन काम करणारे अधिकारी कृषी अधिकारी, कनिष्ठ अभियंता व कार्यकारी अभियंता, ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक, बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी, सिंचन कालवा निरीक्षक, जिल्हा व सहाय्यक सांख्यिकी अधिकारी तसेच सांख्यिकी निरीक्षक व अन्वेषक इत्यादींचे सक्षमीकरण केले जाईल. राज्यातील सुमारे ८५ हजार अधिका-यांना प्रशिक्षण देण्यात येईल.सरपंच संवाद कार्यक्रमासाठी भारतीय गुणवत्ता परिषद (क्यूसीआय) मित्रा आणि व्हीएसटीफ फाउंडेशन यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार झाला आहे. त्यानुसार राज्यातील सुमारे २० हजार सरपंचांना प्रशिक्षण दिले जाणे अपेक्षित आहे.या प्रशिक्षणात प्रामुख्याने आर्थिक स्वायत्तता व संसाधन, शासन योजना राबविणे, ग्रामपंचायतींना सक्षम करण्यासाठीचे दूरगामी नियोजन, महिला सदस्यांचे सक्षमीकरण, अंमलबजावणीतील त्रुटी शोधणे व त्यावर मात करणे, तसेच विविध गटांसाठी समावेशक व सुसंगत प्रशिक्षणाचा समावेश असेल.

## लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यासाठी धाराशिवमध्ये जागा

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे यांचा पुतळा उभारण्यासाठी धाराशिव नगरपरिषदेला शहरातील दुग्धव्यवसाय विकास विभागाची एक एकर जागा देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. धाराशिव नगरपरिषदेकडून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाउ साठे यांचा पुतळा उभारण्यात येणार आहे. या पुतळ्यासाठी जमीन मिळावी अशी मागणी लोकप्रतिनिधी, विविध संघटनांनी शासनाकडे केली होती. त्यानुसार धाराशिव शहरातील सर्व्हे क्र.४२६ येथील शासकीय दूध शीतकरण केंद्राची एक एकर जमीन विनामूल्य उपलब्ध करून देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

## अकोल्याला विमान पायलट प्रशिक्षण; केंद्राची मंजुरी

**अकोला/प्रतिनिधी :** अकोल्याच्या विकासात मोलाची भर घालणा-या विमान पायलट प्रशिक्षण केंद्राला अखेर मंजुरी मिळाली असून, या महत्त्वपूर्ण यशाचे श्रेय खासदार अनुप धोत्रे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला जाते.अकोला ही आधीच शिक्षणाचे केंद्र म्हणून ओळखली



जाते या प्रशिक्षण केंद्रामुळे अकोल्याची शैक्षणिक ओळख अधिक भक्कम झाली आहे.आता या विमान पायलट प्रशिक्षण केंद्रामुळे अकोल्याच्या नावाला राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळणार असल्याचा विाास खासदार धोत्रे यांनी व्यक्त केला आहे.हे पायलट प्रशिक्षण केंद्र येत्या चार महिन्यांत सुरू होणार असून, केंद्र सरकारने संबंधित संस्थेला अधिकृत मंजुरी दिली आहे. यामुळे पश्चिम विदर्भातील युवकांसाठी ही एक सुवर्णसंधी ठरणार आहे. अकोल्यातील विद्यार्थ्यांना पायलट प्रशिक्षणासाठी मुंबई, चेन्नईसारख्या महानगरांमध्ये जाण्याची गरज भासणार नाही, आणि स्थानिक पातळीवरच उच्च दर्जाचे शिक्षण उपलब्ध होणार आहे.या प्रकल्पासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भूमी अधिग्रहणाचे काम सुरू केले असून, जिल्हाधिकारी वर्षा मीना यांची यासंदर्भात नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच आवश्यक निधी उपलब्ध करून देत अकोल्यातील हवाई पट्टी व विमानसेवा सुरू करण्याच्या दृष्टीने सरकारने महत्त्वपूर्ण पाउल उचलले आहे. हे पायलट प्रशिक्षण केंद्र म्हणजे अकोल्याच्या विकासाला नवी दिशा देणारी नववर्षाची मोठी भेट असून, रोजगार, शिक्षण आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या पूजेची 26 पासून ऑनलाईन नोंदणी

**सोलापूर/प्रतिनिधी :** श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या नित्यपूजा, पाद्यपूजा, तुळशी अर्चन पूजा, महानैवेद्य सहभाग योजना इत्यादी सर्व प्रकारच्या पूजा श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतात. दि. १ जानेवारी ते ३१ मार्च २०२६ या कालावधीतील पूजांची ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करण्याची सुरुवात दि. २६ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून होत असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. याबाबत मंदिर समितीच्या नुकत्याच



झालेल्या सभेत निर्णय घेण्यात आला होता. यासाठी संगणकप्रणाली विकसित करण्यात आली आहे. भाविकांना पूजेची नोंदणी मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून करता येणार आहे. यापूर्वी चार टप्प्यांत राज्याच्या विविध कानाकोपऱ्यातून व देशभरातून कर्नाटक, आसाम, आंध्र प्रदेश इत्यादी राज्यातील भाविकांनी पूजेची नोंदणी केली होती. यास भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आता, पाचव्या टप्प्यात दि. १ जानेवारी ते ३१ मार्च, २०२६ या कालावधीतील सण, उत्सव व गर्दीचे दिवस वगळून इतर दिवशीच्या श्रींच्या नित्यपूजा, पाद्यपूजा व महानैवेद्य सहभाग योजना तसेच दि. १ ते ३१ जानेवारी, २०२६ कालावधीतील तुळशी अर्चन पूजा ऑनलाईन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ऑनलाईन नोंदणीसाठी काही अडचणी आल्यास मंदिर समितीच्या नित्योपचार कार्यालयातून नोंदणी करून देण्यास मदत व आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात येईल. पूजेचे बुकिंग मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरूनच करावे कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीस संपर्क करू नये असे आवाहन कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी यावेळी सांगितले.

## सोने-चांदीच्या दराने मोडले सर्व रेकार्ड

**मुंबई/प्रतिनिधी :**जळगाव सराफा बाजारात एकाच दिवशी चांदीमध्ये १२,००० रुपयांची सुसाट वाढ दिसून आली. ग्राहकांनी सकाळी सकाळी गर्दी



केली. पण भाव पाहताच अनेकांची बोबडी वळाली. आतापर्यंतचे सर्व रेकार्ड चांदीने मोडले आहेत. जळगावातील सराफा बाजारात चांदीच्या दरात पुन्हा विक्रमी वाढ झाली आहे. गेल्या २४ तासांत चांदीच्या दरात तब्बल १२ हजार रुपयांची वाढ झाली आहे. चांदीचे दर जीएसटीसह २ लाख २८ हजार ६६० रुपयांच्या ऐतिहासिक विक्रमी उच्चांकावर पोहोचले. सोन्याच्या दरात देखील ७०० रुपयांची वाढ झाली. जीएसटीसह सोन्याचे दर १ लाख ४० हजार ८०१ रुपयांच्या विक्रमी उच्चांकीवर पोहोचले. सोन्या आणि चांदीच्या दरात सलग तिसऱ्या दिवशी दरवाढ सुरूच आहे. या दरवाढीने ऐन थंडीत ग्राहक घामाघूम झाले आहेत. या वर्षात सोने आणि चांदीच्या किमतीत चढ-उतार दिसून आले. नवीन वर्षाच्या सुरुवातीला सोने अजून रेकार्ड मोडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. देशातील बाजारात २४ डिसेंबर रोजी २४ कॅरेट सोन्याचा भाव जवळपास ३८० रुपयांनी वधारला. सोने प्रति १० ग्रॅम १,३८,९३० रुपयांवर आले आहे. काल हाच भाव प्रति १० ग्रॅम १,३८,५५० रुपये इतका आहे. चांदीत तर बम्पर वाढ झाली आहे. एका किलोमागे चांदीच्या दरात १० हजारांची वाढ झाली आहे. एक किलो चांदीचा भाव २,३३,००० रुपये आहे.

## दाट धुक्यामुळे हवाई, रेल्वे प्रवास विस्कळीत; दिल्लीत २० विमान उड्डाणे रद्द

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**पूर्व आणि उत्तर भारतातील बहुतांश भागांना बुधवारी तीव्र थंडीचा फटका बसला. राजधानी दिल्लीमध्ये दाट धुके आणि अत्यंत कमी दृश्यतेमुळे हवाई तसेच रेल्वे वाहतूक मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाली. बुधवारी सकाळी दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर धुक्याचा परिणाम स्पष्टपणे दिसून आला, ज्यामुळे अनेक उड्डाणांना विलंब झाला तर काही उड्डाणे रद्द करण्यात आली.



विमानतळावरून समोर आलेल्या व्हिडिओमध्ये धावपट्टी (रनवे) आणि टर्मिनल परिसरात दाट धुके पसरलेले दिसत आहे. या प्रतिकूल हवामानामुळे प्रवाशांच्या अडचणी वाढल्या आहेत. लांब पल्ल्याचा प्रवास करणा-या प्रवाशांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागली, तर अनेक प्रवाशांच्या कनेक्टिंग फलाइट्सही प्रभावित झाल्या. फलाइट ट्रॅकिंग वेबसाइटनुसार, मंगळवारी दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर धुके आणि कमी दृश्यतेमुळे किमान १० उड्डाणे रद्द करण्यात आली, तर २७० हून अधिक उड्डाणे नियोजित वेळेपेक्षा उशिरा रवाना झाली. बुधवारी परिस्थिती आणखी बिघडली असून किमान २० उड्डाणे रद्द करण्यात आली आणि अनेक उड्डाणांना विलंब झाला. विमान कंपन्यांनी प्रवाशांना उड्डाणापूर्वी फलाइटची स्थिती तपासण्याचा आणि अतिरिक्त वेळ घेउन विमानतळावर पोहोचण्याचा सल्ला दिला आहे. धुक्याचा परिणाम केवळ हवाई सेवांपुरता मर्यादित राहिला नाही. उत्तर भारतात दाट धुक्यामुळे अनेक रेल्वे गाड्याही त्यांच्या नियोजित वेळेपेक्षा मोठ्या प्रमाणावर उशिरा धावत आहेत. नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरून समोर आलेल्या दृश्यांमध्ये फलाटांवर प्रवाशांची मोठी गर्दी आणि गाड्यांच्या प्रतीक्षेत उभे असलेले लोक दिसत आहेत. अनेक प्रवाशांनी सांगितले की त्यांच्या गाड्या ३ ते ६ तास उशिराने धावत असून, थंडीमध्ये त्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

दरम्यान, बुधवारी सकाळी राजधानीतील हवा गंभीर श्रेणीत नोंदवण्यात आली. यापूर्वी मंगळवारीही हवा गंभीर श्रेणीत पोहोचली होती. आज सकाळची सुरुवात धुके आणि दाट कोह-याच्या जाड थराने झाली, तसेच स्मागची पातळीसुद्धा दिसून आली. दिल्लीसाठीच्या एअर क्वालिटी अर्ली वार्निंग सिस्टमनुसार, बुधवारी सकाळी राजधानीचा वायू गुणवत्ता निर्देशांक ३५५ इतका नोंदवण्यात आला असून, ही अत्यंत खराब श्रेणी मानली जाते.

## कांद्याचे दर घसरले; शेतकरी चिंताग्रस्त

**लासलगाव/प्रतिनिधी :**आशिया खंडातील कांद्याची सर्वांत मोठी बाजारपेठ असलेल्या लासलगाव बाजार समितीत लाल कांद्याची आवक प्रचंड प्रमाणात वाढल्याने दरात घसरण सुरू झाली आहे. त्याचप्रमाणे कांदा बियाणे कंपन्यांनी बियाणे उत्पादित करण्यासाठी लागणा-या कांद्याची खरेदी थांबवल्याने त्याचा परिणामदेखील दर घसरणीवर झाला आहे, तसेच बांगलादेशसह इतर देशांत कमी प्रमाणात होत असलेली कांद्याची निर्यात याचाही परिणाम कांद्याच्या



दर घसरणीवर झाला आहे.गेल्या आठवड्यातील मंगळवारच्या (दि. १६) तुलनेत लाल कांद्याच्या सरासरी दरात ७७५ रुपये प्रतिक्विंटलची घसरण झाली आहे. त्याचप्रमाणे गेल्या आठवड्याच्या तुलनेत उन्हाळ कांद्याच्या सरासरी दरातदेखील १०९९ रुपये प्रतिक्विंटलची घसरण झाली आहे. जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांमध्ये नवीन लाल कांद्याची आवक मोठ्या प्रमाणावर होत आहे. एकट्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत मंगळवारी लाल कांद्याची अंदाजे २० हजार क्विंटल आवक झाली. बाजारभाव कमीत कमी ७०० रुपये, जास्तीत जास्त २८०० रुपये तर सरासरी १७२५ रुपये असे होते. तर उन्हाळ कांद्याचे बाजारभाव कमीत कमी ९०० रुपये, जास्तीत जास्त १६१२ रुपये, तर सरासरी ११५१ रुपये असे होते. येणा?या काही दिवसांत आवक कायम वाढत राहिल्यास दर अजून कमी होण्याची शक्यता वर्तविली जाते. कांदा बियाणे कंपनीचा खरेदीचा कोठा बहुतेक पूर्ण झाला असल्याने त्यांनी बियाण्यांसाठी लागणा?या कांद्याची खरेदी थांबवली आहे तसेच बांगलादेशात कांद्याची निर्यातदेखील कमी प्रमाणात होत आहे. त्याचप्रमाणे नाताळच्या सुट्ट्यांमुळे इतर ख्रिस्ती देशातून कांद्याच्या मागणीत झालेली घट व सर्वांत महत्त्वाचे देशांतर्गत वाढलेली कांद्याची आवक, या चारही गोष्टींचा एकत्रित परिणाम म्हणून लाल कांद्याच्या दरातील घसरणीवर होत आहे.

## प्रचार समाप्तीनंतर सर्व प्रसारमाध्यमांतील निवडणूकविषयक जाहिरातींना बंदी-राज्य निवडणूक आयुक्त

**मुंबई/प्रतिनिधी :**महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या प्रचाराची मुदत १३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता संपणार असल्याने, त्यानंतर इलेक्ट्र?निक आणि मुद्रित माध्यमांसह अन्य कुठल्याही प्रसारमाध्यमांद्वारे निवडणूकविषयक जाहिराती प्रसिद्ध किंवा प्रसारित करता येणार नाहीत, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्तदिनेश वाघमारे यांनी दिली. राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची महानगरपालिकेच्या निवडणुकांसंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आणि अधिकारी यावेळी उपस्थित होते. श्री. वाघमारे यांनी सांगितले की, महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होणार आहे. संबंधित अधिनियमातील तरतुदींनुसार मतदान समाप्तीच्या ४८ तास आधी म्हणजे १३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता जाहीर प्रचाराची मुदत संपेल. त्यानंतर प्रसारमाध्यमांतून कुठल्याही प्रकारची जाहिरात प्रसिद्ध अथवा प्रसारित करता येणार नाही. त्यामुळे जाहीर प्रचाराच्या समाप्तीनंतर मुद्रित माध्यमांच्या जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनाचा किंवा परवानगीचा प्रश्न उद्?भवत नाही. यासंदर्भातील सविस्तर बाबी राज्य निवडणूक आयोगाच्या ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५मध्ये नमूद केल्या आहेत. श्री. काकाणी यांनी याप्रसंगी तपशिलवार सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की, इच्छूक उमेदवाराचे नाव संबंधित महानगरपालिकेच्या मतदार यादीत असणे आवश्यक आहे; परंतु सूचक आणि अनुमोदकाचे नाव मात्र उमेदवार निवडणूक लढवत असलेल्याच प्रभागात असणे आवश्यक आहे. पक्षाच्या उमेदवारास आणि अपक्ष उमेदवारासही प्रत्येकी एक सूचक आणि एका अनुमोदकाची आवश्यकता असते. एखादा उमेदवार एकापेक्षा जास्त प्रभागात नामनिर्देशनपत्र भरून शकतात;

## केरळच्या आरोग्य विभागाचा बर्ड फ्लूबाबत अलर्ट जारी

**तिरुवनंतपुरम-**कोट्टायम आणि अलाप्पुझा जिल्ह्यांच्या काही भागात बर्ड फलू (एव्हियन इन्फलूएंझा) ची पुष्टी झाल्यानंतर, राज्य आरोग्य विभागाने अलर्ट जारी केला आहे. पण राज्यात आतापर्यंत बर्ड फलूचा एकही मानवी रुग्ण आढळलेला नाही.राज्याच्या आरोग्य मंत्री वीणा जार्ज यांनी बुधवारी स्पष्ट केले की, केरळमध्ये बर्ड फलूचा एकही मानवी रुग्ण आढळला नसला तरी, संभाव्य प्रसार रोखण्यासाठी खबरदारीचे उपाय आवश्यक आहेत. क्षेत्रीय देखरेख अधिक तीव्र करण्यात आली आहे आणि आरोग्य विभागाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन जनतेला करण्यात आले आहे. परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे समन्वय साधण्यासाठी त्यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय रॅपिड रिस्पान्स टीम (आरआरटी) ची बैठक झाली.

## राहुल गांधींनी साधला व्यापा-यांशी संवाद

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी येथील वैश्य समाजाच्या प्रतिनिधींची भेट घेतली आणि त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. या संवादाचा व्हिडिओ आज राहुल गांधींच्या इन्स्टाग्राम हँडलवर प्रसिद्ध करण्यात आला.पादत्राणे उत्पादन, कृषी उत्पादने, औद्योगिक विद्युत, कागद आणि स्टेशनरी, प्रवास, दगडी बांधकाम, रसायने आणि हार्डवेअर यासह विविध क्षेत्रातील व्यावसायिकांनी बैठकीत भाग घेतला. प्रतिनिधींनी सध्याच्या आर्थिक धोरणांवर चिंता व्यक्त केली, असे म्हटले की लहान व्यापारी आणि एमएसएमई थेट दबावाखाली आहेत आणि उत्पादन-आधारित अर्थव्यवस्था संकटात आहे.व्यापा-यांनी सांगितले की, जीएसटी प्रणाली सुधारणांऐवजी दडपशाहीचे साधन बनली आहे. कच्च्या मालावरील उच्च कर आणि तयार उत्पादनांवर कमी कर यामुळे लहान उत्पादकांचे नुकसान होत आहे. त्यांनी महागाई, रोजगाराच्या संधी कमी होणे आणि आयातीवरील वाढती अवलंबित्व याबद्दलही चिंता व्यक्त केली.संवादादरम्यान व्यापा-यांचे म्हणणे ऐकून राहुल गांधी म्हणाले की, त्यांनी यापूर्वी इशारा दिला होता की मक्तेदारी-आधारित प्रशासन माडेल लहान व्यापारी आणि उद्योजकांना नष्ट करेल. त्यांनी जीएसटीचे वर्णन गब्बर सिंग कर असे केले.अग्रवाल समुदायाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, ते महाराजा अग्रसेन यांच्या समतावादी आर्थिक विचारसरणीचा वारसा पुढे चालवतात. उत्पादन आणि रोजगार निर्मितीमध्ये ते महत्त्वाची भूमिका बजावतात. पण सध्याच्या धोरणांमुळे त्यांना दुर्लक्ष आणि शोषणाचा सामना करावा लागत आहे.

## इस्त्रोचा नवा विक्रम :'बाहुबली LVM3 द्वारे 'ब्लूबर्ड-ब्लॉक-2' उपग्रहाचे प्रक्षेपण

**बंगळुरू, २४ डिसेंबर (हिं.स.) ।** भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्त्रो) पुन्हा एकदा नवा कीर्तिमान प्रस्थापित केला आहे. इस्त्रोच्या बाहुबली म्हणून ओळखल्या जाणा-या LVM3 राकेटने अमेरिकेचा ब्लूबर्ड-ब्लाक-२ हा उपग्रह यशस्वीपणे प्रक्षेपित केला. संभाव्य अवशेषांमुळे प्रक्षेपणात सुमारे ९० सेकंदांचा विलंब झाला होता. ब्लूबर्ड-ब्लाक-२ उपग्रहाचा उद्देश जगभरातील स्मार्टफोनना थेट उच्च-गती सेल्युलर ब्राडबँड सेवा उपलब्ध करून देणे हा असून, त्यामुळे जागतिक मोबाइल कनेक्टिव्हिटीला मोठी चालना मिळणार आहे.इस्त्रोने आज पुन्हा एक महत्त्वाचा टप्पा गाठला. भारताच्या जडवाहक LVM3-M6 राकेटचे प्रक्षेपण यशस्वी झाले. या व्यावसायिक मोहिमेअंतर्गत अमेरिकेच्या पुढील पिढीतील उपग्रहाला पृथ्वीच्या निम्न कक्षेत (लोअर अर्थ ऑर्बिट) स्थापित करण्यात आले. इस्त्रोकडून प्राप्त माहितीनुसार, हे प्रक्षेपण आज, बुधवारी २४ डिसेंबर रोजी सकाळी ८.५४ वाजता सतीश धवन अंतराळ केंद्रातून होणार होते. मात्र, तांत्रिक कारणांमुळे त्यात ९० सेकंदांचा विलंब झाला. या मोहिमेद्वारे अमेरिकेच्या एएसटी स्पेसमोबाइल कंपनीचा ब्लूबर्ड-ब्लाक-२ अवकाशयान अंतराळात पाठवण्यात आला.ब्लूबर्ड-ब्लाक-२ हा आजपर्यंत एलव्हीएम३ द्वारे लोअर अर्थ ऑर्बिटमध्ये पाठवण्यात आलेला सर्वात जड पेलोड आहे. या उपग्रहाचे वजन सुमारे ६,१०० किलोग्रॅम आहे. यापूर्वी हा विक्रम ४,४०० किलोग्रॅम वजनाच्या सीएमएस-०३ संप्रेषण उपग्रहाच्या नावावर होता, जो २ नोव्हेंबर रोजी प्रक्षेपित करण्यात आला होता. इस्त्रोची व्यावसायिक शाखा न्यू स्पेस इंडिया लिमिटेड (NSIL) ने अमेरिकेच्या AST स्पेसमोबाइल कंपनीसोबत करार केला होता. प्रक्षेपणानंतर सुमारे १५ मिनिटांत हा उपग्रह राकेटपासून वेगळा होईल आणि सुमारे ६०० किलोमीटर उंचीवरील लोअर अर्थ ऑर्बिटमध्ये स्थापित केला जाईल. लाँच व्हेईकल मार्क-३ (LVM3) हे भारताचे सर्वात शक्तिशाली राकेट असून, त्यामुळेच त्याला बाहुबली राकेट असेही संबोधले जाते. इसरोने स्पष्ट केले आहे की ६,१०० किलोग्रॅम वजनाचा हा उपग्रह LVM3 द्वारे लोअर अर्थ ऑर्बिटमध्ये प्रक्षेपित करण्यात आलेला आजवरचा सर्वात जड पेलोड आहे.ब्लूबर्ड-ब्लाक-२ चे प्रक्षेपण इसरोच्या व्यावसायिक शाखा न्यू स्पेस इंडिया लिमिटेड (NSIL) मार्फत करण्यात आले. यासाठी अमेरिकेच्या AST स्पेसमोबाइल (AST अँड सायन्स, एलएलसी) कंपनीने NSIL सोबत करार केला होता. ही मोहीम NSIL आणि अमेरिका-आधारित AST स्पेसमोबाइल यांच्यातील व्यावसायिक कराराअंतर्गत राबवण्यात आली. हा उपग्रह जगभरातील स्मार्टफोनना थेट उच्च-गती सेल्युलर ब्राडबँड सेवा देण्यासाठी डिझाइन करण्यात आला असून, तो मोबाइल



कनेक्टिव्हिटीसाठी जागतिक LEO तारामंडलाचा एक भाग ठरणार आहे. AST स्पेसमोबाइल ही अवकाश-आधारित पहिली सेल्युलर ब्राडबँड नेटवर्क प्रणाली विकसित करत असून, यामुळे स्मार्टफोन थेट उपग्रहांशी जोडले जातील. हे नेटवर्क जगातील कुठल्याही ठिकाणी ४G आणि ५G व्हाईस व व्हिडीओ काल, मेसेजिंग, स्ट्रीमिंग आणि डेटा सेवा उपलब्ध करून देणार आहे.दरम्यान, प्रक्षेपणापूर्वी इसरोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी मंगळवारी तिरुमाला येथील श्री वेंकटेश्वर स्वामी मंदिरात पूजा केली होती. -

## पंतप्रधान मोदी उद्या लखनउमध्ये राष्ट्रीय प्रेरणा स्थळाचे उद्घाटन करणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या (२५ डिसेंबर) उत्तर प्रदेशची राजधानी लखनउमध्ये राष्ट्रीय प्रेरणा स्थळाचे उद्घाटन करतील आणि एका सार्वजनिक सभेला संबोधित करणार आहेत. राष्ट्रीय प्रेरणा स्थळ हे स्वतंत्र भारतातील प्रमुख राष्ट्रीय नेत्यांच्या वारशाचे सन्मान करण्यासाठी विकसित केलेले कायमस्वरूपी राष्ट्रीय स्मारक संकुल आहे. हे संकुल अंदाजे २३० कोटी खर्चून बांधण्यात आले आहे आणि ६५ एकर क्षेत्रात पसरलेले आहे. या संकुलात डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी, पंडित दीनदयाळ उपाध्याय आणि अटल बिहारी वाजपेयी यांचे ६५ फूट उंच कांस्य पुतळे आहेत. यामध्ये सुमारे ९८,००० चौरस फूट क्षेत्रफळ असलेले अत्याधुनिक कमळाच्या आकाराचे संग्रहालय देखील आहे. हे संग्रहालय डिजिटल आणि इमर्सिव्ह तंत्रज्ञानाद्वारे भारताचा राष्ट्रीय प्रवास आणि नेतृत्वाचा वारसा प्रदर्शित करते.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# धुमसता बांगलादेश

बांगला देश आणि आसाम या दोन्ही ठिकाणच्या समस्या परस्परांशी निगडित आहेत. दोन्ही ठिकाणी हिंदू-मुस्लिम संघर्षाची समस्या असून, आगीत तेल ओतण्याचे काम पाकिस्तान करत असतो. या पार्श्वभूमीवर बांगला देशची राजकीय दुर्दशा झाली असून, उलट आसामसह ईशान्य भारत हा वाद झुगारून प्रगतिपथावर आहे. बांगला देशातील भारताशी मैत्री ठेवणाऱ्या शेख हसीना यांच्या अवामी लीगची राजवट संपुष्टात आणण्यामागे पाकिस्तानचादेखील हात होताच. हसीना यांनी काही गंभीर चुका केल्या. परंतु, त्यांच्या काळात बांगला देशची आर्थिक प्रगती झाली. उलट पाकिस्तान मात्र आर्थिक गर्तेत जात आहे. भारत-बांगला देश मैत्री डोळ्यांत खुपणाऱ्या पाकिस्तानने बांगला देशमधील कट्टरवाद्यांना सदैव प्रोत्साहन दिले. त्यामुळे शेख हसीना यांना पलायन करून भारताच्या आश्रयास यावे लागले. सव्वा वर्षापूर्वी बांगला देशात आगडोंब उसळला आणि हिंदूंच्या मंदिरांवर आणि घरांवरही हल्ले करण्यात आले. विद्यार्थी आंदोलनातील भारतद्वेष्टा नेता शरीफ उस्मान हादी याच्या मृत्यूनंतर तेथे तणाव निर्माण झाला असून, ठिकठिकाणी निदर्शने, हिंसा आणि मोडतोडीच्या घटना घडल्या. देशात अक्षरशः अराजक माजले असून, अंत्ययात्रेत सहभागी झालेल्या हजारोंच्या जमावाने अचानकपणे संसदेत घुसून तोडफोड आणि लूटपाट केली. अंत्यविधीची नमाज अदा करण्यात आली, त्यावेळी 'इन्कलाब मंच'चे सदस्य सचिव अब्दुल्ला अल जाबेर यांनी समर्थकांना निदर्शनासाठी शाहबाग येथे जमण्याचे आवाहन केले. त्यांनी सरकारला न्याय देण्यासाठी २४ तासांचा अल्टिमेटम दिला होता. हा 'न्याय' म्हणजे, त्यांना नेमके काय अपेक्षित होते, हाच खरा प्रश्न आहे. हादी हा फेब्रुवारीत होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांची तयारी करत होता. त्याच्या हत्येशी भारताचा कोणताही संबंध नाही. मात्र, त्यानंतर बांगला देशात एका हिंदू व्यक्तीला ईशनिंदा केल्याचा आरोप ठेवून, झाडाला लटकावण्यात आले आणि नंतर पेटवून देण्यात आले.या हिंसक आंदोलनात जमावाने 'बीएनपी'च्या नेत्याच्या घराला बाहेरून कुलूप लावून आग लावली, त्यात एका सात वर्षांच्या मुलीचा जळून मृत्यू झाला. ही माणसे आहेत की हैवान? आंदोलकांनी वृत्तपत्रांच्या कार्यालयांना लक्ष्य करत तेथेही जाळपोळ केली. धक्कादायक बाब म्हणजे, जोपर्यंत बांगला देश अस्तित्वात राहील, तोपर्यंत प्रत्येक बांगला देशीच्या मनात हादी जिवंत राहील, असे वादग्रस्त विधान बांगला देशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनी केले आहे. त्यांच्या या भाषणामुळे कट्टरपंथीयांना बळच मिळाले. युनूस सरकारने दंगेखोरांना मोकळे रान करून दिले. देशभर दंगली माजल्या की, निवडणुका पुढे ढकलता येतील; मग यातील जमात-ए-इस्लामी या जहाल पक्षास बळ देऊन आपण राष्ट्रपती व्हावे, असा युनूस यांचा डाव असल्याचे सांगितले जाते. बांगला देशातील हिंदूंचे रक्षण करण्याची जबाबदारी तेथील सरकारची आहे; अन्यथा परिणामांना सामोरे जावे लागेल, असा इशारा भारत सरकारने देण्याची वेळ आली आहे.दुसरीकडे, बांगला देशमधून आसाममध्ये होणारी घुसखोरी आणि लोकसंख्येतील अदलाबदल याबद्दल आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा हे वारंवार चिंता व्यक्त करत असतात. २०२१ च्या आकडेवारीनुसार, आसाममधील मुस्लिम धर्मीयांची लोकसंख्या सुमारे ३८ टक्के होती. ती २०२७ अखेर ४० टक्के होईल, असा अंदाज आहे. १९६१ पासून लोकसंख्येत चार ते पाच टक्के निरंतर वाढ होत चालली आहे. १९८५ मध्ये 'आसाम करार' अस्तित्वात आला, तेव्हादेखील बेकायदा घुसखोरीचा प्रश्न होताच. आता ४० वर्षांनंतरही ही समस्या कायम असून, घुसखोरांना माघारी पाठवण्याचा लढा सुरूच आहे. या सर्व पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, आसाममधील गुवाहाटी येथील एका जाहीर सभेत काँग्रेसवर तुफान हल्लाबोल केला आहे. काँग्रेस राजवटीत आसाम आणि ईशान्य भारताचा विकास त्यांच्या कार्यक्रम पत्रिकेवरच नव्हता. उलट आसामला पूर्व पाकिस्तानचा भाग बनवण्याचे कटकारस्थान रचले जात होते, असा सनसनाटी आरोप मोदींनी केला.आसाममध्ये बांगला देशातून बेकायदेशीरपणे येऊन नागरिक राहत आहेत. या भागातून काही स्थानिक पक्षांनी नागरिकत्व दुरुस्ती विधेयकास विरोध केला होता. काँग्रेसचाही या विधेयकास विरोध होताच. १९४७ मध्ये फाळणीच्या वेळी तेव्हाच्या पूर्व पाकिस्तानमधून किंवा पूर्व बंगालमधून पश्चिम बंगाल व आसाममध्ये लोंढेच्या लोंढे येऊ लागले. १९७१ मध्ये पूर्व पाकिस्तान स्वतंत्र होत, बांगला देशची निर्मिती झाली आणि पुन्हा हेच घडले. बंगाली भाषक निर्वासितांचे लोंढे आसाममध्ये दाखल होऊ लागले. तेव्हापासून आसामी विरुद्ध बंगाली वादाला सुरुवात झाली. नागरिकत्व दुरुस्ती कायद्यामुळे परप्रांतीयांना नागरिकत्व मिळेल आणि त्याचा परिणाम अस्मिता व संस्कृतीवर पडेल, अशी भीती आसामींना वाटते. १९७९ मध्ये आसामच्या विद्यार्थ्यांनी बंगाली हटावचा नारा दिला. 'आसु' संघटना आक्रमक झाली आणि यातूनच पुढे आसाम गण परिषदेची स्थापना झाली. १९८५ मध्ये आसाम गण परिषदेने पंतप्रधान राजीव गांधींसमवेत आसाम करार केला आणि प्रफुल्लकुमार महंत सत्तेवर आले.मात्र, १९७१ पासून बांगला देशमधून फक्त हिंदूच नव्हे, तर आर्थिक कारणामुळे मुस्लिमही भारतात मोठ्या प्रमाणावर येऊ लागले. आसाममध्ये होणारी घुसखोरी अद्यापही थांबलेली नाही. २०१४ पासून आतापर्यंत सर्वाधिक घुसखोरी भारत-बांगला देश सीमेवरून झाली. तेथून गेल्या अकरा वर्षांत ७ हजार ५२८ घुसखोर भारतात शिरले, अशी माहिती केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी गेल्याच आठवड्यात लोकसभेत दिली. घुसखोरी रोखता न आल्याची कबुलीच सरकारने दिली आहे; तर यापेक्षा निश्चितच घुसखोरांची संख्या अधिक असण्याची शक्यता आहे. दोन्ही देशांतील आंतरराष्ट्रीय सीमेची एकूण लांबी ४ हजार ९६ किलोमीटर आहे. बांगला देश सुरक्षा दलांच्या सहकार्याने तेथील नागरिक वर्षानुवर्षे बिनधास्तपणे भारतात प्रवेश करत होते. मुंबईतील बांगला देशींची संख्याही कमी नाही. या लोकांना शोधून देशाबाहेर हाकलवून लावले पाहिजे. घुसखोरांच्या मतांचे क्षूद्र राजकारण थांबलेच पाहिजे. या प्रश्नाच्या मुळाशी जाणे गरजेचे आहे, त्यासाठी बांगला देशचे नाक दाबण्याची वेळ आली आहे.

# महायुतीला साथ, पण विरोधकांनाही हात

**दक्षिण महाराष्ट्रातील सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील नगर परिषद निवडणुकांचे निकाल जाहीर होताच या भागातील राजकीय प्रवाह पुन्हा एकदा स्पष्ट झाला. विधानसभा निवडणुकीनंतर अवघ्या वर्षभरात झालेल्या या स्थानिक निवडणुकांनी मतदारांचा कल कोणत्या दिशेने आहे, हे दाखवून दिले असले तरी हा कौल एकरेषीय नाही, हेही तितकेच खरे आहे.**

एकूण चित्र पाहता सत्ताधारी महायुतीला (भाजप, शिंदे सेना, अजित पवार राष्ट्रवादी) संख्यात्मकदृष्ट्या स्पष्ट आघाडी मिळालेली आहे. बहुतांश नगर परिषदांमध्ये महायुतीकडे सत्ता गेली असून स्थानिक स्वराज्य संस्थांवरील त्यांचा प्रभाव वाढलेला दिसतो. मात्र, याचवेळी महाविकास आघाडीला काही ठिकाणी महत्त्वाचे बालेकिल्ले टिकवता आले, तसेच काही नगरपालिकांमध्ये स्थानिक आघाड्या व अपक्षांनी निर्णायक भूमिका बजावली, याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. सांगली जिल्ह्यातील निकाल सर्वाधिक लक्षवेधी ठरले. काही नगर परिषदांमध्ये महायुतीला यश मिळाले असले तरी राष्ट्रवादी आणि काँग्रेसलाही सत्ता टिकवता आली, हे या निवडणुकीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. विशेषतः ग्रामीण व अर्धनागरी भागात काँग्रेसची संघटनात्मक पकड अजूनही संपलेली नाही, हे या निकालांतून दिसते. या जिल्ह्यात विश्वजित कदम यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस गटाला पलूस नगरपालिकेत एकहाती यश मिळाले. भाजप आणि राष्ट्रवादीतील वाद तसेच विश्वजित कदम यांची स्वतःची कामगिरी यामुळे काँग्रेसने जिल्ह्यातील हा एकमेव गड राखला. काँग्रेसकडे नेतृत्व आहे, पण संघटनात्मक विस्तार आणि सातत्याचा अभाव जिल्हाभर आहे हे स्पष्ट झाले. महायुतीसाठी सांगली जिल्ह्यातील निकाल समाधानकारक असले, तरी काही ठिकाणी अपेक्षेइतका एकतर्फी कौल मिळाला नाही. त्यामुळे आगामी काळात महायुतीला स्थानिक पातळीवरील नाराजी, गटबाजी आणि विकासविषयक प्रश्न गांभीर्याने हाताळावे लागणार आहेत. जत, आटपाडी जसे गोपीचंद पडळकर यांनी जिंकले त्याहून अधिक दणदणीत विजय हा जयंत पाटील यांचा होता. ईश्वरपूर आणि आष्टा या दोन्ही जुन्या नगरपालिका लोकांनी एकतर्फी जयंत पाटलांच्या पदरात टाकून त्यांच्या नेतृत्वाला जीवदान दिले आहे. शिराळा नगरपालिकेत मात्र राष्ट्रवादीला धक्का बसला असून शिंदे सेनेच्या नगराध्यक्ष पदाच्या बरोबरच सर्वाधिक जागा भाजपने घेऊन आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

सातारा जिल्ह्यात महायुतीचा, विशेषतः भाजपचा प्रभाव तुलनेने अधिक ठळक राहिला. अनेक नगर परिषदांमध्ये भाजप किंवा महायुतीशी संलग्न गट सत्तेत आले. यामुळे या जिल्ह्यातील राजकीय संतुलन सध्या सत्ताधाऱ्यांच्या बाजूने झुकलेले आहे. मात्र, येथेही निकाल पूर्णपणे एकतर्फी नाहीत. काही ठिकाणी महाविकास आघाडीला किंवा स्थानिक गटांना मानाची जागा मिळाली, ज्यामुळे भाजपच्या वर्चस्वाला मर्यादा असल्याचे स्पष्ट झाले. साताऱ्यातील निकाल सूचित करतात की मतदार विकासाच्या मुद्द्यावर मतदान करत आहेत, पण स्थानिक नेतृत्व, जुनी नाती आणि सामाजिक समीकरणे अजूनही निर्णायक ठरतात. तर कोल्हापूर जिल्ह्यातील निकाल सर्वाधिक गुंतागुंतीचे आणि राजकीयदृष्ट्या अर्थपूर्ण ठरले. या जिल्ह्यात महायुतीला संख्यात्मक फायदा झाला असला, तरी अनेक ठिकाणी स्थानिक आघाड्या आणि अपक्ष गटांनी पारंपरिक पक्षांना आव्हान दिले. काँग्रेसची पारंपरिक पकड असलेल्या काही भागांत पक्षाला अपेक्षित यश मिळाले नाही, तर काही ठिकाणी त्यांनी केवळ अस्तित्व टिकवले. याचा अर्थ असा, की कोल्हापूरमध्ये मतदार आता केवळ पक्षनिष्ठेवर मतदान करत नाही, तर स्थानिक कामगिरी, विकासाची दिशा आणि उमेदवाराची स्वीकारार्हता अधिक महत्त्वाची ठरत आहे. या निकालांनंतर दक्षिण महाराष्ट्रात काँग्रेसमध्ये विश्वजित कदम यांचे स्थान तुलनेने सुरक्षित मानले जात आहे, कारण पक्षाला जिथे यश मिळाले तिथे त्यांचा प्रभाव स्पष्ट दिसतो. मात्र, सतेज पाटील आणि पृथ्वीराज चव्हाण यांच्यासाठी हे निकाल संमिश्र स्वरूपाचे ठरले आहेत. काही भागांत त्यांचा प्रभाव जाणवतो, पण संपूर्ण दक्षिण महाराष्ट्रावर पकड असल्याचे चित्र नाही. भाजपच्या बाबतीत पाहता, पक्षाला संख्यात्मक विजय मिळाला असला तरी सर्व नेत्यांसाठी हा निर्विवाद यशाचा उत्सव नाही. काही ठिकाणी अपेक्षेपेक्षा कमी कामगिरी झाली असून स्थानिक नाराजी पुढे अडचण ठरू शकते. अजित पवार गटाची राष्ट्रवादी महायुतीचा भाग असूनही मर्यादित यशावर समाधान मानताना दिसते. शिंदे सेनेला काही ठिकाणी फायदा झाला असला, तरी ती पूर्णपणे भाजपच्या सावलीत असल्याचे चित्र या निकालांतून स्पष्ट होते. ठाकरे गट आणि शरद पवार गटासाठी हे निकाल इशारादायक आहेत. काही बालेकिल्ले टिकले, पण एकूण चित्र निराशाजनक आहे. संघटनात्मक एकजूट आणि स्पष्ट स्थानिक नेतृत्व उभे न राहिल्यास पुढील निवडणुकांत अडचणी वाढू शकतात. वर्चस्व महायुतीचे, पण अंतिम लढाई अजून बाकी असल्याचे चित्र आहे.



दक्षिण महाराष्ट्रातील नगरपालिका निवडणुकांचे निकाल पाहता महायुतीचा वरचष्मा निर्विवाद आहे, मात्र तो अढळ नाही. विरोधक पूर्णपणे संपलेले नाहीत आणि स्थानिक आघाड्यांनी दाखवून दिले आहे, की विकास, स्थानिक प्रश्न आणि नेतृत्व यांवर निवडणूक जिंकता येते. हे निकाल आगामी महापालिका आणि पुढील विधानसभा निवडणुकांसाठी राजकीय दिशा दाखवणारे असले, तरी अंतिम निर्णय देणारे नाहीत. दक्षिण महाराष्ट्राचे राजकारण अजूनही बहुविध, संवेदनशील आणि सतत बदलणारे आहे आणि हेच या भागाचे खरे राजकीय वैशिष्ट्य आहे.

## चांदीचे भाव भिडले गगनाला!

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील वेगवान आर्थिक घडामोडी आणि सततच्या वाढत्या मागणीमुळे सोन्या-चांदीच्या दरात वेगाने वाढ होत आहे. विशेषतः चांदीचे दर द्रुतगतीने वाढत आहेत. ३१ डिसेंबर २०२४ रोजी ८९७०० रुपये प्रतिकिलो असणारी चांदी १४३३०० रुपयांनी वाढून २४ डिसेंबर २०२५ रोजी तब्बल २३३००० रुपये प्रतिकिलो वर जाऊन पोहोचली आहे. गुंतवणुकीचा सर्वाधिक सुरक्षित पर्याय असलेल्या सोन्याने यावर्षी अंदाजे ७८ टक्के परतावा दिला असताना चांदीने मात्र गुंतवणूकदारांना १४२ टक्क्यांचा विक्रमी परतावा देऊन मालामाल केले. चांदीचे भाव कल्पनेच्या पलिकडे गेले असून २०२५ मध्ये ज्या वेगाने चांदीच्या किंमतींनी नव नवे शिखर गाठले त्यावरून चांदी २०२६ मध्ये तीन लाखांचा टप्पा सहज पार करेल असा अंदाज तज्ज्ञांनी वर्तविला आहे. सोलर पॅनल, इलेक्ट्रिक व्हेइकल, इलेक्ट्रॉनिक उद्योग तसेच ग्रीन एनर्जीशी संबंधित उद्योग क्षेत्रात वाढलेला चांदीचा वापर, डॉलरच्या तुलनेत रुपयाची होत असलेली घसरण, सुरक्षित गुंतवणूक म्हणून चांदीकडे वाढलेला गुंतवणूकदारांचा कल, चांदीच्या मागणी आणि पुरवठ्यातील तफावत तसेच जागतिक स्तरावरील युद्धजन्य परिस्थिती यामुळे चांदीच्या दरात मोठी वाढ झाली आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा चांदीचा ग्राहक असल्यामुळे (भारतात दरवर्षी अंदाजे ४००० टन चांदी वापरली जाते) भारताला या वाढीचा सर्वाधिक फटका बसतो आहे.

**- प्रदीप मोरे**

## पुरोगामी 'हे' आवाहन स्वीकारतील का ?

शहरासारख्या ठिकाणी बहुसंख्य हिंदू असूनही गेल्या काही वर्षांत नाताळ हा सण हिंदूंच्या अन्य सण-उत्सवांप्रमाणे साजरा होऊ लागला आहे. सध्या मोबाईल युग असल्याने अनेक पालक आपल्या पाल्यांना या दिवसांत बाजारात मिळणाऱ्या सांताक्लॉजच्या लाल टोप्या घालून त्यांचे फोटो व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्रामवर स्टेटस-स्टोरी म्हणून ठेवतात. २४ डिसेंबरच्या रात्री सांताक्लॉज येतो आणि लहान मुलांना भेटवस्तू, खाऊ देतो असे सांगून त्यांच्या उशाजवळ स्वतःच भेटवस्तू किंवा खाऊ ठेवतात. रात्री सांताक्लॉजच हे सर्व देऊन गेला यावर कोवळ्या वयातील मुलांचाही विश्वास बसतो. लहानपणी अजाणत्या वयात मुलांना असे काही खोटेनाटे सांगून त्यांच्या मनावर सांताक्लॉज नामक पात्राचे महत्व बिंबवणे खरंच आवश्यक आहे का? सांताक्लॉज खरंच होऊन गेला का? किंवा त्याचे आजही अस्तित्व आहे का, याबाबत ख्रिस्ती धर्मगुरुंमध्ये आणि अभ्यासकांमध्ये अनेक मतमतांतरे आहेत. सांताक्लॉज हे आभासी पात्र असून लहान मुलांमध्ये त्याचे प्रस्थ वाढवण्याची काहीच गरज नाही असे अनेक ख्रिस्ती साहित्याच्या अभ्यासकांचे मत असताना भारतात त्याला अवास्तव महत्व का दिले जात आहे ? 'देव दाखवा आणि बक्षिस मिळवा' अशा प्रकारची आवाहने करून देवाच्या अस्तित्वावर प्रश्चचिन्ह निर्माण करणारी आणि हिंदू धर्मातील प्रथा परंपरांना नेहमीच अंधश्रद्धेचे लेबल लावून हिणवणारी तथाकथित पुरोगामी विचारांची मंडळी या आभासी पात्राच्या अस्तित्वावर कधीच काही बोलताना दिसत नाहीत. त्यामुळे हिंदू राष्ट्र समन्वयक समितीने यंदा 'सांताक्लॉज येतो हे सिद्ध करा आणि एक लाख रुपये मिळवा !' असे आवाहन या मंडळींना केले आहे. पुरोगामी हे आवाहन स्वीकारतील का ?

**मोक्षदा घाणेकर, मुंबई**

## अस्मितेचे राजकारण की अस्तित्वाची लढाई?

**बदलती राजकीय समीकरणे आणि हिंदुत्व:** एकेकाळी 'कट्टर हिंदुत्व' हा शिवसेनेचा कणा होता.'काँग्रेससोबत जाण्यापेक्षा मी माझे दुकान बंद करेन,' हे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार आजही शिवसैनिकांच्या स्मरणात आहेत. मात्र, सत्तेच्या समीकरणासाठी आज त्याच काँग्रेसशी त्यांच्या चिरंजीव उद्धव ठाकरेंनी हातमिळवणी केली आहे. दुसरीकडे, देशातील तामिळनाडू, कर्नाटक, केरळ आणि पश्चिम बंगाल यांसारख्या राज्यांमध्ये हिंदू समाजावर होणारे अन्याय आणि केरळमधील 'लव्ह जिहाद'सारखे गंभीर विषय चर्चिले जात असताना, इतर वेळी हिंदुत्वाचे दाखला देणारे नेतृत्वाकडून यावर अपेक्षित 'ब्र' काढला जात नाही, ही मोठी शोकांतिका आहे. शेजारील बांगलादेशात हिंदूंची जी दयनीय स्थिती झाली आहे, त्यावर बोलण्याऐवजी केवळ मतपेढीचे राजकारण सुरू असल्याचे चित्र दिसते.

**लोकसंख्याशास्त्रीय संकट:** मध्यंतरी विविध माध्यमांतून आणि अहवालांतून असे समोर आले की, येणाऱ्या काही वर्षांत मुंबईतील लोकसंख्येचे प्रमाण कमालीचे बदलू शकते. अल्पसंख्याक समाजाची वाढती लोकसंख्या आणि त्यामुळे निर्माण होणारे सामाजिक व सुरक्षेचे प्रश्न यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. 'मराठी माणूस' हा शब्द केवळ भाषणापुरता मर्यादित राहिला असून, प्रत्यक्षात मुंबईच्या बदलत्या भौगोलिक आणि धार्मिक रचनेमुळे भविष्यात कोणते संकट ओढवेल, याची चिंता राजकीय नेत्यांपेक्षा सामान्य मतदारालाच जास्त आहे.

**अविनाश देशपांडे**

# महायुतीचा विजय!



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठा पराभव पत्करावा लागला होता.नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका निवडणुकांत,महाविकास आघाडीला चारीमुंड्या चीत करुन भाजपा प्रणीत महायुतीने आपल्या विजयाची पुनरावृत्ती केली आहे.भाजपाने सर्वात जास्त जागा जिंकून, महाराष्ट्रातील सर्वात मोठा पक्ष आपणच असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.नगरपालिका निवडणुकीत महायुतीचा विजय होणार,हे विरोधी पक्षांनीही गृहित धरले होते.त्यामुळे त्यांनी फारसा जोर लावला नाही.काँग्रेसने आपली कामगिरी चांगली व्हावी म्हणून निदान प्रयत्न तरी केले, परंतु शिवसेना (उबाठा)आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शप) यांनी निवडणुकी आधीच आपली शस्त्रे खाली ठेवल्याचे जाणवले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे हे पायाला भिंगरी बांधून प्रचाराची राळ उडवत असताना, उद्धव ठाकरे आणि शरद पवार हे मात्र निवडणुक प्रचारापासून काहीसे दूरच राहिले.साधारणत:शरद पवार हे निवडणुक प्रचारात नेहमी ॲक्टिव्ह असतात.परंतु या खेपेस ते फारसे ॲक्टिव्ह दिसले नाहीत.त्यामानाने काँग्रेसचे नेते निवडणुक प्रचारात बरेच ॲक्टिव्ह दिसले.

उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने तर नगरपालिका निवडणुकांबाबत फारसे गांभीर्य दाखवलेच नाही.विरोधी पक्षांनी नगरपालिका निवडणुकांबाबत उदासीनता दाखवल्याने निवडणुकांचे निकाल यापेक्षा वेगळे लागणे शक्यच नव्हते.त्याचा परिणाम म्हणजे नगरपालिका निवडणुकीतील लढती या प्रामुख्याने महायुती मधील घटक पक्षांमध्येच झाल्या आणि भाजपा, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या घटक पक्षांनी अनुक्रमे पहिले तीन क्रमांक पटकावले.

भाजपाने ११७ नगराध्यक्षपदे जिंकून अपेक्षेनुसार पहिला क्रमांक पटकावला. शिवसेनेने ५३ नगराध्यक्षपदे जिंकून दुसरा क्रमांक पटकावला,तर राष्ट्रवादी काँग्रेसने ३७ नगराध्यक्षपदे जिंकून तिसरा क्रमांक पटकावला.त्यातुलनेत काँग्रेसला फक्त २८ नगराध्यक्षपदे जिंकता आली.अर्थात शिवसेना (उबाठा) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शप) या मित्र पक्षांच्या तुलनेत काँग्रेसची ही कामगिरी चांगलीच म्हणावी लागेल.काँग्रेसची विदर्भात बऱ्यापैकी कामगिरी झाल्यामुळेच पक्षाला २८ चा पल्ला गाठता आला,ही गोष्ट यासंदर्भात लक्षात घ्यावी लागेल.शिवसेना (उबाठा) ला फक्त ९ नगराध्यक्षपदे जिंकता आली.पक्षाचा झालेला हा दारूण पराभव,पक्ष कार्यकर्त्यांचे मनोबल खच्ची करणारा आहे.विधानसभा निवडणुकीतील पक्षाच्या खराब कामगिरीनंतर, नगरपालिका निवडणुकीतील पक्षाची ही कामगिरी अतिशय निराशाजनक आहे.शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसची कामगिरी तर पक्षाचे कंबरडे मोडणारी आहे.पक्षाला फक्त ७ नगराध्यक्षपदे जिंकता आली आहेत.विधानसभा निवडणुकीतील पक्षाच्या निराशाजनक कामगिरी नंतर, नगरपालिका निवडणुकीतही पक्षाला मोठा पराभव पत्करावा लागल्याने, पक्षाच्या अस्तित्वाबाबत भले मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.या पार्श्वभूमीवर महापालिका निवडणुका होत आहेत.विरोधी पक्षांनी नेहमीप्रमाणे आपल्या पराभवाचे खापर भाजपा आणि तिच्या मित्रपक्षांवर फोडले आहे.पैशांचा महापूर, निवडणूक आयोगाचा पक्षपातीपणा, दंडेलशाही, ईव्हीएम घोटाळा वगैरे नेहमीचेच आरोप विरोधी पक्षांकडून,भाजपा आणि तिच्या मित्रपक्षांवर करण्यात आले आहेत.विरोधी पक्षांनी निवडणुक प्रचारात निष्क्रियता दाखवली याबाबत कुणीच बोलायला तयार नाही.आपल्या नाकर्तेपणाचे खापर सत्ताधारी पक्षावर फोडायचे ही आता फॅशनच बनून गेली आहे.

महापालिका निवडणुकांत मुंबई महापालिकेची निवडणूक सर्वात प्रतिष्ठेची आहे.मुंबई महानगर पालिकेचे बजेट हे केरळ राज्याच्या बजेटपेक्षाही मोठे असल्याने,सर्वच राजकीय पक्षांसाठी मुंबई महापालिकेची निवडणूक सर्वात महत्वाची आहे.शिवसेना,(उबाठा) करता तर मुंबई महापालिकेची निवडणूक, जीवन मरणाचा प्रश्न होऊन बसली आहे.इतकी वर्षे मुंबई महापालिका सातत्याने आपल्या ताब्यात ठेवल्यानंतर, प्रथमच शिवसेना उबाठाला, भाजपा आणि मित्र पक्षांबरोबर कडवी लढत द्यावी लागणार आहे.गेल्याखेपेस भाजपाने शिवसेना उबाठाला कडवी लढत दिली होती.शिवसेना उबाठाला तेंव्हा ८४ जागांवर विजय मिळाला होता,तर भाजपाला ८२ जागांवर विजय मिळाला होता.याखेपेस परिस्थितीत आमुलाग्र बदल झाला आहे.शिवसेना उबाठाचे बरेच नगरसेवक मधल्या काळात पक्षाला जयमहाराष्ट्र करत शिंदेंच्या शिवसेनेत दाखल झाले आहेत.त्यांच्याबरोबर कार्यकर्तेही मोठ्या प्रमाणात शिंदेंच्या शिवसेनेत दाखल झाले आहेत.शिवसेना उबाठा आणि मनसे यांच्यात वाटाघाटी सुरू आहेत.मात्र मनसेला बरोबर घेतल्याने,शिवसेना उबाठाचा फायदा होण्याऐवजी नुकसानच होण्याची जास्त शक्यता आहे. शिवसेना उबाठाने मनसेला बरोबर घेतल्यामुळे, काँग्रेसने शिवसेना उबाठाबरोबर जाण्यास नकार दिला.मनसेमुळे अमराठी आणि मुस्लिम मतदार आपल्यापासून दूर जातील,या भितीमुळे, काँग्रेसने स्वतंत्रपणे निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला.मनसे बरोबर युती केल्यामुळे शिवसेना उबाठाला पुर्वी सारखी मुस्लिम समाजाची मते मिळणार नाहीत.आता मुस्लिम समाजाची मते काँग्रेसकडे वळतील.मुंबईत मनसेची ताकद काही भागांपुरती मर्यादित असल्याने शिवसेना उबाठाला,मनसे बरोबरच्या युतीचा फारसा फायदा होईल असे वाटत नाही.काँग्रेसची साथ सोडल्यामुळे, शिवसेना उबाठाला मोठे नुकसान सोसावे लागणार आहे.

वरील पार्श्वभूमी लक्षात घेतली तर, मुंबई महापालिका आपल्या ताब्यात राखणे शिवसेना उबाठासाठी अशक्यप्राय होऊन बसणार आहे.शिंदेंच्या शिवसेनेने अगोदरच, शिवसेना उबाठात मोठ्या प्रमाणात फूट पाडून पक्षाला कमकुवत केले आहे.अशा परिस्थितीत मुंबई महापालिका, शिवसेना उबाठाच्या हातातून निसटल्यास,पक्षाचे अस्तित्वच धोक्यात येऊ शकेल.इतर महापालिकांतही भाजपा आणि मित्र पक्षांचेच वर्चस्व राहिल,अशीच शक्यता दिसून येत आहे.

**अभय गोखले**

# फुले, शाहू, आंबेडकर विचार प्रत्येक घरात पोहोचले पाहिजेत, अन्यथा देशात फक्त घोषणांचीच शेती होईल!

## महात्मा फुले - डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृतीपूर्व कार्यक्रमात आमदार बाळासाहेब मांगुळकर यांचा घणाघाती हल्लाबोल..!

### ब्राह्मणी राष्ट्रवाद विरोधात वैचारिक लढ्याचा नारा : प्रा. जावेद पाशांचा परखड विचारमंथन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीस अर्पण करण्यात आलेल्या स्मृतीपूर्व कार्यक्रमाचे उद्घाटन दिनांक २३ डिसेंबर २०२५ रोजी समता मैदान, यवतमाळ येथे उत्साहात पार पडले. उद्घाटनप्रसंगी आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या हस्ते फीत कापून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाला मंगेश काळे (उपायुक्त, पशुसंवर्धन, यवतमाळ), कार्यक्रमाचे अध्यक्ष आत्माराम जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रस्ताविक ज्ञानेश्वर गोरे यांनी केले.तर परिचय दीपक वाघ यांनी दिली.

यावेळी आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी आपल्या मनोगतात फुले–शाहू–आंबेडकर विचार प्रत्येकाच्या घराघरात पोहोचवणे काळाची गरज आहे, असे ठामपणे सांगत सध्याच्या राजकीय व्यवस्थेवर तीव्र शब्दांत टीका केली. ते म्हणाले, "देशात वैचारिक लढाई उभारण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्यांचे हाल दिवसेंदिवस वाढत आहेत. बियाणे, खते, औषधे महाग होत आहेत; मात्र शेतमालाला हमीभाव मिळत नाही. केवळ घोषणांचा पाऊस पाडून शेतकऱ्यांची थट्टा केली जात आहे. शेतकऱ्यांचा जीवनमान उंचावत नाही, उलट त्यांची चेष्टा केली जात आहे," अशी घणाघाती टीका त्यांनी केली. यानंतर प्रा.जावेद पाशा लिखित "फुले–शाहू–आंबेडकर आणि ब्राह्मणी राष्ट्रवादाचा संघर्ष" या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. तसेच २०२६ सालच्या दिनदर्शिकेचेही यावेळी उद्घाटन करण्यात आले. प्रमुख वक्ते प्राध्यापक जावेद पाशा यांनी आपल्या भाषणाची सुरुवात राष्ट्र निर्मिती साठी देह झीजविणाऱ्या सर्व महापुरुषांना वंदन करून करत, पुढील कविते द्वारे सध्याच्या दहशतीच्या वातावरणावर भाष्य केले.

"दौरे हालात मे मोहब्बत का हाल ना पूछ, कलम भी कुछ ऐसी डरी हुई है, मैं मोहब्बत लिखता हूँ! ये लहू सी बह उठती है! मैं माँ लिखने जाता हूँ ! ये गाय लिख जाती है!" या कवितेने संपूर्ण मैदान स्तब्ध झाले. प्रा. जावेद पाशा म्हणाले, "हे स्मृतीपूर्व कार्यक्रम म्हणजे यवतमाळकर जनता लोकशाहीचा पाया मजबूत करत आहे. आज बोलण्यावर बंदी आहे, सोशल मीडियावर मत मांडण्याचीही भीती आहे. अशा काळात स्वातंत्र्य, समता व न्यायासाठी ही परिषद अत्यंत महत्त्वाची आहे." ते पुढे म्हणाले की, "संस्कृती कुठल्याही एका पुस्तकातून किंवा धर्मातून जन्माला येत नाही. भारताची संस्कृती ही संमिश्र आहे. ते मोठे बांधकाम व्यावसायिक होते. त्यांच्या उद्योगात दीडशे मजुरांना लाभांश दिला जात होता. ही खरी राष्ट्रनिर्मिती होती." त्यांनी ब्रिटिशकालीन शिक्षणपद्धतीवर टीका करत सांगितले की, "१८२६ ते १८३४ या काळात शिक्षण वरच्या वर्गाकडून खाली झिरपेल अशी संकल्पना होती. मात्र फुलेंनी शिक्षणाला समानतेचा दर्जा दिला आणि ती व्यवस्था बदलली. फुलेंनी शिवाजी महाराजांना मुस्लिम विरोधात लढणारा राजा म्हणून नव्हे, तर अठरापगड जातींना सोबत घेऊन स्वराज्यासाठी लढणारा राजा म्हणून मांडले व असे त्यांनी स्पष्ट केले. देश धर्माने नव्हे, विचारांनी घडतो असे वैयक्तिक अनुभव सांगताना त्यांनी गुरुकुंज मोझरी येथील प्रसंग, तसेच गडचिरोलीतील सर्वधर्मसमभावाची उदाहरणे देत स्पष्ट केले की, "हा देश धर्माने घडलेला नाही, तर थोर पुरुषांच्या विचारांनी घडलेला आहे. हा देश धर्मांतरावर चालला असता, तर पाकिस्तानसारखा झाला असता. "चळवळीने मला नाव दिले"असे मत त्यांनी व्यक्त केले. आपल्या आयुष्याबद्दल बोलताना त्यांनी भावनिक शब्दांत सांगितले, "शाहू–फुले–आंबेडकर चळवळ नसती, तर मी आज ४० पुस्तकांचा लेखक नसतो. कदाचित एखाद्या दुकानासमोर 'जावेद मटनवाला' म्हणून उभा राहिलो असतो. चळवळीने मला ओळख दिली. ज्याला नीट बोलता येत नव्हते, त्या जावेद पाशाला बोलते केले. हीच या चळवळीची ताकद आहे. कार्यक्रमास नागरिक, कार्यकर्ते, अभ्यासक आणि तरुणांची मोठी उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे संचालन पूजा राऊत यांनी केले तर आभार मोहन लोखंडे यांनी मानले हा संपूर्ण कार्यक्रम वैचारिक जागृतीचा साक्षीदार ठरला.

# राळेगाव येथे दोन नियोजित बालविवाह रोखले जिल्हा प्रशासनाची प्रभावी कारवाई

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - राळेगाव तालुक्यातील गोपालनगर परिसरात होऊ घातलेले दोन बालविवाह जिल्हा प्रशासनाने वेळेवर हस्तक्षेप करत यशस्वीपणे थांबविले. चाईल्ड हेल्पलाईन १०९८ वर दिनांक २३ डिसेंबर रोजी प्राप्त झालेल्या गोपनीय माहितीनंतर प्रशासनाने तातडीची कारवाई करत बालकांचे भविष्य वाचविले.

प्राप्त माहितीनुसार, दोन अल्पवयीन बालकांचे वेगवेगळ्या ठिकाणी विवाह आयोजित करण्यात आले होते.

अंगणवाडी सेविकेकडील नोंदी तपासल्यानंतर संबंधित बालकांचे वय केवळ १६ वर्षे असल्याचे स्पष्ट झाले. बालविवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ नुसार बालिकेसाठी किमान १८ वर्षे व बालकासाठी २१ वर्षे वय आवश्यक असल्याने सदर विवाह कायद्याच्या विरोधात असल्याचे निदर्शनास आले.यानंतर जिल्हा चाईल्ड हेल्पलाईन यवतमाळचे केसवर्कर शुभम दत्ता कोंडलवार व अश्विनी दिलीप नासरे यांनी गाव बाल संरक्षण समिती, अंगणवाडी सेविका सरला आडे, ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच तसेच राळेगाव पोलीस स्टेशनच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने तात्काळ कारवाई करत हे बालविवाह रोखले.

कारवाईदरम्यान पालकांना बालविवाहाचे सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक दुष्परिणाम तसेच कायदेशीर परिणाम समजावून सांगण्यात आले. यानंतर पालकांनी बालिकेचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतरच विवाह करण्याची लेखी हमी दिली.

तसेच त्यांना बालकल्याण समिती, यवतमाळ यांच्यासमोर दिनांक २४ डिसेंबर रोजी हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या.

ही संपूर्ण कार्यवाही जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विशाल जाधव, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी देवेंद्र राजूरकर, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी श्री. विठाळकर तसेच चाईल्ड हेल्पलाईन यवतमाळचे प्रकल्प समन्वयक फाल्गुन पालकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. बालविवाह रोखण्यासाठी प्रशासन, सामाजिक यंत्रणा व ग्रामस्तरावरील घटकांचा समन्वय किती महत्त्वाचा आहे, हे या कारवाईतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# • वेचक



## अजीज नाथानी व संजय जैस्वाल यांची सर्वानुमते निवड

यवतमाळ - मोहदा येथील स्व. समसुदीन नाथानी पतसंस्था (रजिस्टर क्रमांक ९८८) तसेच श्री. दुलीचंद राठोड पगारदार कर्मचारी सहकारी संस्थेची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत दोन्ही संस्थांच्या वतीने यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रतिनिधीपदी सर्वानुमते दोन सदस्यांची निवड करण्यात आली. स्व. समसुदीन नाथानी पतसंस्थेतर्फे अजीज अब्दुलभाई नाथानी, तर दुलीचंद राठोड पगारदार कर्मचारी सहकारी संस्थेतर्फे श्री. संजय किसनलाल जैस्वाल यांची बँक प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. ही निवड हरिहर लिंगनवार यांच्या सूचनेवरून करण्यात आली. या वेळी दोन्ही संस्थांचे सर्व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनिर्वाचित प्रतिनिधींच्या निवडीमुळे संस्थांना योग्य दिशा व प्रभावी मार्गदर्शन मिळेल, असा विश्वास सभासदांनी व्यक्त केला. निवडीनंतर बोलताना अजीज नाथानी व संजय जैस्वाल यांनी संस्थांच्या अडचणी प्राधान्याने सोडवून सभासदांच्या हितासाठी कार्य करण्याची ग्वाही दिली.

## मानव सुरक्षा सेवा ट्रस्ट पुसद तालुका अध्यक्षपदी सिद्धार्थ कदम यांची नियुक्ती



पुसद : मानव सुरक्षा सेवा ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष गजानन एस.इंगळे , संस्थापक सचिव अरुण पांडव, संस्थापक कोषाध्यक्ष संगीताताई साबणकर, संस्थापक सहसचिव गोविंद अग्रवाल,राष्ट्रीय प्रमुख राजेशकुमार ठाकूर, राष्ट्रीय सचिव अजय मुळतकर,राष्ट्रीय कार्याध्यक्ष गजानन इंगळे,महाराष्ट्र सचिव रामेश्वर कापडे, महाराष्ट्र संघटक आरिफ खान,महाराष्ट्र महिला उपाध्यक्ष राणीताई पवार,महाराष्ट्र महिला कार्याध्यक्ष वंदनाताई म्हैस,महा.मीडिया प्रमुख समाधान पदमने, विदर्भ अध्यक्ष सुनील गंगाखेडे, विदर्भ उपाध्यक्ष गजानन निळे, विदर्भ सचिव सूर्यकांत राठोड, विदर्भ सहसचिव दत्तात्रय वाघमारे,बुलढाणा जिल्हा अध्यक्ष श्रीकृष्ण लांडे,चिखली तालुका अध्यक्ष गोपाल सोनटक्के तसेच सर्व वरिष्ठ पदाधिकारी यांच्या आदेशानुसार व श्री सुर्यकांत राठोड विदर्भ सचिव यांच्या शिफारशी वरून सिद्धार्थ कदम पुसद तालूका अध्यक्ष पदी निवड करण्यात आली, याबद्दल त्यांचे तालुक्यातून सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## बँकेत दावा न केलेल्या ठेवी परत मिळण्यासाठी विशेष मोहिम

यवतमाळ - रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शनात बँकेत दावा न केलेल्या ठेवी संबंधितांना परत मिळण्यासाठी विशेष मोहिम सर्व बँकांमध्ये राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने जिल्हा अग्रणी बँकेतर्फे दि. 29 डिसेंबर रोजी दुपारी 12 वाजता नियोजनभवनात विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दहा वर्षापेक्षा अधिक काळ बँक, पेंशन, विमा, शेअर, म्युच्युअल फंड आदी ठिकाणी जमा राहिलेल्या व व्यवहार न झालेल्या रकमा रिझर्व्ह बँकेच्या ठेवीदार शिक्षण व जागरूकता निधीमध्ये जमा केल्या जातात. या मोहिमेअंतर्गत अशा बेवारस ठेवी खातेदारांना किंवा त्यांच्या वारसांना परत देण्यात येणार आहेत. दावा करण्यासाठी नागरिकांनी उद्गम पोर्टल किंवा संबंधित बँक/संस्थेच्या संकेतस्थळावर नाव तपासून आवश्यक कागदपत्रांसह खाते क्रमांक, केवायसी इ. संबंधित बँकेत अर्ज करावा. पात्र नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेऊन आपल्या हक्काची रक्कम सव्याज परत मिळवावी, असे आवाहन ज्ञानेश्वर टापरे, जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक यांनी केले आहे.

## शेतातून मोटारपंप लंपास

यवतमाळ : शेतामधील विहिरीवर पाणी देण्याकरिता वापरात असलेला ७ एचपी १२ हजार रुपये किमतीचा मोटारपंप कुणीतरी अज्ञात चोरट्याने पळविला. ही घटना १२ डिसेंबर रोजी दिग्रस तालुक्यातील लाख (रा) शेत शिवारात उघडकीस आली.

# कडाक्याच्या थंडीतही भीमगीतांना उस्फूर्त प्रतिसाद

## सतपल्ली येथे संयुक्त जयंती पुण्यतिथीनिमित्त भव्य समाजप्रबोधन कार्यक्रम

**जनमाध्यम प्रतिनिधी**




पाटणबोरी : झरी जामणी तालुक्यातील सतपल्ली (जि. यवतमाळ) येथे महामाया बुद्ध विहार कमिटी, सतपल्ली यांच्या वतीने भारतीय संविधान अमृत महोत्सव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन, भीमाई निर्वाण दिन तसेच संत गाडगे महाराज पुण्यतिथी अशा संयुक्त जयंती व पुण्यतिथीनिमित्त भव्य समाजप्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या निमित्ताने महाराष्ट्रातील प्रसिद्ध कव्वाल विकास राजा (नागपूर–काटोल) यांच्या भीमगीत व समाजप्रबोधन कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. कडाक्याच्या थंडीची पर्वा न करता नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावत भीमगायनाचा आनंद घेतला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस गावातून भव्य रॅली काढण्यात आली. यावेळी भीमसैनिकांनी हातात झाडू घेऊन संपूर्ण गाव स्वच्छ करत सामाजिक बांधिलकीचे प्रभावी दर्शन घडविले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून झरी तालुक्याचे तहसीलदार अक्षय रासने तसेच पाटण पोलीस स्टेशनचे निरीक्षक स्वप्नील ठाकरे उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून विश्वजीत कांबळे, श्यामराव मुनेश्वर सर, प्रवीणजी गांजरे सर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. विशेष उपस्थितीत ग्रामपंचायत सतपल्लीचे सर्व पदाधिकारी, पोलीस पाटील नरसिंगराव चंदावार, तंटामुक्ती अध्यक्ष गोवर्धन मेंगावार यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जितेंद्र निमसरकर यांनी केले, तर सूत्रसंचालन अजय निमसरकर यांनी केले. महामाया बुद्ध विहार कमिटीच्या अध्यक्षा उपासिका वंदनाताई धोटे, उपाध्यक्ष सीमाताई हस्ते, कोशाध्यक्ष कुसुमताई देवतळे, सचिव कांताताई बोरकर, तसेच मीराबाई पाटील यांची उपस्थिती होती. महामाया बुद्ध विहारासाठी मा. रविंद्रजी कांबळे (यवतमाळ) यांच्या वतीने बुद्ध मूर्ती भेट देण्यात आली. समाजाच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले. विहाराच्या सौंदर्यीकरणासाठी झरी तालुक्यातील प्रसिद्ध चित्रकार व ऑल इंडिया पँथर सेना तालुकाध्यक्ष प्रशांत निमसरकर यांनी आपल्या चित्रकलेतून विहाराला आकर्षक देखावा दिला. तसेच माहेरच्या लेकींकडून विहारास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मूर्ती भेट देण्यात आली. या संपूर्ण कार्यक्रमासाठी समाजातील जेष्ठ, युवक व लहानग्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. ज्ञानबाजी धोटे, बाबाराव कानिंदे, गौतम हस्ते, गुनवंत धोटे, तुकाराम धोटे, अमोल धोटे, भीमराव धोटे, प्रकाश कानिंदे, प्रकाश निमसरकर, विलास निमसरकर, जीवन पाटील, मधुकर भोवरे, महादेव धोटे, ज्योतिपाल भोवरे, सुरज पाटील, राहुल बोरकर, खुशाल भोवरे, प्रमोद पाटील, हेमंत गायकवाड, राहुल हस्ते, खटेश्वर धोटे, कैलास निमसरकर, तुषार हस्ते, संस्कार येरमे, सुमित येरमे, शशील सिडाम, अविनाश गेडाम, देवेंद्र दुरलावार, चंदू आदींनी कार्यक्रम यशस्वी केला.

## डॉ. सरनाईक यांच्या कार्यातून नव्या पिढीला प्रेरणा : प्रा. नारायण क्षिरसागर

# पुसद येथे ३७ वा स्मृतिदिनाला अनेकांची उपस्थिती

**जनमाध्यम प्रतिनिधी**



डॉ. भाऊसाहेब सरनाईक

पुसद - डॉ. भाऊसाहेब सरनाईक हेजुन्या काळातील आरोग्य सेवेचे खरे वारकरी होते. अतिशय माफक दरात ते रुग्णांवर उपचार करीत. जनतेची आरोग्यसेवा हीच त्यांची जीवननिष्ठा होती. डॉ. सरनाईक यांच्या कार्यातून नव्या पिढीला समाजसेवेची प्रेरणा मिळते, असे विचार डॉ. भाऊसाहेब सरनाईक स्मृती प्रतिष्ठानचे संचालक प्रा. नारायण क्षिरसागर म्हणाले.

जुन्या पिढीतील प्रख्यात धन्वंतरी, पुसद नगरपालिकेचे माजी अध्यक्ष, थोर विदर्भवादी नेते, निर्भीड पत्रकार तसेच ग्रंथालय चळवळीचे जनक डॉ. दत्तात्रय शंकर उर्फ भाऊसाहेब सरनाईक यांच्या ३७ व्या स्मृतिदिनानिमित्त मंगळवारी २३ डिसेंबर रोजी येथील टिळक नगरातील दत्तकमल रेसिडेन्सी येथे आदरांजली कार्यक्रम घेण्यात आला, यावेळी प्रा. क्षिरसागर बोलत होते. ते पुढे म्हणाले, साप्ताहिक 'ज्वालामुखी'च्या माध्यमातून त्यांनी कणखर व निर्भीड पत्रकारिता केली. लोकनायक बापूजी यांच्यासोबत विदर्भ चळवळीत ते अग्रभागी होते. विदर्भात ग्रंथालय चळवळ रुजविण्यात त्यांचे योगदान मोलाचे असून, त्यामुळेच ते 'ग्रंथालय चळवळीचे जनक' म्हणून ओळखले जातात. डॉ.भाऊसाहेब सरनाईक हे थेट जनतेतून निवडून आलेले पुसद नगरपालिकेचे अध्यक्ष होते. त्यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळातच पुसद नगरपालिकेची भक्कम इमारत उभारण्यात आली, ही बाब त्यांच्या दूरदृष्टीचे द्योतक असल्याचेही प्रा.नारायण क्षिरसागर यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ. भाऊसाहेब सरनाईक यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करण्यात आली. यावेळी दिवाकर सरनाईक, अभिजीत, श्रीकांत, विश्वजीत व सरनाईक परिवारातील सदस्य, वसंतराव पाटील कान्हेकर, ॲड. आशिष देशमुख, दिगंबर जगताप, विश्व हिंदू परिषदेचे भारत पेन्शनवार, डॉ. अकिल मेमन, निशांत बयास, विठ्ठल खडसे, सुधीर देशमुख, सुधाकर जोशी, डॉ. पंकज जयस्वाल, धनंजय अत्रे, अजय पुरोहित, विनोद जिल्हेवार, गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष रवी देशपांडे, मिलिंद उदेपूरकर, प्रा. दिनकर गुल्हाने, विवेक जोशी, ऋषिकेश जोशी, प्रदीप देशपांडे, ऋषिकेश देशपांडे, श्रीकांत समुद्रे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. भाऊसाहेब सरनाईक यांचे समाजसेवा, आरोग्य, पत्रकारिता आणि विदर्भ चळवळीतील योगदान आजच्या पिढीला प्रेरणादायी असून, त्यांच्या कार्याची स्मृती समाजात सदैव जागी राहील, असे मत यावेळी उपस्थितांनी व्यक्त केले. प्रास्ताविक श्रेया सरनाईक यांनी केले.

# जिजाऊ जन्मोत्सव २०२६ नियोजनासाठी मराठा सेवा संघाची बैठक संपन्न

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : मंगळवार, दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी जिजाऊ जन्मोत्सव २०२६ च्या पार्श्वभूमीवर मराठा सेवा संघ व सर्व कक्षांची नियोजन सभा यवतमाळ जिल्हाध्यक्ष शिवश्री ज्ञानेश्वर गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

या बैठकीत जिजाऊ जन्मोत्सव २०२६ हा शिवतीर्थ, यवतमाळ येथे भव्य स्वरूपात आयोजित करण्याबाबत सविस्तर चर्चा करून नियोजन करण्यात आले. तसेच मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे दि. १२ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्यास यवतमाळ जिल्ह्यातून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी मराठा सेवा संघाच्या 'शिवधर्म दिनदर्शिका २०२६' चे विमोचन करण्यात आले. त्याचप्रमाणे 'चलो सिंदखेडराजा, चलो सिंदखेडराजा' व 'एकच वारी सिंदखेड वारी' या यवतमाळ जिल्ह्याच्या पत्रकाचे विमोचन व वितरण करण्यात आले. बैठकीत येत्या २७ डिसेंबर रोजी साजरी होणाऱ्या भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख जयंती कार्यक्रमाबाबतही चर्चा करण्यात आली. या सभेला मराठा सेवा संघाचे माजी जिल्हाध्यक्ष शिवश्री साहेबराव जुनघरे, चंद्रशेखर कुडूपले, जिल्हासचिव शशिकांत खडसे, हरीश कुडे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अभिलाष खंडारे, उद्योग कक्षाचे जिल्हाध्यक्ष योगीराज अरसोड, सतीश काळे, जिजाऊ जन्मोत्सव समितीचे अंकुश वानखेडे, अजय गावंडे, शरद गायधने, प्रा. पंढरी पांडे, शोभा पारधी, दिलीप चौधरी, युवा सेनेचे प्रद्युम्न जवळेकर, मैत्री संघटनेचे चंद्रशेखर आगलावे, तुळशीराम लांडगे, स्नेहल रेचे, संभाजी भिवकर, दत्तू पारधी, रणजीत गायकवाड, साधना गायकवाड, मालतीताई गोडसे, रेखा चव्हाण आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ईव्हीएमवर संशय ; प्रभाग २३ (अ) ची फेरनिवडणूक घ्यावी, उमेदवार विनोद दोंदल यांची मागणी


**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - यवतमाळ नगरपरिषद निवडणुकीतील प्रभाग क्रमांक २३ (अ) ना.मा.प्र. निवडणूक प्रक्रियेवर गंभीर संशय व्यक्त करत वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार विनोद मोहनराव दोंदल यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार अर्ज सादर केला आहे. निवडणूक प्रक्रियेवर विश्वास राहिलेला नसल्याने सदर प्रभागाची निवडणूक बॅलेट पेपरवर नव्याने घेण्यात यावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे.दि. २० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ८ ते ११ या वेळेत यवतमाळ पब्लिक स्कूल (YPS) येथील रूम क्रमांक ६ मधील ईव्हीएम मशीन दोन वेळा बंद पडली.

मशीनचे बटन कार्यरत नसल्यामुळे मतदान प्रक्रिया ठप्प झाली होती. या काळात उमेदवार अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित नसताना बाहेरून आणलेल्या ईव्हीएम मशीन बदलण्यात आल्याचा गंभीर आरोप दोंदल यांनी केला आहे. सदर बदल प्रक्रियेत पारदर्शकता न पाळल्याने छेडछाड किंवा सेटिंग झाल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. आपल्या परिसरातील विश्वासातील मतदारांनी मतदान केले असतानाही अपेक्षेपेक्षा अत्यल्प म्हणजे केवळ ११९ मते मिळाल्याने ईव्हीएमच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रिया संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.मतदानाच्या वेळेत ईव्हीएम बदलताना झालेले सकाळी ८ ते ११ या वेळेतील सीसीटीव्ही फुटेज तात्काळ उपलब्ध करून द्यावे, जेणेकरून न्यायालयीन कारवाई करता येईल, अशी मागणीही त्यांनी केली आहे. तसेच सदोष निवडणूक प्रक्रिया राबविल्याबद्दल झोनल अधिकारी व अधिनस्त कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी अर्जात करण्यात आली आहे. प्रशासनाकडून फेरनिवडणुकीबाबत अडचणी असल्यास तसे लेखी स्वरूपात कळवावे, अन्यथा न्यायालयात दाद मागणार असल्याचे दोंदल यांनी स्पष्ट केले आहे. या प्रकरणाची प्रत जिल्हा निवडणूक अधिकारी, राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र तसेच भारताच्या मुख्य निवडणूक आयोगाकडे पाठविण्यात आली असून या तक्रारीमुळे प्रभाग २३ (अ) मधील निवडणूक प्रक्रियेवर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

# राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमात २८ बालकांची विनामूल्य शस्त्रक्रिया करणार

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाअंतर्गत शिवनेरी बाल रूग्णालय व कार्डियाक सेंटर येथे 2 डी ईको तपासणी शिबिरात 0 ते 18 वयोगटातील एकूण 79 बालके व विद्यार्थ्यांची हृदयरोग तपासणी करण्यात आली. त्यात एकूण 28 विद्यार्थ्यांची शस्त्रक्रिया आवश्यक असल्याचे आढळल्यावरून या सर्व विद्यार्थ्यांवर राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम, तसेच विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून विनामूल्य हृदयरोग शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

सावंगी मेघे येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयाचे बालहृदयरोग तज्ञ डॉ. शंतनू गोमासे (कार्डियोलॉजिस्ट) यांच्या मार्गदर्शनाखाली तपासणी करण्यात आली. तपासणीतून या शिबिरास जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुखदेव राठोड, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. रमेश मांडण व डॉ. अनिल आखरे (बालरोग तज्ञ) आदी उपस्थित होते. तसेच आरबीएसके जिल्हा पर्यवेक्षक कृणाल पिसोळे, सांख्यिकी अन्वेषक बळीराम राठोड व आरबीएसकेचे अधिकारी व कर्मचारी यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. जिल्ह्यात अंगणवाडी स्तरावरील 0 ते 6 वयोगटातील बालके तसेच शासकीय व निमशासकीय शाळांमधील 7 ते 18 वयोगटातील विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी करण्यात येते. तपासणीदरम्यान आढळणाऱ्या संशयित आजारांवर वेळेवर सेवा देऊन योग्य उपचार उपलब्ध करून दिले जातात. जिल्ह्यात एकूण 43 आरबीएसके पथकांमार्फत ही तपासणी मोहीम राबविण्यात येत असून, प्रत्येक पथकामध्ये एक पुरुष व एक महिला वैद्यकीय अधिकारी, एक औषध निर्माण अधिकारी व एक परिचारिका यांचा समावेश आहे.

# तिबेट–भारत संबंध आणि आंबेडकरी विचारांवर प्रबोधनात्मक व्याख्यान

**जनमाध्यम प्रतिनिधी**


यवतमाळ : तिबेट–भारत संबंध तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समता, न्याय व मानवाधिकारविषयक विचारांवर आधारित एक महत्त्वपूर्ण प्रबोधनात्मक कार्यक्रम आज आयोजित करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या समता सैनिक दल (SSD) यवतमाळ शाखेच्या वतीने तसेच नवी दिल्ली येथील भारत–तिबेट समन्वय केंद्र (इंडिया टिबेट कोऑर्डिनेशन ऑफिस – ITCO) यांच्या संयुक्त विद्यमाने हे जाहीर व्याख्यान होत आहे.

हा कार्यक्रम बुधवार, २५ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० वाजता वाघापूर, यवतमाळ येथील रमाई सांस्कृतिक भवन येथे संपन्न होणार आहे. कार्यक्रमात 'तिबेट आणि भारत यांचे ऐतिहासिक संबंध' या विषयावर ताशी देकी (समन्वयक, ITCO, नवी दिल्ली) मार्गदर्शन करणार असून, 'तिबेट आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका' या विषयावर प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते धम्मा कांबळे (यवतमाळ) आपले विचार मांडणार आहेत. कार्यक्रमाच्या सत्कारमूर्ती म्हणून मीरा रामदास वीर (अध्यक्ष, धम्मज्योती महिला मंडळ, वाघापूर) उपस्थित राहणार आहेत. तर रामदास बनकर (अध्यक्ष, भीमज्योती चॅरिटेबल ट्रस्ट, यवतमाळ) आणि अशोक ताकसांडे (अध्यक्ष, समता सैनिक दल, यवतमाळ) हे प्रमुख अतिथी म्हणून लाभणार आहेत. प्रास्ताविक राजेश जुनगरे, संचालन सतिश सोनोने तर आभार प्रदर्शन निलीमा गुजर करणार आहेत. तिबेटच्या स्वातंत्र्य, मानवाधिकार व सांस्कृतिक अस्तित्वाच्या लढ्याला आंबेडकरी विचारांशी जोडणारा हा कार्यक्रम समाजप्रबोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार असून, आयोजकांनी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

# चेक अनादरप्रकरणी तीन महिन्यांची शिक्षा

## २ लाख १० हजार रूपये नुकसान भरपाई देण्याचा आदेश

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद : हातउसने घेतलेल्या पैशाची मागणी केली असता परतफेडीसाठी दिलेला धनादेश अनादरित झाल्याने तसेच हा गुन्हा सिद्ध झाल्याने आरोपी शंकर पदमावार यास न्यायालयाने ३ महिन्यांची शिक्षा, तसेच २ लाख दहा हजार रुपये नुकसान भरपाईचा आदेश दिला. नुकसान भरपाईची रक्कम न दिल्यास अतिरिक्त एक महिना शिक्षा भोगण्याबाबतही आदेश करण्यात आला आहे.

विशेष न्याय दंडाधिकारी प्रथम श्रेणी पुसद क्र. २ न्यायालयाच्या न्यायाधीश बिरहारी यांनी मंगळवार २३ डिसेंबर रोजी ही शिक्षा व दंडाचा हा निकाल दिला. पुसद येथील पद्मावार साडीजचे शंकर बाळाभाऊ पदमवार यांचे शिवाजी वार्डमध्ये मेकॅनिकल वर्कशॉप करणारे व्यवसायी दिलीप सुखराज कनोजे यांचेसोबत मित्रत्वाचे संबंध होते. हात उसनवार म्हणून शंकर पदमवार यांनी दिलीप कनोजे यांच्याकडे दीड लाख रुपयांची मागणी केली सदरहू हात उसनवार दिलेल रक्कम परत मागितल असता दिलीप कनोजे यांना शंकर पद्मावार यांनी धनादेश दिला. बँकेत वटविण्याकरीता टाकला असता अपूर्ण निधी अभावि सदर चेक अनादरित झाल्याने दिलीप कनोजे यांनी आरोपी शंकर पदमवार यांचे विरुद्ध एनआय ॲक्टचे कलम १३८ अनुसार चेक अनादरण प्रकरण न्यायालयात दाखल केले होते या प्रकरणात फिर्यादी दिलीप कनोज यांचे तर्फे ॲड. सतीश भंडारी तथा त्यांचेच सहकारी ॲड. सविता आढाव,ॲड. नगराळे यांनी काम पाहिले.

# अचलपूर नगर परिषद उपाध्यक्षपदी व स्वीकृत नगरसेवकपदी कोणाची होणार निवड

## काँग्रेसकडे सर्वाधिक १५ नगरसेवक

**अचलपूर/वार्ताहर**

अमरावती जिल्ह्यातील अ वर्ग दर्जा असलेली अचलपूर नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आहे .यामध्ये अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष पदी भाजपा पक्षाचे रुपाली माथने यांची निवड झाली आहे .तर दुसरीकडे एकूण २० प्रभागातून ४१ नगरसेवकांची निवड करण्यात आली आहे.यामध्ये काँग्रेस कडे सर्वाधिक १५ नगरसेवक असून भाजपा पक्षाचे ९ नगरसेवक , एम. आय. एम चे ३ ,प्रहार चे २ ,राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट ) २ आणि १० अपक्ष नगरसेवकांची संख्या आहे .यामुळे अचलपूर नगर परिषदेचा ४ स्वीकृत नगरसेवक पदी आणि उपाध्यक्ष पदी कोणाची निवड होणार ? याकडे सर्वांची लक्ष लागलेले आहे.



एकीकडे काँग्रेस पक्षाचे १५ नगरसेवक निवडून आले आहे.सोबतच एम. आय. एम चे ३ , राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गटाचे ) २ असे एकूण २१ नगरसेवक म्हणून अल्पसंख्याक समाजातील आहे. यामुळे उपाध्यक्ष पदी काँग्रेस पक्षाचा पारडा जड आहे.तर दुसरीकडे ४ स्वीकृत नगरसेवक पदासाठी काँग्रेस पक्षांकडून कोणाची वर्णी लागते ? तर भाजपा पक्षाकडून १ स्वीकृत नगर सेवक पदासाठी कोणाला संधी दिली जाते ? सोबतच उर्वरित १ नगरसेवक पदासाठी प्रहार व अपक्ष नगरसेवक कोणाला संधी देतात ? याबाबत विविध चर्चांना उधाण आले आहे.हे सर्व चित्र लवकरच स्पष्ट होणार आहे.एकीकडे अचलपूर नगर परिषद नगरसेवक पदाच्या निवडणुकीत काही माजी नगरसेवकांचा कमी मतांनी पराभव झालेला आहे .यामुळे अनुभवी माजी नगरसेवकाना स्वीकृत नगरसेवक पदासाठी निवड केली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**ती निविदा आली चर्चेत..**

अचलपूर नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकाचां निकाल २१ डिसेंबर रोजी जाहीर झाला दुसऱ्या दिवशी एका वर्तमान पत्रात अचलपूर नगर परिषद प्रशासनाची स्वच्छ महाराष्ट्र नागरी अभियान (२.० ) अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन स्थळी जुन्या साठवलेल्या कचऱ्याची लावण्याची ९ कोटी ९० लक्ष रक्कमाची निविदा प्रकाशित झाली.मात्र अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष व नगरसेवकांचे पदग्रहण सोहळा झालेले नाही .यामुळे निकाल जाहीर झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ही निविदा प्रकाशित करण्यात अचलपूर न. प प्रशासनाने दाखवलेली अती घाई बाबत अनेक चर्चा सुरू आहे.एकीकडे जुळ्या शहरात प्रशासक म्हणून जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी धीरज कुमार गोहाड यांनी कधी ही पुढाकार न घेता अती घाई केलेली नसल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी दिल्या आहे .

चर्चेत असलेल्या त्या निविदा संदर्भात प्रतिक्रिया घेण्यासाठी आमच्या प्रतिनिधीने अचलपूर नगर परिषद प्रशासक धीरजकुमार गोहाड यांना मोबाईल द्वारे संपर्क केला असता संपर्क होऊ शकला नाही.आणि या प्रकरणी प्रतिक्रिया घेण्यासाठी अचलपूर नगर परिषद माजी नगरसेवक अभय माथने यांना सुद्धा संपर्क केला असता संपर्क झालेला नाही.

## माळवेशपुरा परिसरातील नागरिकांनी दाखविली भूतदया

**अचलपूर/वार्ताहर**



शहरातील माळवेशपुरा परिसरात एका माकडाचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला. या माकडाच्या मृत्यूनंतर परिसरातील नागरिकांनी त्याच्यावर विधीवत अंत्यसंस्कार केले. अशीच एक मनाला स्पर्श करणारी घटना अचलपूर शहरातील माळवेशपुरा परिसरात घडली आहे.

शहरातील माळवेशपुरा परिसरात निकेश शिंगणे यांच्या घराजवळ २४ डिसेंबर रोजी सकाळी ८ चां सुमारास एका माकडाला वीजेचा धक्का लागून तो जमिनीवर पडला .त्यानंतर काही कुत्र्यांनी त्यांचा वर हल्ला केला.यावेळी निकेश शिंगण,दीपक रघुवंशी ,सारंग पेंडसे,अनुप शुक्ला आदी नी त्या माकडाची या हल्ल्यातून सुटका केली. पशू वैद्यकीय कर्मचारी कडून त्या माकडावर उपचार ही करण्यात आले . मात्र त्या माकडाचा मृत्यू झाला होता.यानंतर परिसरात शोककळा पसरली.त्यानंतर धार्मिक रिवाजानुसार त्याची पूजा देखील करण्यात आली.परिसरात एका खोदलेल्या खड्ड्यात रितीरिवाजानुसार माकडाचे अंत्यविधी करण्यात आले.यावेळी सामाजिक कार्यकर्ते निकेश शिंगणे ,दीपक रघुवंशी,सारंग पेंडसे ,अनुप शुक्ला,रवी रोही ,सागर पुरोहित आदी उपस्थित होते.

## रघुवीर स्वीट्स अँड नमकीनला'बेस्ट डिझाइन स्वीट अवॉर्ड'

### दिल्लीमध्ये अमरावतीचा मान उंचावला

**अमरावती/का.प्र.**




मिठाई व नमकीन उद्योगात आपली वेगळी आणि भक्कम ओळख निर्माण करणाऱ्या रघुवीर स्वीट्स अँड नमकीन यांनी पुन्हा एकदा उत्कृष्टतेचा ठसा उमटवला आहे. दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित वर्ल्ड मिठाई अँड नमकीन फेडरेशन द्वारा आयोजित एक्स्पो मध्ये रघुवीर स्वीट्स अँड नमकीन यांना 'बेस्ट शेप (डिझाइन)' या श्रेणीत 'बेस्ट शेप (डिझाइन) स्वीट अवॉर्ड' प्रदान करण्यात आला.

हा मानाचा पुरस्कार के. एपी. ग्रुप (फाब्री १९०५) चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. पुनीत दुग्गल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या सन्मानामुळे रघुवीर स्वीट्स अँड नमकीन यांनी केवळ गुणवत्तेतच नव्हे, तर नवकल्पना आणि सर्जनशील सादरीकरणातही आपली श्रेष्ठता सिद्ध केली आहे.या सोहळ्यात मिठाई व अन्नउद्योग क्षेत्रातील नामवंत तज्ज्ञांची निर्णायक मंडळ म्हणून उपस्थिती होती. या निर्णायक मंडळामध्ये अंकित चावला, डॉ. शेफ परविंदर सिंग बाली तसेच श्री. हितेश त्रिपाठी यांचा समावेश होता. या तज्ज्ञांनी रघुवीर स्वीट्स अँड नमकीनच्या मिठाईचा आकार, सादरीकरण, नवाचार आणि गुणवत्तेचे विशेष कौतुक केले.

**रघुवीर परिवाराच्या युवा पिढीचे प्रतिनिधित्व**

या ऐतिहासिक प्रसंगी रघुवीर स्वीट्स अँड नमकीनतर्फे तेजस पोपट, प्रियेश पोपट आणि मोहित पोपट यांनी रघुवीर परिवाराच्या युवा पिढीचे प्रतिनिधित्व करत कार्यक्रमात उपस्थिती दर्शवली. युवा नेतृत्वाची ही सक्रिय सहभागिता म्हणजे परंपरेसोबतच आधुनिक विचारसरणी आणि नवकल्पनांचा वारसा पुढे नेण्याची रघुवीर परिवाराची ठाम भूमिका दर्शवते.

**गुणवत्ता, नवकल्पना आणि परिचयाचे प्रतीक**

'बेस्ट शेप (डिझाइन) स्वीट अवॉर्ड' मिळणे हे रघुवीर स्वीट्स अँड नमकीनच्या दीर्घकाळच्या मेहनतीचे, गुणवत्तेबाबतच्या कटिबद्धतेचे आणि ग्राहकांच्या विश्वासाचे फलित आहे. हा पुरस्कार याचा पुरावा आहे की रघुवीर स्वीट्स अँड नमकीन हे केवळ चवीपुरते मर्यादित नसून, सादरीकरण आणि सर्जनशीलतेतही देशातील अग्रगण्य संस्थांमध्ये गणले जातात.

राष्ट्रीय स्तरावर मिळालेल्या या सन्मानामुळे रघुवीर स्वीट्स अँड नमकीनचे नाव उज्ज्वल झाले असून, संपूर्ण अमरावती परिसराचा अभिमान वाढला आहे.ही यशोगाथा येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारी असून, समर्पण, गुणवत्ता आणि नवकल्पनांच्या जोरावर जागतिक ओळख निर्माण करता येते, हेच या यशातून अधोरेखित होते. रघुवीर परिवाराला मिळालेले हे यश मिठाई व नमकीन उद्योगात निश्चितच एक नवा आदर्श निर्माण करेल.

## संत गाडगेबाबांच्या दशसूत्रीचा दीप उजळवणारे श्रीरामचंद्र संस्थान– विवेक गुल्हाने

### पुण्यतिथीनिमित्य गरजूंना ब्लँकेटचे वितरण

**नांदगाव पेठ/वार्ताहर**

संत गाडगेबाबांनी समाजाला दिलेली स्वच्छता, शिक्षण, व्यसनमुक्ती व मानवसेवेची दशसूत्री आजच्या काळातही तितकीच मार्गदर्शक आहे. याच विचारांचा वारसा जपत श्रीरामचंद्र संस्थान, नांदगाव पेठ यांच्या वतीने राबविले जाणारे सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी उपक्रम हे संत गाडगेबाबांच्या कार्याची जिवंत साक्ष ठरत आहेत, असे प्रतिपादन भाजपा चे जिल्हा उपाध्यक्ष विवेक गुल्हाने यांनी केले.

संत गाडगेबाबांनी दिलेली दशसूत्री ही केवळ उपदेश नसून समाज उभारणीचा ठोस आराखडा आहे. श्रीरामचंद्र संस्थानचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम श्रीरामचंद्र मंदिरात भक्तिमय वातावरणात पार पडला.यावेळी कार्यक्रमाला शांताबाई शेंदरकर, सुरेशराव शेंदरकर, पंजाबराव क्षीरसागर, सुखदेवराव कापडे गुरुजी, भाजपा तालुकाध्यक्ष वीरेंद्र लंगडे, भाजयुमो तालुकाध्यक्ष विजय भुयार यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्रीरामचंद्र संस्थानच्या वतीने यावेळी शंभरपेक्षा अधिक गरीब व गरजू नागरिकांना मान्यवरांच्या हस्ते ब्लँकेटचे वितरण करण्यात आले. विशेष म्हणजे, या सामाजिक कार्यात भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष विवेक गुल्हाने यांनी वैयक्तिक पुढाकार घेत ४० ब्लँकेटचा सहभाग देत उपक्रमाला मोलाचा हातभार लावला. या सेवाभावी उपक्रमाचे उपस्थित नागरिकांनी मनापासून कौतुक केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांनी संत गाडगेबाबा यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत, त्यांच्या विचारांची आजच्या समाजाला अधिक गरज असल्याचे नमूद केले.'संत गाडगेबाबा हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते लोकशिक्षणाचे चालते-बोलते विद्यापीठ होते.यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मंदिरात महाआरती करण्यात आली तसेच भाविकांना रामखिचडीचे वाटप करण्यात आले.संपूर्ण कार्यक्रमात 'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला' च्या गजराने वातावरण भक्तिमय झाले होते. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.या कार्यक्रमाला गावातील तसेच बाहेरगावावरून महिला व पुरुष मंडळी उपस्थित झाले होते.

# जयपूर फुट मुळे दिव्यांगांच्या जीवनाला नवी दिशा-अनिल अग्रवाल

### उमेद-पंख-विश्वासाचे,३०० दिव्यांगाना जयपूर फुटचे वितरण

**अमरावती/का.प्र.**



सर्वसामान्य प्रमाणे जीवन जगता यावे म्हणून दिव्यांगाकरिता जयपूर फूट कृत्रिम अंगरोपण अवयव नि:शुल्क देऊन आयोजकांनी समाजासमोर मोठा आदर्श निर्माण केला आहे. जयपुर फूट मुळे सर्वसामान्यांच्या जीवनाला नवी दिशा मिळाली आहे असे प्रतिपादन अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा दैनिक मंडल आपली मातृभूमीचे प्रबंध संपादक अनिल अग्रवाल यांनी केले.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या विशेष पुढाकारातून 'उमेद-पंख-विश्वासाचे' या सामाजिक उद्देशाने दिव्यांग बांधवांसाठी नि:शुल्क जयपुर फुट वितरणाचा उपक्रम डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय अमरावती, इंडियन रेड क्रॉस सोसायटी अकोला, जयपुर फुट उपक्रमाचे प्रणेते आर्किटेक्ट रामेश्वर मणियार (पुणे) आणि दि अंबादास खोब्रागडे आर्ट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे. निःशुल्क कृत्रिम अवयव वाटपाच्या आज तिसऱ्या दिवशी एकुण १०० दिव्यांगांना जयपूर फुटचे वाटप करण्यात आले. आतापर्यंत एकूण ३०० दिव्यांगांना कृत्रिम अवयव वाटप करण्यात आले. तिसऱ्या दिवशी वाटपाचा शुभारंभ अनिल अग्रवाल यांच्या हस्ते झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सरचिटणीस प्रफुल्ल घवळे, अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, प्रशासकीय अधिकारी डॉ. स्वप्निल मोहोड,जयपुर फुट उपक्रमाचे प्रणेते आर्किटेक्ट रामेश्वर मनियार, दि अंबादास खोब्रागडे आर्ट फाऊंडेशनच्या अध्यक्ष आर्टिस्ट रजनी अंबादे, आकाश अंबादे, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना अनिल अग्रवाल यांनी सांगितले की समाजामध्ये खूप गरजू लोक आहेत. परंतु त्यांना अशा प्रकारच्या समाजसेवेतून मदत करणे शक्य होते. श्री शिवाजी शिक्षण संस्थेने कृत्रिम अवयव निशुल्क देण्याचा हा उपक्रम राबवून चांगले कार्य केले आहे. यासाठी सर्वच आयोजकांना त्यांनी धन्यवाद दिले. दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अंगरोपण दान करणे ही मोठी सेवा असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आर्किटेक रामेश्वर मणियार यांनी केले. संचालन किशोर इंगळे यांनी तर आभार प्रदर्शन अधिष्ठाता डॉ.ए.टी देशमुख यांनी केले. कार्यक्रमाला डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉक्टर, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**अमूर्त चित्र प्रदर्शनाला सदिच्छा भेट**

जागतिक स्तरावर आपल्या अनोख्या कलेने स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या प्रसिद्ध चित्रकार अंबादासजी खोब्रागडे आर्ट फाउंडेशनचे अध्यक्ष रजनी अंबादे यांच्या अमूर्त चित्र या आठ प्रदर्शनी प्रदर्शनीला संपादक अनिल अग्रवाल यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी आर्टिस्ट रजनी अंबादे यांनी अनिल अग्रवाल यांना प्रदर्शनीत लावलेल्या सर्व चित्रांची माहिती दिली. छत्रपती शिवाजी महाराज सभागृह पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय येथे आयोजित करण्यात आलेली ही प्रदर्शनी खरोखरच खूप सुंदर असून त्यामध्ये नाविन्यपूर्ण असे चित्रांची प्रशंसा केली. ही कलाकृती अंतर्मुख करणारी असून अमरावतीकरांनी या प्रदर्शनीला आवर्जून भेट द्यावी असेही त्यांनी आवाहन केले.

## संक्षिप्त

### शिष्यवृत्तीचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदत

**अमरावती-**शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या पाच वर्षांच्या कालावधीतील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्ती अर्ज तातडीने निकाली काढण्याची सूचना समाज कल्याण विभागाने दिली आहे. महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले हे अर्ज मंजूर किंवा नामंजूर करण्यासाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली असून, त्यानंतर प्रलंबित राहणाऱ्या अर्जांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांची असेल, असा कळविण्यात आले आहे.समाज कल्याण सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी आवाहन केले आहे की, महाविद्यालयांनी आपल्या स्तरावर प्रलंबित असलेल्या अर्जांची त्रुटीपूर्तता करून घ्यावी. ज्या अर्जांची त्रुटीपूर्तता होणे शक्य नाही, ते अर्ज नियमानुसार 'रिजेक्ट' करावेत. सन २०२४-२५ आणि २०२५-२६ या शैक्षणिक वर्षांचे शंभर टक्के अर्ज नोंदणीकृत करण्यासाठी महाविद्यालयातील सूचना फलक,व्हॉट्सअॅप ग्रुप आणि 'समान संधी केंद्रा'चा प्रभावी वापर करावा. मुदतीनंतर महाडीबीटी अॅडमिनकडून अर्ज 'ऑटो रिजेक्ट' झाल्यास त्याची जबाबदारी प्राचार्यांची निश्चित केली जाईल, असेही या कळविण्यात आले आहे.

### प्रा. स्वाती ठाकरे यांना आचार्य पदवी



**अमरावती-**स्वातंत्र्य कनिष्ठ महाविद्यालय, रुरल इंस्टीटयूट येथील प्रा. स्वाती सुभाषराव ठाकरे (महल्ले) यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठतर्फे, गणित विषयात आचार्य (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी डॉ. व्ही. ए. ठाकरे यांच्या मार्गदर्शनात 'स्टडी ऑफ फिजिकल बिहेवियर ऑफ हायर डायमेंशनल कॉसमॉजिकल मॉडेल्स इन थेअरिज ऑफ ग्राव्हिटेशन' या विषयावर आपला प्रबंध सादर केला होता. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय मार्गदर्शक डॉ. व्ही. ए. ठाकरे, डॉ. आर. व्ही. मापारी, शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, सचिव वि. गो. ठाकरे तसेच संस्थेचे सर्व कार्यकारणी, महाविद्यालयाच्या प्राचार्या पी. एस. मोहड, महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पती प्रा. सुहास सुरेश महल्ले, आई-वडील, सासु-सासरे, मुलगा सान्निध्य, मुलगी स्वानंदी व कुटुंबातील सर्व सदस्यांना दिले.

### विद्यापीठातील संस्कृत विभागाचे दोन विद्यार्थी गुणवत्ता यादीत

**अमरावती -**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील संस्कृत विभागाच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत प्रथम व द्वितीय येण्याचा मान पटकावून विद्यापीठाचे तसेच संस्कृत विभागाचे नाव उंचावले. अमृता कोरडे प्रथम, तर डॉ.राजीव मुलमुले यांनी व्दितीय स्थान प्राप्त केले. 'असाध्य ते साध्य करीसी कारण सायास तुका म्हणे' या ओवी प्रमाणे दोन्ही विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी व प्रचंड मेहनत करून दाखवून दिले आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विभागाच्या समन्वयक डॉ. संयोगिता देशमुख, प्रा. डॉ. राहुल लोधा, प्रा. स्वप्ना यावले, प्रा. श्वेता बडगुजर, प्रा.प्रियंका गावंडे, प्रा. आकाश हरणे, तसेच शिक्षकेतर कर्मचा-यांनी अभिनंदन केले.




### डॉ. पंजाबराव देशमुख रूग्णालयाला एन.ए.बी.एच. मुल्यांकन



**अमरावती-**श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मोर्शी रोड, अमरावतीला वैद्यकीय क्षेत्रातील एन.ए.बी.एच. मुल्यांकन संस्था, नवी दिल्ली यांचेकडून एनएबीएच प्री एन्ट्री लेव्हल मुल्यांकन प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. सदर प्रमाणपत्र मिळणे महाविद्यालय व रुग्णालयासाठी अतिशय आनंदाची व महत्वाची बाब आहे. कारण हे प्रमाणपत्र अशा वैद्यकीय संस्थाना दिले जाते ज्यांच्याकडे औषधोपचाराच्या सर्व सोयी-सुविधा उत्तम दर्जाच्या असतात. सदर प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याकरीता अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, वैद्यकीय अधिक्षक डॉ. पवन टेकाडे, वैद्यकीय उपअधिक्षक डॉ. सोमेश्वर निर्मळ, रूग्णालय व्यवस्थापक डॉ. श्रीकांत फुटाणे, ऋग्वेद देशमुख तसेच लिपीक किशोर इंगोले, अर्पित वानखडे, शंतनू वानखडे यांनी अथक परिश्रम घेऊन या कार्यास आपले मोलाचे योगदान दिले आहे.श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन प्र. देशमुख तसेच सन्माननीय पदाधिकारी व सदस्य यांनी एनएबीएच मुल्यांकन प्राप्त झाल्याबद्यल महाविद्यालय व रुग्णालय प्रशासनाचे अभिनंदन केले आहे.

### न्यू हायस्कूल मेन शाळेतील वार्षिक स्नेहसंमेलन



**अमरावती -**न्यू हायस्कूल मेन शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या माजी अध्यक्षा डॉ. मायाताई शिराळकर, उपाध्यक्ष निनाद सोमण, सहसचिव प्रदीप पात्रीकर आणि इतर प्रमुख व्यक्ती उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या आद्यसंस्थापक कै. दादासाहेब खापर्डे यांच्या प्रतिमेचे पूजन व सरस्वती पूजा याने झाली.कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध नृत्य आणि अभिनयाचे सादरीकरण केले. यामध्ये महाराष्ट्राची लोकधारा, गणेश वंदना आणि शेतकरी जीवनावर आधारित नृत्य मुख्य आकर्षण होते. विद्यार्थ्यांनी कला सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.पारितोषिक वितरणाचे वेळी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष डॉ. मायाताई शिराळकर यांनी विद्यार्थ्यांना अधिक मेहनत आणि शाळेचे नाव उज्ज्वल करण्याचा संदेश दिला.सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या परिश्रमामुळे कार्यक्रम यशस्वी झाला.

# माजी उपनगराध्यक्षांचा भाजप पक्षप्रवेश ठरला निर्णायक

## स्वतः निवडून येऊन भाजपला दिला नगराध्यक्ष

## प्रभागातील दोन्ही उमेदवारांसह नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला दिला मतांचा लीड

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी नगरपालिका निवडणूक नऊ वर्षानंतर झाली आहे त्यामुळे नऊ वर्षांपूर्वीच्या राजकीय घडामोडीत अनेक बदल झाल्याचे पाहिला मिळाले आहे. नगरपालिका निवडणुकी पूर्वी भाजप पक्षात अनेक घडामोडी घडल्या त्यात महत्वाचे म्हणजे राजकीय अनुभवी राजकारणात पकड असलेले माजी उपनगराध्यक्ष देविदास नेमाडे यांनी भाजप पक्षप्रवेश आमदार प्रकाश भारसाकडे यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई येथे मंत्री बावनकुळे यांच्या उपस्थितीत झाला होता. माजी उपनगराध्यक्ष देविदास नेमाडे यांच्या सह त्यांचे सुपुत्र युवा उद्योजक प्रविण नेमाडे यांनी सुद्धा भाजप मध्ये पक्ष प्रवेश घेतला.



या झालेल्या नगरपालिका निवडणुकीत युवा उद्योजक प्रविण नेमाडे यांनी प्रभाग क्रमांक तीन मध्ये भाजप तर्फे आपली उमेदवारी दाखल केली होती. नेमाडे यांनी प्रभाग क्रमांक तीन मधुन ११२८ मते घेऊन सर्वात जास्त मतांचा लीड घेऊन सोबत असलेल्या सदस्य पदाच्या उमेदवारांसह नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला १ हजार ६१ मतांची आघाडी दिली आहे. प्रभाग तीन मधुन शिवसेना शिंदे गटाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला या प्रभागात ७८७ मते मिळाली आहे .

विशेष म्हणजे नेमाडे यांनी नाते संबंध न पाहता पक्षनिष्ठा दाखवून दोन्ही उमेदवारांना निवडून आणण्यात महत्वाची भूमिका बजावली असल्याने भाजप पक्षाला नगराध्यक्ष बहाल केले आहे. यावेळी नगराध्यक्ष पदाच्या अटीतटीच्या लढतीत पुन्हा माजी उपनगराध्यक्ष देविदास नेमाडे यांचे नाव चर्चेत आले आहे. पक्षाला दिलेला शब्द नेमाडे परिवाराने पाळला असून भाजप पक्षाला नगराध्यक्ष बहाल केल्याने नेमाडे परिवाराची भाजप पक्षात चांगलीच चर्चा रंगत आहे.

# नवनिर्वाचित नगराध्यक्ष रुपाली माथने ॲक्शन मोडमध्ये

## जुळ्या शहरातील विविध भागातील समस्यांचा घेतला आढावा

**अचलपूर/ वार्ताहर**

अमरावती जिल्ह्यातील 'अ' वर्ग दर्जा असलेल्या अचलपूर नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी भारतीय जनता पक्षाच्या रूपाली अभय माथने यांचा ऐतिहासिक विजय झालेला आहे . या विजयानंतर दुसऱ्या दिवसापासून अचलपूर नगरपरिषद नवनियुक्त नगराध्यक्ष रुपाली अभय माथने यांनी विविध प्रभागात भेट देऊन नागरिकांशी संवाद साधत समस्यांचा आढावा घेतलेला आहे.

यामुळे नागरिकांच्या समस्या तात्काळ मार्गी लावण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिलेला आहे.यामध्ये अचलपूर शहरातील मेहराबपुरा,रायपूरा येथे गेल्या अनेक वर्षापासून पाणी टंचाईची समस्या निर्माण झाली होती. अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रूपाली माथने यांनी या भागात नागरिकांशी संवाद साधला आणि आणि पाणी टंचाईची



समस्या असल्याचे नागरिकांनी त्यांना सांगितले .त्यावेळी त्यांनी तत्काळ दखल घेत अचलपूर नगर परिषद पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी यांच्याशी मोबाईलवरून संवाद साधला व पाणी टंचाईची समस्या तात्काळ मार्गे लावण्याची निर्देश दिले आहे.यामुळे त्याभागात पाणी टंचाईची समस्या मार्गी लावण्यासाठी संबधित विभागाकडून पाइपलाइन दुरुस्तीचे काम सुरू झाल्याने त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# महापालिकेत माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीची बैठक

**अमरावती/ का.प्र.**

येणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निर्भीड व नियमबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी महानगरपालिकास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती (एमसीएमसी)ची सविस्तर बैठक घेतली. ही बैठक अमरावती महानगरपालिका कॉन्फरन्स हॉल येथे पार पडली.



या बैठकीत निवडणूक आचारसंहिता अंमलबजावणी दरम्यान माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे नमूद करत, इलेक्ट्रॉनिक मीडिया प्रसारित होणाऱ्या निवडणूकविषयक जाहिराती, बातम्या, प्रचार साहित्य व आशयाचे प्रमाणन आणि संनियंत्रण कसे करावे, यावर सखोल चर्चा करण्यात आली.पेड न्यूज, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती, तथ्यहीन माहिती तसेच मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या आशयावर काटेकोर नजर ठेवण्याच्या स्पष्ट सूचना आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी दिल्या. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कोणतीही राजकीय जाहिरात प्रसिद्ध करण्यापूर्वी माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावाचा विचार करता फेसबुक, एक्स (ट्विटर), इन्स्टाग्राम, युट्यूब व इतर डिजिटल माध्यमांवरील प्रचार, व्हिडिओ, पोस्ट व जाहिरातींच्या निरीक्षणासाठी स्वतंत्र यंत्रणा अधिक सक्रिय ठेवण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. निवडणूक काळात आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची दक्षता घेण्यासाठी समितीने नियमित आढावा बैठका घेऊन त्वरित कारवाई करावी, असे सांगण्यात आले.निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व विश्वासार्ह राहण्यासाठी माध्यम प्रतिनिधींनी जबाबदारीने व वस्तुनिष्ठ पत्रकारिता करावी, तसेच कोणताही नियमभंग आढळ ल्यास तात्काळ अहवाल सादर करावा, असे आवाहन आयुक्तांनी केले.या बैठकीस अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीचे सदस्य आचारसंहिता कक्ष प्रमुख राम लंके, जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटुरवार, अमरावती आकाश वाणी कार्यक्रम अधिकारी आशिष गावंडे, पोलीस निरीक्षक निलेश करे, सदस्य सचिव जनसंपर्क अधिकारी पुसतकर उपस्थित होते.

# सार्वत्रिक निवडणुकीच्या तयारीसाठी आयुक्त शर्मा यांची पाहणी

**अमरावती/ का.प्र.**

महानगरपालिकेतील आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या पारद र्शक व सुरळीत आयोज नासाठी निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सांस्कृतिक भवन व आयटीआय कॉलेजची पाहणी केली.

अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी यावेळी सांस्कृतिक भवन येथील ईव्हीएम (इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र) स्टोअर आणि आयटीआय कॉलेज येथे होणाऱ्या निवडणूक प्रशिक्षण केंद्र यांचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी ईव्हीएम स्टोअरमधील सुरक्षितता, उपकरणांची योग्य साठवण व्यवस्था, सीसीटीव्ही निगराणी, प्रवेश नियंत्रण आणि यंत्रांची तपासणी केली. तसेच, त्यांनी अधिकाऱ्यांकडून EVM व्यवस्थापनासंबंधी मार्गदर्शन घेतले व सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले.



यावेळी त्यांनी विशेषतः EVM च्या सुरक्षिततेवर भर दिला, कारण मतदान प्रक्रियेत यंत्रांची अचूकता आणि सुरक्षितता ही पारदर्शक निवडणुकीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी स्टोअरमध्ये सुरक्षा उपायांची सखोल पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सुधार णा सुचवल्या.

त्यानंतर त्यांनी आयटीआय कॉलेज येथे होणाऱ्या निवडणूक प्रशिक्षणाची तयारी तपासली. प्रशिक्षण केंद्राची बैठक व्यवस्था, तांत्रिक साधने, मार्गदर्शन सत्रांची रूपरेषा आणि कर्मचारी प्रशिक्षणासाठी लागणाऱ्या सुविधा यांचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला. त्यांनी स्पष्ट केले की, निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशिक्षण महत्त्वाचे असून, कर्मचाऱ्यांना संपूर्ण मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे.सार्वत्रिक निवडणुकीच्या पारदर्शकतेसाठी अमरावती शहरात EVM व्यवस्थापन आणि कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी सुरू असलेली तयारी उच्च स्तरावर असल्याचे पाहणी दरम्यान स्पष्ट झाले.

आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची देखरेख ही निवडणुकीच्या सुरळीत आणि पारदर्शक आयोजनाची खात्री देणारी ठरली आहे.

पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर, उपअभियंता सुहास चव्हाण, अभियंता राजेश आगरकर, सुधीर गोटे उपस्थित होते.

# 'इंडिया ते भारत : शिक्षणातील दरी भरून काढणारी CBE–STEM क्रांती'

आज आपला देश शिक्षणाच्या बाबतीत एका अत्यंत निर्णायक वळणावर उभा आहे. हे वळण केवळ अभ्यासक्रम बदलण्याचे नाही, तर मूल्यांचे, संधींचे आणि स्वप्नांचे आहे. आजचा भारत दोन वेगवेगळ्या वास्तवांत जगतो आहे. एक म्हणजे 'इंडिया' जो आधुनिकतेच्या शिखरावर पोहोचलेला आहे. आणि दुसरा म्हणजे 'भारत' जो अजूनही मूलभूत शिक्षण, संधी आणि आत्मविश्वासासाठी झगडतो आहे.

हा 'भारत' म्हणजे आपला ग्रामीण भाग. जिथे अजूनही मोडकळीस आलेल्या शाळा, अपुरी साधनसामग्री, शिक्षकांची कमतरता आणि विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत हळूहळू मावळत चाललेली स्वप्ने दिसतात. अनेक ठिकाणी शाळेची इमारत आहे, पण शिकण्याचे वातावरण नाही. तर काही ठिकाणी विद्यार्थी आहेत, पण त्यांना दिशा देणारे शिक्षक नाहीत. सर्वात वेदनादायक बाब म्हणजे, या मुलांच्या मनात 'आपण काहीतरी मोठे करू शकतो' हा विश्वासच रुजत नाही.

एका बाजूला 'इंडिया' आहे. जिथे स्मार्ट क्लासरूम, डिजिटल बोर्ड, अत्याधुनिक प्रयोगशाळा, कोडिंग, रोबोटिक्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, संशोधनाभिमुख शिक्षण आणि जागतिक स्पर्धेत उतरण्याची तयारी सुरू आहे. दुसऱ्या बाजूला 'भारत' आहे. जिथे शिक्षण अजूनही पाठांतरापुरते मर्यादित आहे, परीक्षा म्हणजेच शिक्षणाचा शेवट मानला जातो आणि 'नोकरी मिळाली म्हणजे यश' इतकाच संकुचित दृष्टिकोन रुजलेला आहे. ही तफावत केवळ शैक्षणिक नाही. ती सामाजिक, आर्थिक आणि मानवी आहे.इंडियामध्ये शिकणारा विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे. त्याचे पालक शिक्षणातील बदल समजून घेतात. शिक्षक भविष्यातील कौशल्यांची जाणीव ठेवून अध्यापन करतात. त्यामुळे हा विद्यार्थी अनुभवात्मक, विज्ञाननिष्ठ आणि कौशल्याधारित शिक्षण घेतो. आजच त्याच्यात उद्याचा अभियंता, संशोधक, उद्योजक आणि नवोपक्रमक घडत असतो.

मात्र ग्रामीण भारतात शिक्षण अजूनही गुण, निकाल आणि प्रमाणपत्रांपुरतेच मर्यादित राहिले आहे. येथे शिक्षण म्हणजे केवळ 'पास होणे' इतकाच अर्थ उरला आहे. परिणामी विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास, प्रश्न विचारण्याची सवय, प्रयोग करण्याचे धाडस आणि अपयशातून शिकण्याची क्षमता झपाट्याने हरवत चालली आहे.ही परिस्थिती अशीच राहिली, तर उद्या इंडिया आणि भारतातील दरी इतकी वाढेल की ग्रामीण विद्यार्थी शहरात केवळ कामगार म्हणून ओळखला जाईल. निर्माता किंवा नवोपक्रमक म्हणून नाही. ही केवळ शक्यता नाही. अनेक ठिकाणी हे वास्तव आजच दिसू लागले आहे.



ही दरी थांबवायची असेल, तर शिक्षणाची दिशा बदलावी लागेल. आणि ही दिशा पारंपरिक शिक्षणापलीकडे जाणारी असली पाहिजे. जिथे CBE (Competency Based Education) आणि STEM शिक्षण केंद्रस्थानी असेल.

CBE म्हणजे केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणे नव्हे, तर विद्यार्थ्यांमध्ये ठोस क्षमता निर्माण करणे. प्रत्येक मुलगा वेगवेगळ्या गतीने शिकतो, वेगवेगळ्या पद्धतीने समजतो. हे CBE मान्य करते. येथे गुणांपेक्षा कौशल्यांना महत्त्व असते. पाठांतरापेक्षा समजून शिकण्यावर भर असतो. आणि परीक्षेपेक्षा जीवनात उपयोगी पडणाऱ्या क्षमतांना प्राधान्य दिले जाते. CBE विद्यार्थ्याला आत्मविश्वास देते. 'मी करू शकतो' ही भावना निर्माण करते.

एऊर्शे शिक्षण विद्यार्थ्याला विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणिताच्या माध्यमातून विचार करायला शिकवते. प्रश्न विचारणे, प्रयोग करणे, चुकणे, पुन्हा प्रयत्न करणे आणि उपाय शोधणे हीच STEM ची खरी प्रक्रिया आहे.STEM विद्यार्थ्याला फक्त उत्तर देणारा नव्हे, तर समस्या सोडवणारा जागरूक नागरिक बनवते.जागतिक स्तरावर पाहिले, तर शिक्षणात परिवर्तन घडवून आणणाऱ्या देशांनी CBE आणि STEM ला प्राधान्य दिले आहे. फिनलंडसारख्या देशात गुण, परीक्षा आणि स्पर्धेला फारसे महत्त्व नाही. विद्यार्थी प्रकल्प, समस्या आणि जीवनाशी निगडित अनुभवांमधून शिकतात. शिक्षक आदेश देणारे नसून मार्गदर्शक असतात.

सिंगापूरने एऊर्शे शिक्षणाला राष्ट्रीय धोरणाचा भाग बनवले आहे. प्राथमिक स्तरावरच कोडिंग, लॉजिकल थिंकिंग आणि समस्या सोडवण्यावर भर दिला जातो. परिणामी हा छोटासा देश आज जागतिक तंत्रज्ञान आणि नवोपक्रमाचे केंद्र बनला आहे. अमेरिका आणि जर्मनीमध्ये CBE आधारित शिक्षणामुळे विद्यार्थी उद्योगांना आवश्यक असलेल्या कौशल्यांनी सज्ज होतात. त्यामुळे शिक्षण आणि रोजगार यातील दरी कमी होते.जर हे देश CBE–STEM च्या माध्यमातून आपले भविष्य घडवू शकतात, तर भारत का नाही. विशेषतः ग्रामीण भारत. जिथे प्रतिभेची कमतरता नाही. फक्त संधींची आहे.STEM ला जेव्हा Art म्हणजे कला याची जोड दिली जाते, तेव्हा शिक्षणाला आत्मा मिळतो. विज्ञानाला सर्जनशीलतेची जोड मिळते. कल्पनाशक्तीला दिशा मिळते. आणि शिक्षण आनंददायी बनते. ग्रामीण भागातील स्थानिक कला, हस्तकला, शेती, पाणी व्यवस्थापन, लोकसंस्कृती या गोष्टी वैज्ञानिक दृष्टिकोनाशी जोडल्या, तर शिक्षण पुस्तकांपुरते मर्यादित राहत नाही. ते जीवनाशी जोडले जाते.

आज अनेक जण असे मानतात की CBE, STEM किंवा आधुनिक शिक्षणपद्धती केवळ शहरांपुरत्याच मर्यादित आहेत. मात्र वाबळेवाडी आणि जालिंदरनगर येथील जिल्हा परिषद शाळांनी हा गैरसमज पूर्णपणे खोटा ठरवला आहे. मर्यादित साधनसामग्री असूनही, वारे गुरुजी यांच्या कल्पक नेतृत्वातून या शाळांमध्ये CBE, STEM आणि भारतीय संस्कृती यांचा अत्यंत सुंदर व अर्थपूर्ण समन्वय साधला गेला. आणि त्यातून खऱ्या अर्थाने जागतिक दर्जाच्या ग्रामीण शाळा उभ्या राहिल्या.

या शाळांमध्ये शिक्षण म्हणजे केवळ पुस्तक वाचणे किंवा उत्तर लिहिणे नाही. येथे शिक्षण म्हणजे अनुभव, निरीक्षण, प्रयोग आणि जीवनाशी जोडलेली प्रक्रिया आहे. विज्ञान शिकवताना शेती, पाणी व्यवस्थापन, पर्यावरण आणि स्थानिक संसाधनांचा अभ्यास केला जातो. गणित जीवनातील व्यवहारांशी जोडले जाते. तंत्रज्ञान वापरताना मूल्याधिष्ठित विचार रुजवले जातात. योग, ध्यान, लोककला, हस्तकला, सण-परंपरा आणि भारतीय ज्ञानपरंपरा यांचा शिक्षणाशी सुंदर मेळ घातला जातो.परिणामी या शाळांमधील विद्यार्थी केवळ 'शिकलेले' नसून आत्मविश्वासपूर्ण, जिज्ञासू, प्रयोगशील आणि समाजाभिमुख नागरिक म्हणून घडत आहेत. ग्रामीण भागात जन्मलेली ही मुले आज विचारांच्या पातळीवर जागतिक होत आहेत. हीच खरी शैक्षणिक क्रांती आहे.

वाबळेवाडी आणि जालिंदरनगरच्या शाळा हे सिद्ध करतात की शिक्षणातील परिवर्तनासाठी मोठ्या इमारती किंवा प्रचंड निधी आवश्यक नसतो. आवश्यक असते ती दूरदृष्टी, कल्पक नेतृत्व आणि विद्यार्थ्यांवरील विश्वास. वारे गुरुजी यांची ही शैक्षणिक दृष्टी संपूर्ण ग्रामीण भारतासाठी आदर्श ठरू शकते.शासनाने, शैक्षणिक यंत्रणांनी आणि समाजाने अशा उपक्रमांना ओळखून त्यांना धोरणात्मक, आर्थिक आणि नैतिक पाठबळ दिले, तर ग्रामीण भारतातील प्रत्येक जिल्हा परिषद शाळा ही जागतिक दर्जाची शाळा बनू शकते. तेव्हा 'इंडिया' आणि 'भारत' यातील दरी भरून निघेल. कारण भारतातील शाळाच उद्याच्या इंडिया चे नेतृत्व घडवतील.म्हणूनच CBE–STEM हे केवळ शिक्षणाचे मॉडेल नाही. ते ग्रामीण भारताच्या आशेचे, सन्मानाचे आणि उज्ज्वल भविष्याचे प्रतीक आहे.

**मयुर चौधरी**
अमरावती
मो.७७९८०६०५००

# अमूर्त चित्र कलाकार-रजनी अंबादे

**शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सवानिमित्ताने आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कलावंत रजनी अंबादे यांची कला प्रदर्शनी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय येथील सभागृहाच्या गॅलरीमध्ये आयोजित करण्यात आली. यानिमित्ताने त्यांची घेतलेली ही खास मुलाखत...**



**प्रश्न. रजनीजी, थोडक्यात ओळख?**

**उत्तर.** रजनी अंबादे समकालीन अमूर्त कलाकार. ३ॲ आर्किटेक्चरल व्हिज्युअलायझेशन व्यावसायिक. समाजसेविका, अध्यक्ष अंबादास खोबरागडे आर्ट फाउंडेशन, सचिव - लायन्स क्लब ऑफ पुणे. सध्या त्या पुण्यात कार्यरत आहे. माझी कला भूमितीय अमूर्ततेभोवती फिरते. रचना आणि अराजकता यांच्यातील सूक्ष्म समतोल शोधणे हा कलेचा केंद्रबिंदू आहे. माझ्यासाठी अराजकता म्हणजे अनिश्चित, स्वाभाविक आणि मुक्त प्रवाह. जे नियंत्रित करता येत नाही, पण अनुभवता येते, अगदी आयुष्यासारखेच. हीच सुंदर विस्कळीतता सत्य, भावना आणि हालचाल उलगडून दाखवते.

नवीन कला माध्यमे शिकणे, निसर्गाचे निरीक्षण, प्रवास, छायाचित्रण, पाककला किंवा नवीन लोकांना भेटणे, या सर्व गोष्टींबद्दल नेहमीच प्रचंड उत्सुकता राहिली आहे.या अनुभवांनी व्यक्ती म्हणून घडवले आणि या कला प्रवासावर खोलवर परिणाम केला.माझे कलादर्शन माझे आजोबा, अग्रगण्य अमूर्त कलाकार स्व. अंबादास खोबरागडे यांच्या वारशातून आकारले आहे. त्यांनी कलेला 'जीवनाचा उत्सव' मानले. त्यांची शिस्तबद्ध आणि आध्यात्मिक दृष्टी माझ्या मार्गदर्शनाचा मुख्य आधार आहे.

**प्रश्न. आजोबा स्व. अंबादास खोबरागडे यांच्या वारशाने टाकलेला प्रभाव?**

**उत्तर.** त्यांचे जीवन, तत्त्वज्ञान आणि कलाविष्कार हेच माझ्या आयुष्यातील सर्वात मोठे प्रेरणास्थान आहे. ते केवळ माझे आदर्श नाहीत, तर माझा दिशादर्शक आहेत. त्यांच्या शिस्तबद्ध कला साधनेतून, अमूर्ततेशी असलेल्या गहन आध्यात्मिक नात्यातून आणि 'निराकार वास्तव' या संकल्पनेतून मी घडले आहे.जग त्यांना अमूर्त कलेचे अग्रदूत म्हणून ओळखते; मात्र आमच्यासाठी ते कुटुंबाचा आधारस्तंभ होते.

**प्रश्न. कलेची शैली कशी वर्णन कराल?**

**उत्तर.** मी माझ्या कलेला '&Berutifuled Disorder - सुंदर अराजकता' असे संबोधते.माझी कला भूमितीय अमूर्ततेवर आधारित असून रचना आणि अराजकता यांच्यातील सूक्ष्म समतोल शोधण्याचा सतत प्रयत्न करते.माझ्यासाठी अराजकता म्हणजे जीवनाची स्पंदने – अनियंत्रित, अनिश्चित आणि मुक्त प्रवाहात वाहणारी ऊर्जा. याच विस्कळीत सौंदर्यात सत्य, भावना आणि हालचाल जन्माला येते.



**प्रश्न. एक दशक यूकेमध्ये घालवल्यानंतर कलेवर त्याचा कसा प्रभाव पडला?**

**उत्तर.** -यूकेमधील माझा काळ कलाकार आणि व्यक्ती म्हणून मला घडवणारा ठरला.Paraòa&sArtFair, Loåon Art Fair यांसारख्या प्रतिष्ठित व्यासपीठांवर प्रदर्शन करण्याची संधी आणि स्थानिक कला मेळ्यांसोबत काम केल्याने मला जागतिक कला संवेदनांचा परिचय झाला.

**प्रश्न. ३D आर्किटेक्चरल व्हिज्युअलायझेशन आणि कला - हे दोन वेगळे विश्व एकमेकांना कसे पूरक ठरतात?**

**उत्तर.** ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. दोन्हींसाठी कल्पनाशक्ती, अचूकता आणि अवकाशाची जाण आवश्यक असते. ३D व्हिज्युअलायझेशन मध्ये गणिती अचूकता, तांत्रिक शिस्त आणि रचनात्मक विचार महत्त्वाचा असतो, तर कलेमध्ये अंतःप्रेरणा आणि भावनिक स्वातंत्र्य आवश्यक असते.

**प्रश्न. समाजकार्य करण्यामागे प्रेरणा ?**

**उत्तर.** कला आणि करुणा यांची धडधड एकच आहे. केवळ कॅनव्हासवर सौंदर्य निर्माण करणे पुरेसे नाही; तेच सौंदर्य लोकांच्या आयुष्यातही निर्माण करणे आवश्यक आहे.अंबादास खोबरागडे आर्ट फाउंडेशन आणि लायन्स क्लब ऑफ पुणे सुप्रीम यांच्या माध्यमातून मी विशेषतः ग्रामीण भागात सामाजिक उपक्रम राबवते - जसे की जयपूर फूट कृत्रिम अवयव दान शिबिरे, शिक्षण उपक्रम, विविध सामाजिक विषयांवरील पोस्टर स्पर्धा आणि पर्यावरण जनजागृती.

**प्रश्न. आपल्या आगामी कलामालिकेत कोणते विषय आपण शोधत आहात?**

**उत्तर.** सध्या मी समतोलावर आधारित एका नवीन मालिकेवर काम करत आहे.मानवी नातेसंबंध अमूर्त रूपांशी कसे जुळतात, याचा मी शोध घेत आहे. अराजकतेतही स्थिरतेचा बिंदू कसा सापडतो, हे या मालिकेचे केंद्र आहे. ही मालिका अत्यंत आत्मपरिक्षण करणारी असून माझ्या मनाच्या फार जवळची आहे.

**प्रश्न. प्रेक्षकांनी आपल्या कलेतून काय घेऊन जावे, अशी आपली अपेक्षा आहे?**

**उत्तर.** दृश्य आणि अदृश्य, रचना आणि अंतःप्रेरणा यांच्यातील नात्याची जाणीव. माझ्या चित्रांमधील रचना आणि अराजकतेचा संवाद पाहताना प्रेक्षकांना क्षणभर थांबून अंतर्मनात समतोल माझी इच्छा आहे.

**प्रश्न. पुढील वाटचालीसाठी आपली दृष्टी काय आहे?**

**उत्तर.** कलाकार म्हणून सतत विकसित होत राहणे आणि समाजासाठी अर्थपूर्ण योगदान देणे, हीच माझी दृष्टी आहे.

**मयुरी बारी,** अमरावती

# सावरगाव परिसरात रब्बी पिकांसाठी तातडीने पाणी सोडण्याची मागणी

## शेतकऱ्यांचे लघु पाटबंधारे विभागाला निवेदन

■ प्रतिनिधी | खेट्री ■

जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या पातूर तालुक्यातील सावरगाव व परिसरातील शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील पिकांसाठी धरणातून कॅनलद्वारे तातडीने पाणी सोडण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात सावरगाव परिसरातील शेतकऱ्यांनी अकोला लघु पाटबंधारे विभागाकडे निवेदन सादर केले आहे.

निवेदनावर वामन काठोडे, जानू राठोड, रामेश्वर लाड, सुनील इनसकार, गजानन डाखोरे, समाधान डाखोरे, नामदेव पायघन यांच्यासह अनेक शेतकऱ्यांच्या सह्या आहेत. परिसरातील बहुसंख्य शेतकरी सिंचनासाठी लघु पाटबंधारे प्रकल्पांवर अवलंबून असून अद्याप रब्बी पिकांसाठी पाणी सोडण्यात



आलेले नाही. परिणामी पिके कापणीच्या अवस्थेत येत असून उत्पादनात मोठी घट होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. वेळेवर पाणी न मिळाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागणार असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठ्याचा आढावा घेऊन नियोजनबद्ध पद्धतीने तातडीने पाणी सोडावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

> ‘सावरगाव परिसरात शेकडो शेतकऱ्यांनी रब्बी पिकांची पेरणी केली आहे. सिंचनासाठी धरणातून कॅनलद्वारे पाणी सोडणे अत्यावश्यक आहे. यामुळे रब्बी पिकांच्या उत्पादनात वाढ होईल. यासाठी आम्ही अकोला लघु पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांकडे निवेदन दिले आहे.’
>
> **वामन काठोडे,** शेतकरी, सावरगाव

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६


# दोन दिवसांत ९७३ नामनिर्देशन पत्रांचे सशुल्क वितरण; अद्याप एकही नामनिर्देशन अर्ज दाखल नाही

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर नामनिर्देशन प्रक्रियेला सुरुवात झाली असून, ६ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांमार्फत दोन दिवसांत एकूण ९७३ नामनिर्देशन पत्रांचे सशुल्क वितरण करण्यात आले आहे. मात्र, या कालावधीत एकाही उमेदवाराने नामनिर्देशन अर्ज दाखल केलेला नाही.

दि. २३ डिसेंबर रोजी ६ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांमार्फत एकूण २९६ उमेदवारांना ५०८ नामनिर्देशन पत्रांचे वितरण करण्यात आले. यामध्ये झोन क्र. १ मध्ये ६१ उमेदवारांना ९३, झोन क्र. २ मध्ये ५० उमेदवारांना ९०, झोन क्र. ३ मध्ये ७५ उमेदवारांना १२६, झोन क्र. ४ मध्ये ३९ उमेदवारांना ६२, झोन क्र. ५ मध्ये ३७ उमेदवारांना ६८ तर झोन क्र. ६ मध्ये ३४ उमेदवारांना ६९ नामनिर्देशन पत्रे वितरीत करण्यात आली.

त्याचप्रमाणे, दि. २४ डिसेंबर रोजी एकूण २५५ उमेदवारांना ४६५ नामनिर्देशन पत्रांचे सशुल्क वितरण करण्यात आले. यामध्ये झोन क्र. १ मध्ये ३८ उमेदवारांना ६२, झोन क्र. २ मध्ये ३६ उमेदवारांना ५६,



झोन क्र. ३ मध्ये ६२ उमेदवारांना १३५, झोन क्र. ४ मध्ये ५० उमेदवारांना ९६, झोन क्र. ५ मध्ये ३५ उमेदवारांना ५९ आणि झोन क्र. ६ मध्ये ३४ उमेदवारांना ५७ नामनिर्देशन पत्रे देण्यात आली. दोन दिवसांत एकूण ५५१ उमेदवारांनी ९७३ नामनिर्देशन पत्रे घेतली असून, निवडणुकीबाबत इच्छुक उमेदवारांमध्ये हालचाली वाढताना दिसत आहेत. तथापि, दि. २३ व २४ डिसेंबर रोजी एकही नामनिर्देशन अर्ज दाखल न झाल्याने पुढील काही दिवसांत उमेदवारांची धावपळ वाढण्याची शक्यता आहे.

# खेट्री जि. प. उर्दू शाळेत आनंद मेळावा उत्साहात साजरा



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समिती अंतर्गत खेट्री येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेत दिनांक २४ डिसेंबर रोजी आनंद मेळावा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी स्वतः पुढाकार घेऊन विविध प्रकारची आकर्षक दुकाने थाटली होती. विद्यार्थ्यांनी स्वहस्ते तयार केलेले खाद्यपदार्थ व इतर वस्तूंची विक्री केली असून, या उपक्रमाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

या आनंद मेळाव्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञान, आर्थिक नियोजन, संघभावना तसेच स्वयंरोजगाराची प्राथमिक माहिती प्रत्यक्ष अनुभवातून मिळाली. विद्यार्थ्यांनी अत्यंत आनंदात व आत्मविश्वासाने या उपक्रमात सहभाग घेतला.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे

## विद्यार्थ्यांनी थाटलेल्या दुकानांना नागरिकांची पसंती

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमास सरपंच जहूर खान, उपसरपंच शेख राजिक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मो. वाजीद, ग्रामपंचायत सदस्य शेख साजिद, सुरेश लांडे, जि. प. उर्दू शाळेचे मुख्याध्यापक इकबाल हुसेन, शिक्षक मो. सलीम, रहीम खान, नजीम खान, ऐहतेशाम अहमद, मो. सूफियान तसेच मराठी शाळेच्या शिक्षिका वैशाली आसोलकार, रंजना मानकर, अरविंद काळे व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भव्य पुष्पप्रदर्शन व जातीवंत पशुप्रदर्शन ठरणार आकर्षणाचे केंद्र

## राज्यस्तरीय ‘ॲग्रोटेक २०२५’ साठी कृषी विद्यापीठ सज्ज

**अकोला :** कृषी क्रांतीचे प्रणेते स्व. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे २७ ते २९ डिसेंबर २०२५ या कालावधीत भव्य राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनी ‘?ग्रोटेक २०२५’ आयोजित करण्यात आली असून, या प्रदर्शनाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. यंदा भव्य पुष्पप्रदर्शन व जातीवंत पशुप्रदर्शन हे या कृषी महोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे.

विदर्भासह संपूर्ण राज्य व इतर राज्यांतील शेतकरी, युवक-युवतींसाठी ही प्रदर्शनी पर्वणी ठरणार आहे. यंदा चार भव्य डोममध्ये ५५० हून अधिक स्टॉल्स उभारण्यात आले असून, त्यात राज्यातील कृषी विद्यापीठांनी विकसित केलेले आधुनिक तंत्रज्ञान, कृषी विभाग, जैविक शेती मिशन, महाबीज, नैसर्गिक शेती अभियान, विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय संस्था, कृषी निविष्ठा उत्पादक कंपन्या, यंत्र-अवजारे, बी-बियाणे, खते, औषधे, सेंद्रिय व कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित निविष्ठा उत्पादक कंपन्यांचा सहभाग आहे. यासोबतच कृषी पदवीधर उद्योजकांचे दालन तसेच स्वयंसहायता बचत गटांनी तयार केलेल्या कृषीपूरक उत्पादने व खाद्यपदार्थांचे स्टॉलही लक्षवेधी ठरणार आहेत.

निसर्गाच्या लहरीपणावर मात करण्यासाठी ड्रोन तंत्रज्ञान, स्वयंचलित यंत्रे, आधुनिक अवजारे, पीक संरक्षणाच्या नव्या पद्धती, औषधी व सुगंधी वनस्पती, फळे, फुले व रानभाज्यांचे प्रदर्शन शेतकऱ्यांना मार्गदर्शक ठरणार आहे. यंदाच्या प्रदर्शनाचे विशेष आकर्षण म्हणजे स्वतंत्र डोममध्ये आयोजित भव्य पुष्पप्रदर्शन. यात शोभिवंत झाडे, फुलझाडे, वेली, बोन्साय, इंडोअर प्लांट्स आदींचे मनमोहक सादरीकरण करण्यात येणार आहे. नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व युवक-युवतींना या प्रदर्शनात सहभागी होता येणार असून, सहभागींच्या योगदानाबद्दल प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. यासाठी पुष्पशास्त्र व प्रांगणविद्या विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन विभागप्रमुख प्रा. नितीन गुप्ता यांच्यासह डॉ. नवीन राठोड व डॉ. मनिषा देशमुख यांनी केले आहे.

तसेच जातीवंत पशुधनाचे भव्य प्रदर्शन हे ‘ॲग्रोटेक २०२५’चे आणखी एक वैशिष्ट्य ठरणार आहे.

स्वतंत्र दालनामध्ये चारा पिके, मुरघास निर्मिती, जनावरांचे आरोग्य व आहार व्यवस्थापन, दूध प्रक्रिया, दुग्धजन्य पदार्थ निर्मिती, गांडूळ खत तंत्रज्ञान यांची माहिती देण्यात येणार आहे. यामध्ये साहिवाल, देवणी, डांगी, खिल्लार, अमृतमहल, कॉंक्रेज, पुंगनूर यांसह विविध देशी-विदेशी गायी, नागपुरी, जाफराबादी आदी जातीवंत म्हशी, तसेच बेरारी, उस्मानाबादी, बोअर, बीटल शेळ्या व कुक्कुटपालनाचे प्रात्यक्षिक प्रदर्शन होणार आहे.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या पुण्यतीथी महोत्सवात कार्यक्रमाची रेलचेल

**अकोला :** गत सतरा वर्षापासून महानगरात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचाराचा जागर करीत वैचारिक प्रबोधन करणाऱ्या अ. भा.श्री गुरुदेव सेवा मंडळ अंतर्गत वं.राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज सेवा समितीच्या वतीने राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या ५७ व्या पुण्यतिथी पुण्यस्मरण सोहळ्यात अनेक प्रबोधनात्मक कार्यक्रमाची रेलचेल राहणार.


### जाहीर नोटीस

सर्व जनतेस, वित्त संस्थेस, बॅंकेस, शासकिय व निमशासकिय कार्यालयास सदर नोटीस व्दारे सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकारा नामे प्रतिभा श्रीकांत गिते, रा. कोर्ट कॉलनी, डाबकी रोड, अकोला यांनी सौ. चंदा रमेश जरंग, रा. मारोती नगर, जुने शहर, अकोला यांचे मालकीचे व ताब्यातील मौजे सुकापुर, म.न.पा. र.स.डी.र.डी. अकोला चे हददीतील गाव सुकापुर प्र. ता. जि. अकोला, सर्व्हे क्र. २/१ पार्टचे जमिनीचे वि.एस.डी.ओ. साहेब अकोला यांचे फाईल वरील रे.के.नं. एन.ए.पी. ३४/ सुकापुर/५८/९०-९१. नि. ता. ३०/०५/१९९१ नुसार मंजुर झालेल्या नकाशातील अ.नं. २५ बी (पंचविस बी) चा प्लॉट व त्यावरील घर, ज्याचा नुझल प्लॉट नं. घरजागा ज्याचे मोजमाप पुर्व- पश्चिम १३.०० मी. उत्तर चौ. मी. (१२९३.८९ चौ. फुट) जागा व त्यावरील घर ज्यास पश्चिमेस : सरकारी रस्ता, उत्तरेस : प्लॉट क. २५ ए. दक्षिणेस पैकी व नझुल शिट क. ४ ची दक्षिण ९.२५ मी. असे एकुण १२०.२५ चुतू: सिमा पुर्वेस : प्लॉट नं. २६ए. प्लॉट क्र. २८ए.

येणे प्रमाणे वरील नमुद चतु:सिमेतील मालमत्ता आमचे पक्षकार यांनी विकत घेण्याचा सौदा कायम करून त्याचा इसार केलेला आहे. सदर मालमत्ता निर्धोक असल्यामुळे आमचे पक्षकार हे सदर मालमत्तेची खरेदी करणार आहेत. सदर जाहिर नोटीस प्रकाशीत झाल्यावर ७ दिवसात सदर मालमत्तेबाबत कोणतही हरकत, आक्षेप बोजा, गहाण, तारण, भाडेपटटा बक्षीस, दान, खरेदी विकी, कोणतेही हस्तांतरण किंवा इतर कोणताही व्यवहार असल्यास, त्यांनी दस्तऐवजासह आपली हरकत नोंदवावी. सदर मालमत्ता खरेदी विक्री व्यवहार पुर्ण झाल्यावर कोणाचाही कसलाही उजर व आक्षेप चालणार नाही. तदनंतर झालेल्या परिणामास व परिस्थीतील आपण स्वतः जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी, करीता ही जाहिर नोटीस.

अकोला
दि. ०४/१०/२०२५

**ॲड. शैलेश सी. जाधव**
अंबिका नगर, डाबकी रोड अकोला, ता. जि. अकोला मो. क्र. ८१४९८६८३८१

### Change In Name

I Have Change My Name
OLD NAME
**PARESHKUMAR RAVINDRAKUMAR GOENKA**
NEW NAME
**PARESH RAVINDRAKUMAR GOENKA**
My Residential Address is :- Besides Bhala Dalmill, Kholeshwar Road, Citykotwali, Dist. Akola 444001.

### जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२११/२०२५ — प्रोसेस नं.२०१९७/२०२५
चौ.ता. २०/०१/२०२६ — दिनांक : ०८/१२/२०२५

**अर्जदार :** शालिनी शाम खरात उर्फ शालीनी लक्ष्मण जाधव रा. जेतवन नगर, धोबी खदान, अकोला. ता. जि. अकोला. मो.नं. ९३०९९४१८३९

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : लक्ष्मण श्रीपत जाधव
**पत्ता :-** रा. जेतवन नगर, धोबी खदान, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की मयत लक्ष्मण श्रीपत जाधव यांचे दि. २२/०८/२००५ रोजी जेतवन नगर, खदान, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८६५/२०२५ — प्रोसेस नं.१७२८८/२०२५
चौ.ता. २०/०१/२०२६ — दिनांक : २३/१०/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती मीना अशोक बमन २. भारत अशोक बमन ३. विरेंद्र अशोक बमन ४. मुस्कान अशोक बमन सर्व रा. बापु नगर, आपातापा रोड, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अशोक मोतीलाल बमन
**पत्ता :-** रा. व्दारा भारत अशोक बमन रा. बापू नगर, आपातापा रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयानी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अशोक मोतीलाल बमन यांचे दि.२१/०९/२०२५ रोजी सिटी हॉस्पिटल, अकोला ना जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब, वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कमल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १३/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २३१५/२०२५ — प्रोसेस नं.२०९३४/२०२५
चौ.ता. २८/०१/२०२६ — दिनांक : २३/१२/२०२५

**अर्जदार :** १. संतोष बजरंगलाल बबेरवाल रा. बबेरवाल भवन, खोलेश्वर, अकोला. ता. जि. अकोला. २. संजयकुमार बजरंगलाल बबेरवाल रा. पाण्याच्या टाकीजवळ, मलकापूर, ता. जि. अकोला. ३. सौ. रमा कैलाश जोशी रा. इंगळे हॉस्पिटल समोर, तंत्र नगर, खामगांव, ता. खामगांव जि. बुलढाणा. ४. सौ. उमा राजेंद्रकुमार व्यास रा. माधव नगर, संगनेर बाजार, जयपूर, ता. जि. जयपूर, राजस्थान ५. सौ. सीमा विजय जोशी रा. सिटी, पोलीस स्टेशन जवळ, वर्धा, ता. जि. वर्धा.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत :१. चंद्रप्रभा बजरंगलाल बबेरवाल २. बजरंगलाल देबुलाल बबेरवाल
**पत्ता :-** रा. बबेरवाल भवन, खोलेश्वर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत चंद्रप्रभा बजरंगलाल बबेरवाल यांचे दि. २९/०५/२०१४ रोजी व तसेच मयत बजरंगलाल देबुलाल बबेरवाल यांचे दि. १५/०८/२०१८ रोजी अकोला निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर सुचना

सर्व जनतेस व वित्तीय संस्थेस ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, श्री. मधुकर लक्ष्मण पन्हाळे रा. अकोला ता. जि. अकोला यांनी खालील वर्णनाची मालमत्ता आय. सि. आय. सि. आय. होम फायनान्स कंपनी लि. येथे गहाण ठेवुन कर्ज मिळण्याकरिता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :** मौजे अकोली बु. म. न. पा., ता. जि. अकोला च्या हद्दीतील शे. स. क्र. ७/२ जे वि. उपविभागीय अधिकारी अकोला यांच्या फाईलावरील महसूल प्रकरण क्र. एन. ए.पी.-३४/ अकोलीबु//१९८१-८२ आदेश दि. ०८/०७/१९८२ प्रमाणे पास ले-आउट नकाशातील प्लॉट क्र. ४४ ज्याचे एकूण क्षेत्रफळ ३५६.८५ चौ. मी. वर बांधलेल्या लक्ष रेसिडेन्सी ईमारती मधील दुसऱ्या माळ्यावरील गाळा क्र. २०३ ज्याचे बांधकाम क्षेत्र. २५.४९ चौ.मी. असून ज्यास चतुर्सिमा : पुर्वेस : गाळा क्र. २०४, पश्चिमेस : सेर्विस लेन, ऊत्तरेस : रस्ता व दक्षिणेस : गाळा क्र. २०२

येणे प्रमाणे वरील मालमत्तेचे दस्त क्र. २१८८ दि ०३/०९/२०१५ रोजीचे मुळ खरेदीखत जे मालमत्तेचे साखळी दस्त आहे ते हरविले/गहाळ झाले आहे. त्याकरीता पोलीस स्टेशन सिटी कोतवाली, अकोला येथे दि. २२/१२/२०२५ येथे तक्रार दाखल केली आहे.

त्याअर्थी जर वरील मालमत्तेवर कोणाचे काही कर्ज, गहाण, बोजा, हक्क, अधिकार अथवा ताबा असल्यास त्यांनी सदर सुचना प्रकाशीत झाल्या पासुन ७ (सात) दिवसात खालील नमुद पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानीशी आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणाचाही कसल्याही स्वरुपाचा आक्षेप नाही असे समजुन आय. सि. आय. सि. आय. होम फायनान्स कंपनी लि. हे वरील मालमत्ता गहाण ठेवुन कर्जाची रक्कम वितरीत करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत वा ऊजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. २४/१२/२०२५

**अधिवक्ता : संजीव रा. बोचरे,**
संतोष नगर, आगाशे गुरुकुल, मलकापुर रोड, अकोला - ४४४००४
मोबा. ९८९०४४४८२४

### चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

जा. क्र. ३६६४/२०२५ — दि. १८/१२/२०२५
अर्ज क्रमांक :- १५३ / २०२५ कलम- १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव -** सखा श्रीहरी चॅरिटेबल ट्रस्ट, अकोला
**अर्जदार :-** श्री. मोहन विठ्ठल गोंडचवर, रा. खरप खुर्द ता. जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१ ) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) **:- ५०००/- रुपये आहे.**

आ) स्थावर मिळकत (वर्णन ) **:- काही नाही.**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक १८/१२/२०२५ रोजी दिली.

शिक्का — **प्र. अधिक्षक** सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

### चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

जा. क्र. ३६६६/२०२५ — दि. १८/१२/२०२५
अर्ज क्रमांक :- १५८/२०२५ कलम- १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव -** श्री. सिद्धेश्वर मंदिर ट्रस्ट न्यू. खेतान नगर, कौलखेड, अकोला ता. जि. अकोला
**अर्जदार :-** श्री. अशोक रामराव देशमुख रा. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१ ) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) **:- १०००/- रुपये आहे.**

आ) स्थावर मिळकत (वर्णन) **:- काही नाही.**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक १८/१२/२०२५ रोजी दिली.

शिक्का — **प्र. अधिक्षक** सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

### जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २३१८/२०२५ — प्रोसेस नं.२१०१५/२०२५
चौ.ता. ०३/०२/२०२६ — दिनांक : २४/१२/२०२५

**अर्जदार :** १. सुशिला विठ्ठल भटकर रा. देशमुख फैल, नायगांव, अकोला, ता. जि. अकोला. २. शिवाजी विठ्ठलराव भटकर रा. कासली बु. ता. जि. अकोला. ३. मंगला विठ्ठलराव भटकर रा. शिवाजी नगर, मुर्तिजापूर, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : विठ्ठल त्र्यंबक भटकर
**पत्ता :-** रा. कासली बु. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विठ्ठल त्र्यंबक भटकर यांचे दि. ०६/०८/२०२४ रोजी कासली बु. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत. त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** प्र. अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२५४/२०२५ — प्रोसेस नं.२०६८१/२०२५
चौ.ता. १७/०१/२०२६ — दिनांक : १७/१२/२०२५

**अर्जदार :** १. उमा राजेश बरडिया रा. टॉवर चौक जवळ, श्रावगी प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला. २. रिना अभिनय बाफना रा. ७३, गांधी पार्क सोसायटी, संगम सोसायटी जवळ, हरणी रोड, वडोदरा, ता. जि. वडदोरा गुजरात ३. आशिष राजेश बरडिया ४. गौरव राजेश बरडिया क्र. ३ व ४ रा. टॉवर चौक जवळ, श्रावगी प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : राजेश पुनमचंद बरडिया
**पत्ता :-** रा. टॉवर चौक जवळ, श्रावगी प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजेश पुनमचंद बरडिया यांचे दि. २५/०५/२०२१ रोजी राहते घरी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

जा. क्र. ३६६७/२०२५ — दि. १८/१२/२०२५
अर्ज क्रमांक :- १६०/२०२५ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :-** ज्ञानेश्वर माऊली मंदिर धाम सारकिन्ही, ता. बार्शीटाकळी जि. अकोला
**अर्जदार :-** श्री. धनराज समाधान आंबेकर रा. सारकिन्ही, ता. बार्शीटाकळी जि. अकोला

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१ ) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत ( वर्णन ) **:- काही नाही** आ) स्थावर मिळकत (वर्णन):- मौजे सारकिन्ही ता. बार्शीटाकळी जि. अकोला येथील मालमत्ता क्रमांक ५३४ ऐकून जागेचे क्षेत्रफळ 58x190 = 11020 चौ. फुट आहे. यावर बांधकाम केलेले श्री. ज्ञानेश्वर माऊली यांचे मंदिर 50x20 = 1000 चौ. फुट खुली जागा १००२० चौरस फुटआहे.

**जागेची चतु: सीमा** पुर्वेस :- रस्ता पश्चिमेस :- भारत तोताराम यांचे घर उत्तरेस :-रस्ता दक्षिणेस :- पांडुरंग आंबेकर यांचे शेत मालमत्तेची अंदाजे किंमत रु.१६,५०,०००/-

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशारितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला. १ यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक १८/१२/२०२५ रोजी दिली.

शिक्का — **प्र. अधिक्षक** सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

### चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

जा. क्र. ३६८९/२०२५ — दि. १९/१२/२०२५
नेमता तारिख :- १९/०१/२०२६

चौकशी क्रमांक :- १८/२०२५ कलम 50A(III) नुसार जाहिर नोटिस

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ५० (अ) ३ अन्वये

**अर्जदार :-** १) श्री. श्यामसुंदर लक्ष्मीनारायण चांडक, अकोला. २) श्री. रमाकांत खेतान अकोला.

सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यांत येते की,

१ ) श्रीमती बसंती चांडक रिलीफ फाउंडेशन, अकोला ई- २१९ या न्यासाचा कारभार व्यवस्थित व योग्य रितीने चालावा या दृष्टीने अर्जदार यांनी वरील अर्ज या कार्यालयात केला आहे.

२ ) हया अर्थि या नोटिसीने जाहिर करण्यांत येते की, सदरहु न्यासाचे हितसंबंध असणाऱ्या ज्या लोकांना सदर न्सासाचे योजनेविषयी काही निवेदन/ हरकत करावयाची असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० ( तीस ) दिवसाच्या आंत तशा प्रकारचे लेखी निवेदन / हरकत योजनेच्या मसुद्यावरील चौकशी क्रमांक देउन मुंबई सार्वजनिक विश्वस्थ अधिनियम १९५० चे कलम ७३ (अ) नुसार दहा रुपयांचा कोर्ट फी लावून अर्ज सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१,सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला येथे दाखल करावा, तसे न केल्यास सदरहु बाबतीत कोणासही काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन कार्यवही एकतर्फी चालवुन निकाल देण्यात येईल. ही नोटीस आज दिनांक- १८/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - २, अकोला यांच्या शिक्यानिशी दिली.

शिक्का — **प्र. अधिक्षक** सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला



जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# तंटामुक्त समित्या ठप्प; गावगाडा पुन्हा पोलिसांच्या दारात

## समजुतीची यंत्रणा कोलमडली, किरकोळ भांडणांना गुन्ह्याचे स्वरूप

**सेलू/ जनमाध्यम**

गावातील किरकोळ वाद घरच्या घरी मिटावेत, शांतता व सलोखा नांदावा, या उद्देशाने सुरू झालेल्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियानातील तंटामुक्त समित्या आज पूर्णपणे निष्क्रिय झाल्या आहेत. गेल्या तीन-चार वर्षांपासून या समित्यांचा काहीही ठावठिकाणा नसल्याने गावातील भांडणे थेट पोलिस ठाण्यापर्यंत पोहोचत असून गावगाड्यात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सीमावाद, रस्त्याचे प्रश्न, शेतीच्या हद्दी, धक्कामुक्की, कौटुंबिक मतभेद अशा किरकोळ कारणांवरून होणारे वाद तंटामुक्त समित्यांच्या मध्यस्थीने गावातच मिटवले जात होते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून समजूत काढणे,



तडजोड घडवून आणणे आणि ग्रामसभेत अहवाल सादर करणे ही कामे समित्या प्रभावीपणे करीत होत्या. मात्र करोना काळानंतर, विशेषतः २०२० पासून या समित्यांचे पुनर्गठनच झाले नाही. परिणामी गावपातळीवरील शांततेची यंत्रणाच कोलमडली आहे.आज परिस्थिती अशी आहे की, जुने रागद्वेष, हद्दीचे वाद, कौटुंबिक भांडणे थेट पोलिसांत जात आहेत. समजूत, मध्यस्थी आणि संवादाची परंपरा तुटल्याचे चित्र गावोगावी दिसत आहे. ग्रामसेवक, सरपंच यांचे दुर्लक्ष, गटबाजीचे राजकारण आणि प्रशासनाची उदासीन भूमिका यामुळे तंटामुक्त समित्या फक्त

### तंटामुक्त गाव पुरस्कारही नामशेष

एकेकाळी तंटामुक्त गाव पुरस्कारामुळे गावोगावी शांततेची स्पर्धा होती. अनेक गावांनी सन्मानही मिळवला. आज समित्याच नाहीत, पुरस्कारही नाही. परिणामी प्रोत्साहन, उत्साह आणि तंटामुक्तीची भावना संपत चालली असून शासनाची ही योजना पूर्णपणे दुर्लक्षित झाल्याचे स्पष्ट चित्र समोर आले आहे.

कागदावरच उरल्या आहेत. समिती सदस्यांचा कार्यकाल संपूनही नव्या सदस्यांची निवड झालेली नाही. बैठकांचा पत्ताच नाही.समितीच्या अभावामुळे अनेक वादांना राजकीय रंग चढत असून तटस्थ मध्यस्थी मिळत नाही. परिणामी छोटे वाद मोठे होत गुन्हेगारी स्वरूप धारण करत आहेत.

याचा थेट ताण पोलिस यंत्रणेवरही वाढताना दिसत आहे. गावात प्रश्न सुटण्याऐवजी संघर्ष वाढतो आहे, ही गंभीर बाब आहे.तंटामुक्त समित्या पुन्हा कार्यान्वित करून त्यांना ठोस अधिकार दिले नाहीत, तर गावातील तणाव आणखी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

`शांतता, सुव्यवस्था आणि सलोखा राखण्यासाठी समित्यांचे तातडीने पुनर्गठन व्हावे, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे. अन्यथा 'तंटामुक्त गाव' ही संकल्पनाच इतिहासजमा होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# पोलिस विभागात मोठा उलथापालथ; दहा अधिकाऱ्यांची खांदेपालट

## कारंजा एमडी ड्रग्स प्रकरणामुळे खळबळ

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्हा पोलिस दलात मागील काही दिवसांत मोठा प्रशासकीय बदल झाला आहे. पोलिस अधीक्षक अनुराग जैन यांच्या नागपूर बदलीनंतर दहा पोलिस अधिकाऱ्यांची खांदेपालट करण्यात आली आहे. काही अधिकाऱ्यांना नवीन पोलिस ठाण्याची जबाबदारी देण्यात आली असून, काहींना महत्त्वाच्या विभागांमध्ये नियुक्ती करण्यात आली आहे.

आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक देवेंद्र ठाकूर यांना पुन्हा सेलू पोलिस ठाण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. तर सेलूच्या ठाणेदार मनोज गभने यांना आर्थिक गुन्हे शाखेत नियुक्त केले गेले आहे.नियंत्रण कक्षाचे पोलिस निरीक्षक अनिल मेश्राम यांना वर्धा शहर पोलिस ठाण्याच्या गुन्हे शाखेची जबाबदारी दिली गेली आहे. जिल्हा विशेष शाखेचे पोलिस निरीक्षक यशवंत कदम यांना दहेगाव पोलिस ठाण्याचे प्रभारी केले गेले आहे.कारंजा घाटगे पोलिस ठाण्याचे प्रभारी ठाणेदार नागेशकुमार चतरकर यांना सेवाग्राम पोलिस ठाण्यात, तर कारंजा पोलिस निरीक्षक महेश भोरटेकर यांना जिल्हा विशेष शाखेची जबाबदारी सोपवली गेली आहे.

सेवाग्रामचे ठाणेदार सदाशिव ढाकणे यांना नियंत्रण कक्ष व सायबर पोलिस स्टेशनमध्ये नियुक्त केले गेले आहे. जिल्हा विशेष शाखेचे एपीआय आशिषसिंह ठाकूर यांना स्थानिक गुन्हे शाखेत पाठवले गेले, तर आर्थिक गुन्हे शाखेचे एपीआय निशांत फुलेकर यांना एलसीबीच्या एनडीपीएस विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे.कारंजा शहरात एमडी ड्रग्स बनवण्याचा कारखाना सापडल्याने जिल्हा पोलिस दलात खळबळ उडाली होती. यामुळे कारंजा पोलिस ठाण्याचे ठाणेदार महेश भोरटेकर आणि काही कर्मचाऱ्यांना मुख्यालयात अटॅच केले गेले होते.पोलीस अधीक्षकांच्या आदेशानंतर झालेल्या या बदलीत दहा अधिकाऱ्यांची नियुक्ती झाली असून, यामुळे जिल्हा पोलिस दलातील सुव्यवस्था, कायदा व प्रशासनात सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## संक्षिप्त

### हिंगणी येथे संगीतमय श्रीमद् भागवत कथा सप्ताह

**सेलू-** सेलू तालुक्यातील हिंगणी येथे संगीतमय श्रीमद् भागवत कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा या आध्यात्मिक सोहळ्याचे तिसरे वर्ष असून गुरुवार २५ डिसेंबर ते १ जानेवारी २०२६ या कालावधीत कथा सप्ताह पार पडणार आहे.या सप्ताहात भागवताचार्य ह. भ. प. श्री शामदादा महाराज काळमेघ (अमरावती) यांच्या ओघवत्या व भक्तिरसपूर्ण प्रवचनांचा लाभ भाविकांना मिळणार आहे. त्यांच्या कथाकथनाला परिसरात मोठी प्रतिष्ठा असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.दररोज सकाळी ६ वाजता काकड आरती, सायंकाळी ६ वाजता हरिपाठ तर सायंकाळी ७ ते १० या वेळेत संगीतमय भागवत कथा होणार आहे. या कथेसाठी तबला वादक आदेश कोळमकर, ऑर्गन वादक सुभाष महाराज कवळे, गायक मारुती महाराज भोयर, पेंड वेदांत कटारे तसेच झाकी सजावटीसाठी सम्राट पवन महाराज यांची साथ लाभणार आहे.१ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता भव्य दिंडी सोहळ्याने कथा सप्ताहाचा समारोप होणार असून सायंकाळी ५ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या संगीतमय व आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी हिंगणीसह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक मंडळातर्फे करण्यात आले आहे.

# सुरगाव येथील जिममध्ये चोरी; युवकांमध्ये नाराजीचे वातावरण

**सेलू/ जनमाध्यम**

तालुक्यातील सेलू नजिकच्या सुरगाव येथील घाडेघाट परिसरात असलेल्या जुन्या जि. प. शाळेवरील जिममध्ये मंगळवारी रात्री चोरीची घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे जिममध्ये नियमित व्यायाम करणाऱ्या युवकांमध्ये तीव्र नाराजी व नैराश्याचे वातावरण पसरले आहे.

सुरगाव-कामठी (अंतरगाव) मार्गावरील सुर नदीच्या काठावर असलेल्या या जिममध्ये आज सकाळी व्यायामासाठी गेलेल्या सदस्यांच्या लक्षात चोरीचा प्रकार आला. गेल्या दोन दिवसांपासून काही युवक जिममध्ये गेले नव्हते. आज सकाळी जिम उघडण्यासाठी गेले असता मुख्य दरवाज्याचे कुलूप तुटलेले आढळून आले. आत पाहणी केली असता जिममधील बहुमूल्य साहित्य गायब असल्याचे निदर्शनास आले.या जिमसाठी आमदार डॉ. पंकज भोयर आणि माजी खासदार रामदास तडस यांच्या प्रयत्नातून सुरगाव येथील समाजसेवक युवक उमेश कांबळे यांनी सुमारे १५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. गावातील युवक नशेच्या आहारी जाऊ नयेत आणि आरोग्य सुदृढ राहावे, या सामाजिक उद्देशाने या जिमची उभारणी करण्यात आली होती.मात्र, जिमच्या खोलीतून



चोरी झाल्याची घटना समोर येताच युवकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. या जिममधून व्यायामासाठी वापरण्यात येणाऱ्या संपूर्ण वजन प्लेट्स, डंबेल्स, बार आदी साहित्य चोरीस गेले आहे. यासह काही सदस्यांच्या वैयक्तिक वस्तू तसेच पोलीस भरतीसाठी उपयोगी येणारा गोळाही चोरट्यांनी लंपास केला आहे.चोरट्यांनी जिमच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश करून सर्व साहित्य चोरून नेल्याचे स्पष्ट झाले आहे. या घटनेमुळे सामाजिक उपक्रमाला धक्का बसला असून चोरट्यांचा लवकरात लवकर शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी युवकांकडून करण्यात येत आहे.

# शेतकऱ्याचा शेतात आढळला मृतदेह

**सेलू/ जनमाध्यम**

तालुक्यातील सालई (कला) शिवारात एका शेतकऱ्याचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. विश्वनाथ सर्जेराव खंडाते (वय ४५, रा. सोंडी) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. या प्रकरणी सेलू पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, विश्वनाथ खंडाते हे पत्नीसोबत शेतात गेले होते. दोघांनी दिवसभर कापूस वेचणीचे काम केले. सायंकाळी पत्नी घरी परतली, तर विश्वनाथ हे वन्यप्राण्यांपासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी शेतातच थांबले. नेहमीप्रमाणे ते उशिरा घरी परततील, असे कुटुंबियांना वाटत होते. मात्र रात्र उलटूनही ते घरी न आल्याने सोमवारी सकाळी कुटुंबियांनी त्यांचा शोध सुरू केला.या शोधादरम्यान विश्वनाथ खंडाते यांचा मृतदेह शेतात आढळून आला. त्यांच्या शरीरावर गंभीर जखमा दिसून आल्याने घातपाताची शक्यता वर्तविली जात आहे.

माहिती मिळताच सेलू पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. पंचनाम्यानंतर प्रज्वल लटारे यांच्या रुग्णवाहिकेद्वारे मृतदेह उत्तरिय तपासणीसाठी सेलू ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आला. या घटनेचा पुढील तपास सेलू पोलीस करीत आहेत.

## राष्ट्रीय शेतकरी दिन उत्साहात साजरा

# शेतकऱ्यांचा सन्मान हाच राष्ट्राचा सन्मान : डॉ जीवन कतोरे



**वर्धा/जनमाध्यम**

भारताचे पाचवे प्रधानमंत्री आणि शेतकरी नेते चौधरी चरण सिंह यांच्या जयंतीनिमित्त देशभरात राष्ट्रीय शेतकरी दिन म्हणून उत्साहात साजरा केला जातो. या अनुषंगाने कृषि विज्ञान केंद्र व नायरा एनर्जी लिमिटेडच्या संयुक्त विद्यमाने केंद्रीय कृषि मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या उपस्थितीत पुसा येथे आयोजित कार्यक्रमाचे थेट प्रसारण करण्यात आले.

याप्रसंगी भारतीय कृषि अनुसंधान संस्था, पुसा येथून केंद्रीय किसान कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी थेट प्रक्षेपणाद्वारे शेतकऱ्यांना संबोधित केले. प्रगत बियाणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, कीटकनाशकांवरील खर्च कमी करण्यासाठी ड्रोन आणि नॅनो-युरियाचा वापर, हमीभाव दर खरेदी सुनिश्चित करणे, पीक विमा योजनेद्वारे नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांना संरक्षण, शेतकऱ्यांनी केवळ कच्चा माल न विकता त्यावर प्रक्रिया करून अधिक नफा मिळवणे या विषयांवर शिवराज सिंह चौहान यांनी भर दिला.कृषि विज्ञान केंद्र येथे कार्यक्रमाकरिता वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. जीवन कातोरे, नायराचे डेपो मॅनेजर संजय अग्रवाल, श्री. राधाकृष्ण, माजी सरपंच राजश्री गावंडे, बायफच्या अस्मिता भांदक्कर, ग्रामसेवक दीपक होले उपस्थित होते. याप्रसंगी दहेगाव (गावंडे), निमगाव, अंबोडा, दहेगाव (स्टेशन) व दहेगाव (मिस्कीन) या गावातील शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.शेतकरी अन्नदाता आहे व त्यांचा सन्मान करणे म्हणजे आपल्या राष्ट्राचा सम्मान करणे होय. कपाशी व हरभरा पिकांसोबत शेती आधारित उद्योग करणे देखील अत्यावश्यक आहे, असे आवाहन या प्रसंगी वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. जीवन कातोरे यांनी केले. माजी सरपंच राजश्री गावंडे यांनी गावातील शेतकऱ्यांनी कृषि विज्ञान केंद्रातील तांत्रिक मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असा सल्ला दिला. विस्तार शिक्षण विषयतज्ञ डॉ. अंकिता अंगाईतकर यांनी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला आयोजित राज्यस्तरीय भव्य प्रदर्शनी ॲग्रोटेक - २०२५ विषयी शेतकऱ्यांना माहिती दिली. चंदू वाघाडे यांनी प्रकल्पाद्वारे होणारे उपक्रम याविषयी माहिती केली. यावेळी प्रगतीशील शेतकरी इरफान अली, प्रीतम कडू, माधव घोडे, स्नेहलता सावरकर, आशिष दिघीकर, शंकर आडे, केतन कडूकर यांचा कृषि व कृषि आधारित उद्योग क्षेत्रामध्ये उत्कृष्ठ कार्य केल्याबद्दल मान्यवरांच्याहस्ते गौरव करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीसाठी कृषि विज्ञान केंद्रातील पायल उजाडे, गजबीये, गजेंद्र मानकर, किशोर उगलमुगले तसेच नायरा व बायफचे सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी योगदान दिले.

# गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेला गुंड दोन महिन्यांसाठी तडीपार

## दहेगाव पोलिसांची ठोस कारवाई

**सिंदी (रेल्वे)/जनमाध्यम**

दहेगाव गोसावी पोलिस स्टेशन हद्दीतील देऊळगाव येथील रहिवासी नरेश व्यंकट मोहिते (वय ३८) याला दोन महिन्यांसाठी तडीपार करण्यात आले आहे. त्याच्यावर दहेगाव, सेवाग्राम, वर्धा शहर, सेलू आदी पोलिस ठाण्यांत गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असून त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे परिसरातील शांतता व सुव्यवस्थेला धोका निर्माण होण्याची शक्यता होती.

नरेश मोहिते याच्या हालचालींमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असा अहवाल दहेगाव पोलिसांनी तयार केला होता. त्यानुसार महाराष्ट्र पोलिस कायद्याच्या कलम ६५ (१) (अ) अन्वये तडीपारीचा प्रस्ताव उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांमार्फत पोलिस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय महसूल अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला.या प्रस्तावावर उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय न्याय दंडाधिकारी दीपक करंडे यांनी विचार करून दोन महिन्यांसाठी हद्दपारीचा आदेश दिला. आदेशानंतर दहेगाव पोलिसांनी तात्काळ कारवाई करत नरेश मोहिते याला ताब्यात घेतले व पोलिस स्टेशन हद्दीबाहेर नेऊन सोडले.

ही कारवाई पोलीस कर्मचारी धर्मेंद्र तोमर, आनंद भस्मे, ब्रह्मानंद मुन, प्रदीप डोंगरे, नितीन डाखोळे, किरण आडे व अनिल चिलगर यांनी केली.या तडीपारीच्या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, गुन्हेगारी प्रवृत्तीवर अंकुश ठेवण्यासाठी पोलिसांची भूमिका अधिक कठोर होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# हिंगणघाट उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना स्वेटर व ब्लँकेटचे वाटप

## नारायण सेवा मित्र परिवाराच्या समाजसेवी उपक्रमाचा गौरव

**हिंगणघाट/जनमाध्यम**

हिंगणघाट उपजिल्हा रुग्णालयात वाढत्या थंडीच्या पार्श्वभूमीवर रुग्णांना थंडीतून बचाव मिळावा यासाठी नारायण सेवा मित्र परिवार या समाजसेवी संस्थेच्या वतीने स्वेटर व ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. उपजिल्हा रुग्णालयात मध्यमवर्गीय रुग्ण तसेच गरोदर व बाळंतिणी मातांचा मोठ्या प्रमाणावर उपचार होत असल्यामुळे हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे.

कार्यक्रमात गीमाटेक्सच्या संचालिका लतादेवी मोहता, डॉ. सोनाली वासाडे, डॉ. रश्मी खिळेकर, डॉ. नम्रता जानईकर,



डॉ. आशिष लांडे, डॉ. रुईकर आणि मित्र परिवाराचे अध्यक्ष महेश अग्रवाल यांच्या हस्ते रुग्णांना स्वेटर व ब्लँकेट वितरण करण्यात आले.समाजसेवी लतादेवी मोहता यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, मित्र परिवाराच्या या उपक्रमाचे कौतुक केले पाहिजे. नरसेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे. तळागातील गरजू, निराधार वृद्ध लोकांना आधार देणे, त्यांना मदत करणे व जीवनात आधार देणे हीच खरी सेवा आहे.कार्यक्रमाला नारायण सेवा मित्र परिवार हिंगणघाटचे सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचारी यांनी या उपक्रमासाठी मोलाचे सहकार्य केले.उपक्रमाद्वारे रुग्णांना थंडीपासून संरक्षण मिळाले व सामाजिक बांधिलकीची उदाहरणे राबविण्यात आली. नागरिकांनी या प्रकारचे समाजसेवी उपक्रम कौतुकास्पद असल्याचे सांगितले. तसेच यासारख्या कार्यक्रमांमुळे रुग्णालयातील वातावरण सौहार्दपूर्ण राहणे, रुग्णांचा कल्याण साधणे आणि समाजात एकता व सेवा भावना वृद्धिंगत होणे अपेक्षित आहे.या उपक्रमातून स्थानिक समाजसेवी संस्था रुग्णांसाठी सतत कार्यरत असून गरजू लोकांच्या जीवनात सुधारणा घडविण्याचे उद्दिष्ट साधत आहे.

# महाशिबीराचा ५०० हून अधिक लाभार्थ्यांनी घेतला लाभ

**हिंगणघाट/जनमाध्यम**

श्री. साई प्रतिष्ठान, नंदोरी रोड हिंगणघाट येथे श्री. संत साई बाबा मूर्ती प्राण प्रतिष्ठापना दिन व संत लक्ष्मी माता पुण्यतिथी महोत्सव निमित्ताने नि:शुल्क आरोग्य तपासणी व औषधोपचार महाशिबीर उत्साहात पार पडला. या शिबिरात सेवाग्राम येथील कस्तुरबा गांधी हॉस्पिटल मधील तज्ञ डॉक्टर उपस्थित होते. जनरल मेडिसिन, सर्जरी, स्त्री रोग व प्रसूती तपासणी, बालरोग तपासणी, अस्थी रोग तपासणी, कान-नाक-घसा तपासणी, कर्क रोग तपासणी, दंत चिकित्सा,



नेत्र चिकित्सा आणि न्युरो सर्जरी यासह सर्व आजारांवर सल्ला व तपासणी करण्यात आली. महाशिबिरात शहरातील ५०० हून अधिक लाभार्थ्यांनी सहभाग घेतला आणि आरोग्य तपासणीचा लाभ मिळवला.यावेळी श्री. साई प्रतिष्ठानचे अध्यक्ष योगेश्वर महाराज, सचिव अतुल वांदिले तसेच साई सेवा समितीचे पदाधिकारी, साईसेवक व साईसेविका उपस्थित होते. या शिबिरामुळे स्थानिक नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता वाढली व दर्जेदार वैद्यकीय सेवा प्रदान झाल्या.

# पालक-मुलांतील संवाद मजबूत झाला तरच संस्कारक्षम पिढी घडेल-प्रा.प्रफुल्ल दाते

**वर्धा/जनमाध्यम**

बदलत्या जीवनशैलीत मुलांचे संगोपन करताना पालकांसमोर अनेक अडचणी उभ्या ठाकत आहेत. केवळ गुण, क्रमांक आणि यश यांवर लक्ष केंद्रित न करता मुलांच्या मानसिक, भावनिक व नैतिक विकासाकडे लक्ष देणे आज अत्यावश्यक झाले आहे. योग्य वेळी योग्य संवाद साधून संस्कार दिले, तरच सुसंस्कारित आणि आत्मविश्वासू पिढी घडू शकते. त्यामुळे पालकत्व ही केवळ नैसर्गिक जबाबदारी नसून ते एक शास्त्र आहे, असे प्रतिपादन प्रा. प्रफुल्ल दाते यांनी केले.

गजानन नगर येथील एका अकॅडमी तर्फे आयोजित पालक-संवाद सभेत ते प्रमुख वक्ते



म्हणून बोलत होते. या अकॅडमीमध्ये नवोदय विद्यालय, राष्ट्रीय मिलिटरी स्कूल, सैनिक स्कूल तसेच विविध शिष्यवृत्ती परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना शास्त्रशुद्ध पद्धतीने मार्गदर्शन केले जाते.प्रा. दाते यांनी मार्गदर्शन करताना मुलांचे वय, स्वभाव, मानसिक अवस्था आणि आजूबाजूची परिस्थिती यांचा विचार करून पालकांनी संवाद साधणे आवश्यक असल्याचे सांगितले. पालकांच्या अवास्तव अपेक्षांमुळे अनेकदा मुलांवर मानसिक ताण निर्माण होतो. हा ताण वेळेत ओळखून समजूतदारपणा, संयम आणि सातत्यपूर्ण संवाद साधल्यास पालक-मुलांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण होते. शिक्षणाबरोबरच मूल्यसंस्कार, आत्मविश्वास, निर्णयक्षमता आणि जबाबदारीची भावना विकसित करण्यासाठी पालकांनी स्वतः आदर्श ठरण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.यावेळी पालक प्रतिनिधी झाडे व आत्राम यांनी मनोगत व्यक्त करताना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी नियमित, नियोजनबद्ध आणि शिस्तबद्ध अभ्यासाचे महत्त्व विशद केले. अकॅडमीमध्ये अनुभवी मार्गदर्शकांकडून शास्त्रीय पद्धतीने तयारी करून घेतली जात असल्याने विद्यार्थ्यांना निश्चितच यशाचा मार्ग सुलभ होत असल्याचे त्यांनी सांगितले.या पालक-संवाद सभेला पालकांची उत्स्फूर्त व मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभली. पालकत्वाबाबत निर्माण झालेली जाणीव आणि संवादाची गरज या सभेतून प्रभावीपणे अधोरेखित झाली.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १४ अंक ३०**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.: ३३६/२०२५
ने.ता.२२.०१.२०२६

**१.निरंजन नामदेव हिंगलासपुरे**
**२.रमेश नामदेव हिंगलासपुरे**
रा.जय नगर रुख्मीणी नगर,अमरावती
**३.गजानन नामदेव हिंगलासपुरे**
ता.जि.अमरावती
**४.सुधाकर नामदेव हिंगलासपुरे,**
रा.वार्ड नं.३ पापळ, ता.नांदगाव खंडेश्वर
जि.अमरावती

// वि //
निरंक

ज्याअर्थी **मयत नामदेव तुळशीराम हिंगलासपुरे यांचा मृत्यू दि.२४.०७.२०१९ रोजी पापळ, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला. **मयतांची पत्नी नामे अंककला नामदेव हिंगलासपुरे** यांचा मृत्यू **दि.१५.१०.२०१७** रोजी **पापळ,** ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार क्र.१ ते ४ ही मुले आहेत. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज **दिनांक १९ डिसेंबर २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

## जाहिर नोटीस

जा.क्र./धसआ/अधि/3776/2025
दिनांक : 03/07/2025
अर्ज क्र.006 / कलम 70 (अ)/2023
परमहंस दयालेश्वर ट्रस्ट, खानमपुर पांढरी,
ता. अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती
रजि. नं. ए– 2425/अमरावती
अर्जदार–श्री.बाबुराव वामनराव कोकाटे विरूध्द
गैरअर्जदार – श्री. डॉ. विनायक पांडुरंग कोकाटे +6

ज्या अर्थी, परमहंस दयालेश्वर ट्रस्ट, खानमपुर पांढरी ता. अंजनगांव सुर्जी जि.अमरावती रजि. नं. रजि. नं. ए–2425 /अमरावती या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या सादरकर्ता यांनी कलम 70 अंतर्गत दि. 02/01/2023 रोजी अर्ज मा. धर्मादाय सह आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचे कडे दाखल केला आहे, त्याअर्थी हितसंबंध असलेल्या संबंधीत गैर अर्जदार क्र.
1. श्री. जयंत नरेशराव बहादुरे, रा. पांढरी खानमपुर ता. अंजनगांव सुर्जी जि.अमरावती
2. श्री. श्रीनिवास तुळशीराम पाटिल रा. पांढरी खानमपुर ता. अंजनगांव सुर्जी जि.अमरावती

यांना कळविण्यात येते की, सदर रिव्हीजन प्रकरणास आपणास काही आक्षेप / हरकत असल्यास, आपण आपली हरकत सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते पुढील तारखेच्या आंत मा. धर्मादाय सह आयुक्त, अमरावती यांचे कार्यालयात जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधी मार्फत किंवा योग्य रितीने सुचना दिलेल्या वकीलांमार्फत खालील सही करणार यांचे) समोर दिलेल्या पत्त्यावर दि. 04/08/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता हजर राहुन दाखल करावे. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक 03/07/2025 रोजी माझे सही शिक्क्यांनिशी व धर्मादाय सह आयुक्तांच्या शिक्क्यानीशी ही नोटीस दिली.

प्र. अधिक्षक (न्याय)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

## जाहीर नोटीस

प्रो.नं. ४६९३ /२०२५
दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापुर
दि.१८/१२/२०२५

**वि.सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय**

किरकोळ अर्ज क्र.५०७/२०२५ — ने.ता.२०.०१.२०२६

**अर्जदार -** १. **संगिता ज्ञानेश्वर कात्रे,** वय ५० वर्षे, धंदा - घरकाम
रा.वडनेर गंगाई, ता.दर्यापूर, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** १. **साक्षी गणेश कात्रे,** वय २२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.व्दारा बाबुराव ढेंगे, म्हातोडी, ता.जि.अमरावती

या जाहीर नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की,**गणेश ज्ञानेश्वर कात्रे** हे दिनांक **२९.०९.२०२५ रोजी मरण पावले आहे.**

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन - गणेश ज्ञानेश्वर कात्रे** यांचे नावे खालील प्रमाणे मिळकत आहे.

(१) मौजा वडनेर गंगाई, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील शेत गट क्र.९६६,क्षेत्र ११.२३ हे.आर.पैकी ० हे ७० आर. आ.रु. ३.६३

(२) मौजा वडनेर गंगाई, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील प्लॉट भूमापन क्र.व उपविभाग ४/३० क्षेत्र १.६०.०० चौ.मि.

(३) मोटार सायकल स्कुटर एन.टी.(बजाज) मॉडेल पल्सर- १२५ डीटीएसआय, नोंदणी क्र. एमएच-२७/डीएम-०६६५, इंजिन नं.डीएचएक्सडब्ल्यूपीके ३८०११, चेसिस नं. एमडी२बीइ६४बीएक्स ६ पीडब्ल्यूके २९१३२

वरील सर्व मिळकतीची बाजारभाव किंमत १,००,००० रु.आहे

आज दि.**१८.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक (प्रशा.)**
दिवाणी न्यायालय व.स्तर , दर्यापूर

## तहसीलदार अमरावती यांचे कार्यालय

सांस्कृतिक भवन समोर, आय.टी.आय.कॉलेजजवळ, मोर्शी रोड, अमरावती
**दुरध्वनी** क्र.०७२१-२५७५५२२ **ई.मेल-** tah.amravati@gmail.com
क्र.म.स./प्रस्तु-१/म.स./कावि/६०९५/२०२५ — दि.२३.१२.२०२५

## जाहीरनामा

सदर्हु जाहीरनाम्यानुसार अर्जदार मयूर दिलीप पोलादे, रा.डवरगांव, ता.जि.अमरावती यांनी मौजा डवरगांव येथील शेत सर्व्हे नं.३४० या ७/१२ मधील मारोती संस्थान, डवरगांव यांचे नांवे करुन मिळण्याबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

करीता वरील प्रकरणामध्ये कुणाची हरकत वा आक्षेप असल्यास त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून ०७ दिवसांचे आत आपले आक्षेप अर्ज स्वतः वारसामार्फत किंवा वकीलामार्फत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात सादर करावेत. त्यानंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

शिक्का

स्वाक्षरी,
तहसीलदार, अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२९७३/२०२५
**सुनील व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०५.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Sunil Ramlalji Bone, Age 54 Yrs. Occu.: Business
R/o Near School No.19, Rukhmini Nagar, Amravati.
3. Sau.Jyoti Dinesh Kondane, Age 49 Yrs. Occu.: Household
3. Sau.Sangita Naresh Kondane, Age 47 Yrs. Occu.: Household
Both 2 & 3 R/o Shiv Charan Peth, Near Saibaba Gym, Shivaji Nagar, Old City, Akola

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **रामलालजी गंगारामजी बोने व पुष्पा रामलालजी बोने** हे अनुक्रमे दिनांक 03.09.2022 व 23.12.2008 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुनील व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुनील व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२२.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १०७**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर सुचना

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करतो की, माझे पक्षकार **बबनराव भिमरावजी गावंडे,** रा.अचलपूर, ता. अचलपूर, जि. अमरावती यांनी दि.२९/०३/२०१० रोजीचे खरेदी दस्त क्र.११६५ नुसार मौजे -परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती येथील नझुल शिट नं.१९-डी मधील नझुल प्लॉट नं.१७०/१ भाग ज्याचे क्षेत्रफळ २६५.७९ चौ.मि. व त्यावरील बांधकाम सह हा मनोजकुमार गुलाबचंदजी जोशी यांचे कडून विकत घेतला आहे.

हयाप्रमाणे सदर खरेदी दि.२९/०३/२०१० रोजीचे दस्त क्र.११६५ चे **मुळ खरेदी दस्त** माझे पक्षकार बबनराव भिमरावजी गावंडे यांचे जवळ आहे. परंतु सदर मालमत्तेचे पूर्वीचे मुळ खरेदी दस्त जसे दि.२५/०४/२००६ रोजी दस्त अ.क्र.१२०५ चे दस्त **अ.क्र.१२०५ चे दस्त, हे या जाहीर सुचनेचा विषय असुन** सदर दस्ताचे मुळ खरेदीखत व त्याची पावती माझे पक्षकार यांचे कडून गहाळ झालेली आहे.

सदर हरविलेल्या दस्ताची रितसर दि.११/१२/२०२५ पोलीस स्टेशन परतवाडा येथे तक्रार दाखल केलेली आहे.

तरी सदर प्लॉट बाबत कोणाचोही, कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, हितसंबंध व इतर कोणतीही भानगड, कायदेशिर वाद, लवाद,दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहीर सुचनेपासुन १५ दिवसाचें आंत खालील पत्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा. त्यानंतर आक्षेप आल्यास याची नोंद घेतली जाणार नाही.

दिनांक १२/१२/२०२५
अमरावती.

ॲडव्होकेट
**राहुल व्ही.मोहोड**
प्रेरणा कॉलनी, राधा नगर,
अमरावती- ४४४६०३
मो.क्र.९०९६४६०६७०

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.ए.बी.कटटे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - २९४९/२०२५**
**भाग्यवंत व इतर विरुध्द निरंक**
**पुढील तारीख ०३.०२.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. **Bhagyavant Kisanrao Bhalerao**
Age 59 yrs., Occu.- Labour
R/o. Anjanwadi Dhamangaon Rly, Tq. D.Rly, Dist. Amravati
2. **Yogesh Kisan bhalerao (Dead)**
**2(a) - Anita Yogeshwar Bhalerao**
Age 47 yrs., Occu.- Household
R/o. Ramgaon, Rahatgaon, Amravati
**2(b) Tejaswini Sangapal Thorat**
Age 28 yrs., Occu.- Household
R/o. C/o. Sanagapal Thorat,, At Post Gawandgav Bu. Gavandgaon Bk. Gawandgaon, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत किसनराव दौलतराव भालेराव हे दि.२५.०९.२००४** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार भाग्यवंत व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार भाग्यवंत व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २२.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि. अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.७२६/२०२५ — ने.ता.१२.०२.२०२६

**अर्जदार :** १. **पुष्पलता प्रकाश बोबडे,** वय ५३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.पुर्णा नगर, ता.भातकुली, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक शोभा विश्वास तायडे हिचा मृत्यू दि.१२/०७/२०२५ रोजी** रा. थुगांव (पुर्णानगर) ता.भातकुली, जि.अमरावती येथे झालेला आहे. तसेच **मृतक विश्वास नारायण तायडे यांचा मृत्यू दि.२९/०८/२०१९** रोजी रा.इंदिरा नगर, करजगांव, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती येथे झालेला आहे.

यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हे त्यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

अर्जदार मय्यतांचे कायदेशिर वारस असल्यामुळे त्यांना कार्यालयीन कामाकरिता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. **त्याकरिता विद्यमान दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं. ७२६/२०२५ नुसार अर्ज दाखल केला आहे.**

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२३.१२.२०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२५६७/२०२५
**सुभद्रा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०१.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Subhadra Shalikram Pache, Age 73 Yrs. Occu.: Household
2. Shital Sandip Pache, Age 34 Yrs. Occu.: Household
3. Vedansh Sandip Pache, (Through his Natural Guardian Mother Smt.Shital Sandip Pache)] Age 05 Yrs. Occu.: Student
All R/o Bombay Fail, Behind Khatri Complex, Amravati
4. Shivam Sandip Pache, Age 02, Occu.: Nil
Through his natural guardian mother Smt.Shital Sandip Pache
All R/o Bombay Fail, Behind Khatri Complex, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **संदीप शालिकराम पाचे** हे दिनांक 13.09.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुभद्रा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुभद्रा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १५.११.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२८५६/२०२५
**श्री.मोहनलाल अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.२२.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Mohanlal Laxminarayanji Dayma, Age 74Yrs. Occu.: Business
3. Gopal Laxminarayan Dayma, Age 61 Yrs. Occu.: Business
Both R/o Near Satkhiradi Vihar Indrabhuvan Theatre, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सोमन लक्ष्मीनारायण दायमा** हे दिनांक 30.09.2022 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **मोहनलाल अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मोहनलाल अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

# रेकॉर्डवरील गुन्हेगार घातक शस्त्रासह ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरत असलेल्या रेकॉर्डवरील गुन्हेगारास घातक शस्त्रासह ताब्यात घेऊन मोठी कारवाई अमरावती शहर गुन्हे शाखेने केली आहे. राजापेठ पोलीस ठाणे हद्दीत ही कारवाई करण्यात आली असून, आरोपीकडून लोखंडी कोयता जप्त करण्यात आला आहे.

गुन्हे शाखा अमरावती शहरला गुप्त माहिती मिळाली होती की, मुदस्सीर अहमद मोहम्मद फिरोज (वय २०, रा. कसाबपुरा, वलगाव, अमरावती) हा रेकॉर्डवरील गुन्हेगार राजपूत ढाबा ते वलगाव रोडवरील हनुमान मंदिराजवळ कमरेला लोखंडी कोयता लावून गुन्हा करण्याच्या तयारीत उभा आहे. या खात्रीशीर माहितीनुसार पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ सापळा रचून सदर इसमास ताब्यात घेतले. झडतीदरम्यान आरोपीच्या ताब्यातून एक लोखंडी कोयता (अंदाजे किंमत १,२००) असा घातक शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन राजापेठ येथे शस्त्र अधिनियम कलम ४/२५ तसेच मपोका कलम १३५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

**(शहीद अण्णासाहेब राऊत बहुउद्देशीय संस्था, शिराळा, ता.जि.अमरावती)**
**नोंदणी क्रमांक एफ-९६८२ (अमरावती)**
**कार्यकारी मंडळ, निवडणूक-२०२६**

## निवडणूक कार्यक्रम पत्रिका

शहीद अण्णासाहेब राऊत बहुउद्देशीय संस्था, शिराळा, ता.जि.अमरावती, नोंदणी क्र.एफ-९६८२ (अमरावती) या न्यासाचे सभासदांना कळविण्यात येते की, सदर न्यासाची नियम व नियमावलीप्रमाणे निवडणूक घेणेसाठी मा.सहायक धर्मादाय आयुक्त-१, अमरावती यांनी चौ.क्र.१९/२०२४ कलम ४१(अ) दिनांक ११.११.२०२५ रोजी आदेश पारित केले आहेत. सदर न्यासाचा नोंदणी क्र.माझेकडे असल्यामुळे मी राहूल पांडुरंग पाटील, निरिक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती या संस्थेच्या निवडणूक कामी माझी निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे.

वरील नियुक्ती आदेशानुसार मी निवडणूक अधिकारी या नात्याने शहीद अण्णासाहेब राऊत बहुउद्देशीय संस्था, शिराळा, ता.जि.अमरावती, नोंदणी क्र.एफ-९६८२ (अमरावती) या न्यासाची नियम व नियमावलीनुसार निवडणूक कार्यक्रम पुढीलप्रमाणे जाहीर करीत आहे याची न्यासाच्या सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.

| अ.क्र. | तपशील | दिनांक व वार | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | संस्थेच्या वतीने अर्जदार यांनी पुरविलेली सभासदांची तात्पुरती यादी प्रसिध्द करणे | ०२.०१.२०२६ शुक्रवार | सकाळी ११.०० वा. | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती |
| २. | न्यासाचे सभासद निवडणुकीकरीता प्राथमिक सभासद/मतदार यादी प्रसिध्द करणे | ०५.०१.२०२६ सोमवार | सकाळी ११.०० वा. | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती |
| ३. | न्यासाचे सभासद निवडणुकीकरीता प्राथमिक सभासद/मतदार यादीवर आक्षेप स्विकारणे | ०६.०१.२०२६ मंगळवार | सकाळी ११.०० ते ५.०० वाजता | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती |
| ४. | न्यासाचे सभासद निवडणुक बाबत प्राथमिक सभासद/मतदार यादीवर आक्षेप बाबत सुनावणी | ०७.०१.२०२६ बुधवार | सकाळी ११.०० ते २.०० वाजता | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती |
| ५. | न्यासाचे सभासद निवडणुक बाबत अंतिम सभासद/मतदार यादी प्रसिध्द करणे | ०७.०१.२०२६ गुरुवार | दुपारी २.३० वाजता | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती |
| ६. | न्यासाचे सभासद निवडणुकीकरीता उमेदवारी अर्ज विक्री करणे | ०८.०१.२०२६ गुरुवार | सकाळी ११.०० ते ५.०० वाजता | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती |
| ७. | न्यासाचे सभासद निवडणुकीकरीता उमेदवारी अर्ज स्विकारणे | ०८.०१.२०२६ गुरुवार | सकाळी ०२.०० ते ५.०० वाजता | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती |
| ८. | न्यासाचे सभासद निवडणुकीकरीता उमेदवारी अर्जाची छाननी करणे | ०९.०१.२०२६ शुक्रवार | सकाळी ११.०० ते २.०० वाजता | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अमरावती |
| ९. | न्यासाचे सभासद निवडणुकीकरीता उमेदवारी यादी प्रसिध्द करणे | ०९.०१.२०२६ शुक्रवार | दुपारी २.३० वाजता | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती |
| १०. | न्यासाचे सभासद निवडणुकीकरीता उमेदवारी अर्ज मागे घेणे | १२.०१.२०२६ सोमवार | सकाळी ११.०० ते २.०० वाजता | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती |
| ११. | न्यासाचे सभासद निवडणुकीकरीता उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करणे | १२.०१.२०२६ सोमवार | दुपारी २.३० वाजता | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती |
| १२. | सर्वसाधारण सभेमध्ये गुप्त मतदान पध्दतीने न्यासाचे सभासदांचे निवडसाठी मतदान | १३.०१.२०२६ मंगळवार | सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वा. पर्यंत | दुर्गा इंग्लिश प्रायमरी स्कूल, शिराळा ता.जि.अमरावती |
| १३. | निवडणूक मत मोजणी व निकाल | १३.०१.२०२६ मंगळवार | दुपारी २.०० नंतर | दुर्गा इंग्लिश प्रायमरी स्कूल, शिराळा ता.जि.अमरावती |

**सुचना -**

१) नियम व नियमावलीनुसार जास्तीत जास्त ११ सभासदांची निवड करावयाची असून त्यामध्ये न्यासाचे घटनेनुसार ११ सभासदांची निवड करण्यात येईल.
२) न्यासाचे सभासद म्हणून निवडून यायचे असेल तर तो उमेदवार न्यासाच्या घटनेप्रमाणे सभासद असलाच पाहिजे.
३) ज्या व्यक्ती सदर न्यासाचे सभासद आहेत, त्यांनाच उमेदवारी अर्ज स्वतः निवडणूक अधिकारी यांचेसमोर प्रत्यक्ष हजर राहून घ्यावा व स्वतः भरुन दाखल करावा. उमेदवारी अर्ज नेतांना व दाखल करतांना उमेदवाराने मूळ ओळखपत्र दाखविणे आवश्यक आहे. उमेदवारी अर्ज अन्य कुणामार्फत दिले अथवा स्विकारले जाणार नाही.
४) मतदार यादी पाहिजे असल्यास निवडणूक अधिकारी यांचेकडे कार्यालयीन वेळेवर सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती येथे मिळतील.
५) मतदार यादीवर आक्षेप नोंदवितांना पुराव्यासह आक्षेप नोंदवावा व आक्षेपावर कार्यवाही करावयाची किंवा नाही हे निवडणूक अधिकारी यांच्या अधिकार क्षेत्रात राहील.
६) उमेदवारांनी आपला निवडणूक प्रतिनिधी द्यावयाचा असल्यास मतदान सुरु होण्याच्या एक दिवस अगोदर आपल्या अर्जासह निवडणूक प्रतिनिधीचे नांव व नमुना स्वाक्षरीने नेमणूक करावी.
७) मतदारांनी मतदानाचे वेळी खालील कोणतेही एक ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. मतदान ओळखपत्राशिवाय मतदान करता येणार नाही. (उदा.निवडणूक ओळखपत्र / पॅनकार्ड / वाहन परवाना / आधार कार्ड इत्यादी)
८) उमेदवारी अर्जाची किंमत रु.५००/- (अक्षरी पाचशे रुपये) व मतदार यादीची किंमत रु.१००/- (अक्षरी शंभर रुपये) राहील व ती रक्कम परत मिळणार नाही.
९) मतदान प्रक्रिये संबंधीत सर्व अधिकार निवडणूक अधिकारी यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे.
१०) प्रत्येक मतदाराला न्यासाच्या घटनेच्या नियम व नियमावली प्रमाणे ११ सभासद निवडून द्यावयाचे आहेत. त्या जागेपेक्षा अधिक मते नोंदविता येणार नाही. अधिक मते नोंदविलेल्या मतपत्रिका अवैध समजल्या जाईल.
११) मतदान करण्यासाठी फुलीच्या शिक्क्याचाच वापर ग्राह्य धरला जाईल. अंगठा किंवा लिखाण केलेल्या किंवा कोणत्याही मतदाराने सही केलेली मतपत्रिका अवैध समजल्या जाईल.
१२) सदर निवडणूक प्रक्रिया मा.सहायक धर्मादाय आयुक्त, अमरावती या न्यायालयाचे निकालाचे अधिनस्त राहून घेण्यात येईल.
१३) निवडणूक कार्यक्रम पत्रिकेनुसार कोणत्याही स्तरावर तांत्रिक व वैद्यकीय कारणास्तव निवडणूक प्रक्रिया स्थगित करण्याचे व त्यामध्ये सुधारणा करण्याचे अधिकार निवडणूक अधिकारी यांनाच राहतील. तसेच याबाबत शुध्दीपत्रक काढण्यात येईल.
१४) उमेदवाराला समसमान मते मिळाल्यास ईश्वर चिठ्ठीने विजयी उमेदवार ठरविण्यात येईल.
१५) न्यासाच्या नियम नियमावलीनुसार ११ सभासद निवडायचे असल्याने ११ उमेदवारी अर्ज किंवा त्यापेक्षा कमी उमेदवारी अर्ज प्राप्त झाल्यास निवडणूक अविरोध झाल्याचे घोषित करण्यात येईल.
१६) निवडणूक कार्यक्रमात व्यत्यय किंवा अडचण निर्माण केल्यास निवडणूक स्थगित करण्याचे संपूर्ण अधिकार निवडणूक निर्णय अधिकारी यांना राहतील.
१७) सभासदांचे निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर लगेच १ तासांनी न्यासाचे निवडून आलेल्या सभासदांमधून न्यासाची कार्यकारिणी निवडीकरीता दुर्गा इंग्लिश प्रायमरी स्कूल, शिराळा, ता.जि.अमरावती येथे सभा आयोजित करण्यात येऊन त्यामध्ये न्यासाची कार्यकारिणी मंडळ निवडण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे.**

**कार्यालयाचा पत्ता-**
मा.धर्मादाय सह आयुक्त, अमरावती यांचे कार्यालय,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
गृहनिर्माण भवन, दुसरा माळा, टोपेनगर, अमरावती

**स्वाक्षरी/-**
**(राहूल पांडुरंग पाटील)**
**निवडणूक निर्णय अधिकारी,**
**शहीद अण्णासाहेब राऊत बहुउद्देशीय संस्था, शिराळा,**
**ता.जि.अमरावती नोंदणी क्र.एफ-९६८२ (अमरावती) तथा**
**निरीक्षक,**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती**

## मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.: ३१८/२०२५** — **ने.ता.०६.०१.२०२६**

**अर्जदार :** **शुभम पुंडलिकराव दिघे**
**रा.धानोरा गुरव, ता.नांदगाव खंडेश्वर**
**जि.अमरावती**

**// वि //**

**निरंक**

ज्याअर्थी **मयत अशोक अर्जुनराव दिघे यांचा मृत्यू दि.०६.१०.२०२५ रोजी धानोरा गुरव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला. **मयताचे आई-वडिल नामे शेवंता अर्जुन दिघे व अर्जुन राजाराम दिघे हे मरण पावलेले आहे.** अर्जदार हा मयत यांचा पुतण्या आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज **दिनांक ०६ डिसेंबर २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२६७५/२०२५
**मोहम्मद व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०६.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Mohammad Rafique Abdul Rahman, Age 70 Yrs. Occu.: Nil
3. Mohammad Rizwan Mohammad Rafique,
Age 45 Yrs. Occu.: Business
3. Mohammad Zuber Mohammad Rafique,
Age 40 Yrs. Occu.: Business
All R/o Gawalipura Chandani Chowk, Walgaon Rd. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **फिरदौस शाहीन मोहम्मद रफिक** हे दिनांक 03.05.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **मोहम्मद व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मोहम्मद व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जाचा नमुना**

**दि.१७/१२/२०२५**

**प्रति,**
**निबंधक जन्म/मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत - करजगांव**
**ता. चांदूर बाजार, जि.अमरावती**

**विषय :- जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेबाबत.**
**अर्जदाराचे नांव :- शेख अहमद शेख संत्तार**
**राहणार :- करजगावं**
**मो.- ९४२१८२५४२४**

**मा.महोदय,**

वरील विषयान्वये सविनय अर्ज सादर करतो की माझा **शेख अहमद शेख सत्तार** यांचा **जन्म** ग्रामपंचायत **करजगांव** कार्यक्षेत्रातील **करजगांव** या गावी दिनांक **०३/०७/१९६५** रोजी झालेला आहे.

सदरील **जन्म**/मृत्यू घटनेची नोंद आपल्या ग्रामपंचायतीला झालेली नाही. तसेच इतर कुठल्याही निबंधकाकडे केलेली नाही. सदरील **जन्म**/मृत्यू विलंब नोंदणी करण्यासाठीचे आदेश वरिष्ठ कार्यालयाकडून आणण्यासाठी मला **जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्राची** आवश्यकता आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय दि.१२ मार्च २०२५ नुसार आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत सदर जोडलेले आहे. जोडण्यात आलेले कागदपत्रे व माहिती सत्य असल्याबाबत मी खात्री देत असून चूकीचे आढळून आल्यास माझ्यावर कायदेशिर कार्यवाही होण्यास मी पात्र राहील, याची मला जाणीव आहे.

करिता मला **जन्म** नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यात यावे, ही विनंती.

**अर्जदाराची स्वाक्षरी/ अंगठयाचा ठसा - सही/-**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२८७७/२०२५
**श्री.निलेश अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२३.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Nilesh Pandurangji Shingarwade, Age 51 Yrs. Occu.: Agril.
R/o Behind Shubham Palace, Chaitanya Colony, Amravati.
2. Megha Narendra Mone @ Megha Pandurangji Shingarwade,
Age 49 Yrs. Occu.: Housewife
3. Pankaj Pandurang Shingarwade, Age 46, Occu. : Business
R/o River Residency Phase-2, C-703, Dehu Alandi Road, Chikhali, Rupeenagar, Pune, Tq.Dist.Pune.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **पांडुरंग देवरावजी शिंगरवाडे** हे दिनांक 14.10.2017 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. **अनुसया पांडुरंगजी शिंगरवाडे** ही **२९.१२.२०१७** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाली. अर्जदार **निलेश अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **निलेश अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१९.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

## संक्षिप्त




### पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलला मिनी गोल्फ स्पर्धेत सुवर्ण पदक

**अमरावती-** पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल,अमरावतीच्या खेळाडूंनी राज्यस्तरीय शालेय मिनीगोल्फ स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे.या स्पर्धेत टीम इव्हेंट तसेच डबल इव्हेंट या दोन्ही प्रकारांत शाळेच्या खेळाडूंनी सुवर्णपदक पटकावले आहे.टीम इव्हेंटमध्ये सुवर्णपदक मिळवणारे शौर्य चौहान, हर्ष चव्हाण, तौहीद रझा, क्रिश देहनकर, सूरज मोहोड, अंशुमन सोलव हे विजेते खेळाडू असून डबल इव्हेंटमध्ये सुवर्णपदक पटकावणारे आरुष काळे आणि आयुष चर्डे हे विद्यार्थी आहेत.हे यश शाळेचे क्रीडा प्रशिक्षक पवन डोईफोडे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली संघाने मिळवले आहे.या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळेचे प्राचार्य सचिन दुर्गे आणि उपप्राचार्या सोनल निस्ताने तसेच सर्व शिक्षकांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे व प्रशिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### साऊर येथे श्रीमद्भागवत ज्ञानयज्ञ सप्ताहाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**टाकरखेडा संभू-** भातकुली तालुक्यातील साऊर येथे आयोजित श्रीमद्भागवत ज्ञानयज्ञ सप्ताह सध्या भक्तिमय वातावरणात सुरू आहे. या सप्ताहादरम्यान दररोज विविध धार्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून परिसरातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. ज्ञानयज्ञ सप्ताहातील प्रवचनात सुश्री स्नेहगंगाश्रीजी आळंदीकर यांनी कर्मयोगी संत गाडगेबाबांचा 'मुलांना शिक्षण द्या' हा अमूल्य संदेश प्रभावी शब्दांत मांडला. 'भुकेल्यांना अन्न द्या, तहानलेल्यांना पाणी द्या, गरिबांचे लग्न लावून द्या, अनाथांना आसरा द्या, बायकोला कमी भावाचे लुगडे घ्या; पण मुलांच्या शिक्षणात कधीही तडजोड करू नका.' विद्यार्थी जीवन कसे असावे आणि विद्यार्थ्यांनी आयुष्य कसे जगावे, हे भागवत कथेच्या माध्यमातून त्यांनी उलगडून सांगितले. मात्र पैसा नाही म्हणून दारू सोडणारा एकही सापडणार नाही, असे परखड प्रतिपादन करत सुश्री स्नेहगंगाश्रीजी यांनी उपस्थितांची मने हेलावून टाकली. शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे खरे साधन असल्याचे त्यांनी ठामपणे नमूद केले.या ज्ञानयज्ञ सप्ताहामुळे साऊर परिसरात भक्ती, संस्कार आणि विचारांची उर्जा निर्माण झाली असून भाविकांकडून कार्यक्रमाचे विशेष कौतुक केले.





### पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची अनाथ आश्रमाला सदिच्छा भेट

**अमरावती-** पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाच्या स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी नुकतीच तपोवन, अमरावती येथील लहान मुलींच्या सदाशांती बालगृह या अनाथ आश्रमाला सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी बालगृहातील मुलींशी मनमोकळा संवाद साधला. मुलींसोबत विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले, ज्यामुळे परिसरात आनंदी वातावरण निर्माण झाले. यावेळी विद्यार्थ्यांच्या वतीने मुलींना भेटवस्तू व अल्पोपहाराचे वितरण करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी बालगृहाच्या दैनंदिन कार्यपद्धतीचे आणि समाजोपयोगी कार्याचे जवळून अवलोकन केले.या कार्यक्रमास सदाशांती बालगृहाच्या व्यवस्थापिका सौ. सुचिता वैद्य उपस्थित होत्या. स्थापत्य अभियांत्रिकी विभागातून प्रा. डॉ. अनुप चिटकेश्वर, प्रा. चेतन बिडवाईक व प्रा. मनीष देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला विभागप्रमुख प्रा. डॉ. सचिन सराफ तसेच उप-प्राचार्य प्रा. डॉ. मोहम्मद जुहैर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, सहवेदना व जबाबदारीची भावना वृद्धिंगत झाली असून, समाजाशी नाते जोडण्याचा एक सकारात्मक अनुभव विद्यार्थ्यांना मिळाल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## निधन

### लक्ष्मणराव बादशे



**शिराळा -** नजिकच्या टेंभा येथील अनिल लक्ष्मणराव बादशे यांचे वडील लक्ष्मणराव डोमाजी बादशे यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी वृध्दापकाळाने निधन झाले त्यांच्या पश्चात तीन मुले व एक मुलगी असा आप्तपरिवार आहे. टेंभा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### उदयकुमार राऊत



**नांदगाव पेठ -** येथील प्रतिष्ठित नागरिक उदयकुमार तुळशीरामजी राऊत यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७६ वर्षे होते. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.उदयकुमार राऊत हे मनमिळावू, शांत स्वभावाचे आणि कुटुंबवत्सल व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. सामाजिक व कौटुंबिक जीवनात त्यांचा सक्रिय सहभाग होता. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा मोठा आप्त परिवार आहे.

# राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना पद वितरण

- आ.सुलभाताई खोडके व यश खोडके यांच्या हस्ते दिले नियुक्ती पत्र
- अध्यक्ष संकेत बोके यांच्या कार्यकारणीत ११ उपाध्यक्ष, ८ महासचिव, १८ सचिव



**अमरावती/का.प्र.**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितपवार गटातील राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस अमरावती जिल्हा ( शहर )च्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहे. अध्यक्ष संकेत बोके यांच्या कार्यकारणीत ११ उपाध्यक्ष तर ८ महासचिव व १८ सचिवांचा समावेश आहे नुकत्याच झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी परिवार मेळाव्यात आ.सुलभाताई संजय खोडके व युवा नेते यश खोडके यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.

ज्यामध्ये उपाध्यक्ष म्हणून अंकित दहीकर, मनीष पेठे, अनुराग बैराळे, ऋतुराज सावळे, मानस गवई, प्रथम निकम, श्रेयस इंगळे, ऋषी घाडगे, हिमांशू गुप्ता यांना नियुक्ती देण्यात आली. तसेच महासचिव पदाची जबाबदारी परा राऊत , स्वराज रोडे, प्रथम कांडलकर, प्रतीक बेलकर , अमन सोनोने , प्रज्वल टाले, सिद्धांत मोहोड आदित्य काळे यांच्यावर सोपविण्यात आली. त्यांना सुद्धा आमदार सौ.सुलभाताई खोडके व युवा नेते यश खोडके यांच्या हस्ते नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले. तसेच राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस च्या सचिवपदी ओम बिजागरे , प्रज्वल काळे , देवांश गाडेकर, शुभम नेवारे, सार्थक केने, नयन तसरे, श्रवण कदम, बादल काल्हेकर, अर्पित रंधवे, सुयोग वानखडे ,आयुष घोरमाडे , कार्तिक मानकर , अथर्व महल्ले,, मयूर सरोदे, कुंदन थोरात, ओम ओलीवकर, अनिकेत जाधव, गौरव आठवले यांची नियुक्तीकरून नियुक्त पत्र वितरण करण्यात आले.

तसेच प्रसिद्धी प्रमुख म्हणून वैभव वऱ्हाडे यांची नियुक्ती करण्यात आली. विद्यार्थीदशेमध्ये असतांना विद्यार्थ्यांना अनेक शैक्षणिक समस्यांना सामोरे जावे लागतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संघटीत राहून आपला शैक्षणिक ,सामाजिक , सांस्कृतिक विकास साधून अष्टपैलू व्यक्तिमत्व घडविण्यासाठी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस एक उत्तम संधी व व्यासपीठ असल्याचे मनोगत युवा नेते यश सुलभा संजय खोडके यांनी व्यक्त करून नवनियुक्त कार्यकारिणीला शुभेच्छा प्रदान केल्यात.

यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ( शहर ) ऋतुराज राऊत , राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे अध्यक्ष संकेत बोके, आदींसह राष्ट्रवादी परिवार व सहकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आल्याने सर्व सहकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# संत श्री काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवाला प्रारंभ

### विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन



**नांदगाव पेठ/वार्ताहर**

परमहंस संत श्री काशिनाथ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित भव्य धार्मिक महोत्सवाला आज २५ डिसेंबरपासून नांदगाव पेठ येथे भक्तिमय वातावरणात प्रारंभ होणार आहे. विदर्भासह संपूर्ण राज्यातून येणाऱ्या हजारो भाविकांच्या उपस्थितीने संतनगरी नांदगाव पेठ पुढील एक आठवडा श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माने न्हाऊन निघणार आहे.

स्थानिक नाफडे पेट्रोल पंपाजवळील संत श्री काशिनाथ बाबा धाम येथे हा पुण्यतिथी महोत्सव होत असून यंदा महोत्सवाचे विसावे वर्ष आहे. या पुण्यतिथी महोत्सवात भाविकांसाठी श्री शिव महापुराण कथेचे विशेष आयोजन करण्यात आले असून हभप श्री. शिवानंद महाराज शास्त्री आपल्या सुमधुर वाणीतील संगीतमय कथावाचनातून शिवभक्तांना मंत्रमुग्ध करणार आहेत. सप्ताहभर विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असल्याने भाविकांसाठी हा महोत्सव अध्यात्मिक पर्वणी ठरणार आहे.दैनंदिन कार्यक्रमानुसार पहाटे सकाळी ५.३० वाजता काकड आरती, सकाळी ८ वाजता बाबांची पूजा व आरती, त्यानंतर संत काशिनाथ बाबा सामूहिक चरित्र ग्रंथ पारायण होणार आहे. सकाळी ८.३० ते ११.३० या वेळेत श्री ज्ञानेश्वरी पारायण, ११.३० ते १२.३० दरम्यान हरीभजन होईल.दुपारी १ ते ५ या वेळेत हभप श्री. शिवानंद महाराज शास्त्री यांच्या संगीतमय शिव महापुराण कथेचे सुमधुर श्रवण होणार आहे. सायंकाळी हरिपाठ व सामुदायिक प्रार्थना तर रात्री हरिकीर्तन आयोजित करण्यात आले आहे.

# सावंगी मग्रापुर येथे श्रीमद् भागवत ज्ञानयज्ञाला सुरूवात

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

श्री संत रामदास महाराज पुण्यतिथी महोत्सव निमित्य श्री मारोती देवस्थान, सावंगी मग्रापुर येथे २४ डिसेंबर ते ३० डिसेंबर दरम्यान श्रीमद् भागवत ज्ञानयज्ञ (संगीत व दृष्यमय) सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असुन बुधवारपासून याला सुरूवात सुध्दा झाली आहे. या सप्ताहाचे भागवत कथा प्रवक्ते देवाशिवदास वैष्णव महाराज हे आहेत.

२४ डिसेंबर रोजी समग्र पूजा अर्चना विधी पार पडला. यानंतर कलश स्थापना हनुमानसिंह ठाकूर यांच्या शुभहस्ते झाली तर दुपारच्या वेळेस श्रीमद् भागवत ज्ञानयज्ञाची सुरुवात करण्यात आली. याची समाप्ती ३० डिसेंबर रोजी होणार आहे. या सप्ताहात दररोज सुश्राव्य भजने, हरिपाठ होणार आहे. तर २९ डिसेंबर रोजी सुंदर कांड होणार आहे. या सप्ताह दरम्यान विविध अन्नदात्यांकडून अन्नदान होणार आहे. याशिवाय शेवटच्या दिवशी ३१ डिसेंबर रोजी गोपालकाला कीर्तन व दुपारी भव्य महाप्रसादाचे आयोजन सुद्धा करण्यात आले आहे. या सप्ताहाचा परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन मारोती देवस्थान, सावंगी मग्रापूर व गावकरी मंडळी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### 'जीवनसाथी-सोयरीक' परिचय पुस्तिकेचे विमोचन

**अमरावती-** प्रत्येक समाजात उपवर वधू, पालक परिचय संमेलने दरवर्षी होतात. तथापी युवक युवती आणि पालकांच्या अवास्तव अपेक्षा मुळे योग्य वयात विवाह जुळत नाहीत यासाठी वर वधू कडील मंडळींनी तडजोड करून इगो टाळल्यास वैवाहिक जीवन सुखी होईल असे प्रतिपादन संमेलनाचे अध्यक्ष देवेंद्र ढोक यांनी केले. स्थानिक ज्योती सावित्री माळी विकास प्रतिष्ठान व फुलमाळी समाज महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय माळी समाजाचे परिचय महासंमेलन व्हीएमव्ही परिसरातील संगीतसूर्य केशवराव भोसले पार पडले.सदरील परिचय संमेलनात ज्योती विचार पिठावर उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते जीवनसाथी सोयरीक परिचय पुस्तिकेचे विमोचन थाटात पार पडले. उद्घाटक व सत्कारमूर्ती म्हणून सामाजिक कार्यकर्ते दिलीप घालणी उपस्थित राहतील.स्वागताध्यक्ष प्रकाश अटाळकर व शैलेश अमृते, तर प्रमुख अतिथी म्हणून अंकुशकुमार धर्माधिकारी, कल्याण काका आखाडे मान्यवर उपस्थित होते.

# घुईखेड येथील कमलाबाई टावरी इंग्लिश स्कूलमध्ये सांस्कृतिक महोत्सव

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**



कमलाबाई टावरी बहुउद्देशीय शिक्षण संस्था नागपूर द्वारा संचालित कमलाबाई ब. टावरी इंग्लिश स्कूल, घुईखेड येथे संस्थेचे माजी अध्यक्ष स्व. डॉ. बद्रीदास रामचंद्रजी टावरी (बाबूजी) यांच्या नियोजित वाढदिवसाच्या सांस्कृतिक महोत्सव पार पडला.

सदर सांस्कृतिक कार्यक्रम सकाळ सत्रा मध्ये (प्राथमिक वर्ग) आयोजित करण्यात आला. या कार्यक्रम करीता अध्यक्ष म्हणून रतन बगाडे (अमरावती) होते. तर प्रमुख अतिथी म्हणून चांदूर रेल्वेच्या राजर्षी शाहू कॉलेजचे प्राध्यापक डॉ. प्रवीण सरदार, संस्थेचे संचालक कृष्णकुमार टावरी, संस्थेचे उपाध्यक्ष प्रेमकुमार टावरी, संस्थेच्या सदस्या शारदा टावरी, स्नेह टावरी, शाळा प्रमुख रुपेश भोयर तथा उपमुख्याध्यापक सतिश वानखडे प्रामुख्याने उपस्थित होते. सदर कार्यक्रम शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश मिरासे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला होता व सहाय्यक शिक्षिका ऋतुजा भारती यांनी सदर कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. वर्ग नर्सरी ते वर्ग तिसरी च्या विद्यार्थी यांनी मोठ्या उत्साहात आपली समूह नृत्य सादर केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्ग नववी मधील विद्यार्थी क्रिष्णा भारती व वंशिका गावंडे यांनी केले. तर आभार प्रदर्शन सहाय्यक शिक्षिका स्मिता डखरे यांनी केले. सदर कार्यक्रम उत्कृष्ट होणे करीता सहाय्यक शिक्षिका लिना क्षीरसागर, मनिषा बनकर, राधा गुजरकार तथा माधुरी लाडे, शारीरिक शिक्षक अजिंक्य मदन यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. कार्यक्रम यशस्वीरित्या होणेकरीता शालेय कर्मचारी अतुल राजगुरे, हेमेंद्र भोयर, गोपाल मांडवेकर, बंडू गिरी यांनी मोलाची मदत केली.

# भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयात मोफत नाडी परीक्षण

**परतवाडा -** भारतीय विद्या मंदिर अमरावती द्वारा संचालित भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय परतवाडा येथील गृहअर्थशास्त्र विभाग आणि युनिव्हर्स इंडिया हेल्थकेअर नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नाडी परीक्षण या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर तसेच कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व मार्गदर्शक माननीय डॉ. स्वप्नील विसपुते उपस्थित होते. डॉक्टर स्वप्निल विसपुते यांनी विविध



आजाराविषयी माहिती दिली त्याचबरोबर दिवसेंदिवस वाढत चाललेले थायरॉईडचे प्रमाण मुलींमध्ये पीसीओडी चे प्रमाण स्त्रियांमध्ये वाढत असलेले गर्भाशयाचे आजार आणि त्यावरील उपाय याविषयी मार्गदर्शन केले, मनुष्याच्या शरीरामध्ये असणारे प्रत्येक अवयव आणि त्यावर उपचार कसे करायचे हेही समजावून सांगितले.

त्याचबरोबर विविध आजारावर कोणते व्यायाम करायचे याविषयी माहिती दिली. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. खांडेकर आरोग्य विषयी उत्कृष्ट मार्गदर्शन केल. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्राध्यापक शारदा निंभोरकर यांनी केले.

या प्रसंगी वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक रुंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते हा कार्यक्रम अतिशय आनंदात पार पडला.

# संत मारोती महाराज पुण्यतिथी महोत्सवात भागवत सप्ताह

लेहेगाव - नजीकच्या भिलापूर येथे वैराग्यमूर्ती संत मारोती महाराज यांचे पुण्यतिथी महोत्सवानिमित्त श्रीमत भागवत ग्रंथाचे आयोजन केले होते. संत मारोती महाराज पुण्यतिथी महोत्सवात दररोज ग्रामसफाई, प्रार्थना, हरिपाठ, भजने, कीर्तन, प्रवचने, यासारखे कार्यक्रम आयोजित केले असून शेवटचे दिवशी ह. भ. प. रवींद्र महाराज काळमेघ यांचे वाणीतून काल्याचे किर्तन होणार असून दुपारी महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित



केला आहे. तरी या कार्यक्रमाचा भाविक सदभक्तांनी लाभ घ्यावा असे आव्हान उत्सव समितीचे कार्यकर्ते अंबादासजी काळमेघ, जुगल किशोर टवाणी, अण्णासाहेब काळमेघ, रमेश काळमेघ, सुभाषराव काळमेघ, विकास अंबाडकर, सुधाकरराव भुयार, शरदराव काळमेघ,नरेंद्र बाटे यांनी केले असून समस्त ग्रामवासी व सदभक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा.

# मालोकार, पांडे, भुजाडे, कोचर परिवाराने केले नेत्रदान

**अमरावती -** विष्णू पांडुरंग पांडे (वय ८७), स्व. श्री. रमेश मारोतराव मालोकार (वय ७१), संजाब गुलाबराव भुजाडे (वय ७७),प्रकाशचंद्र चंपालाल कोचर (वय ७९) यांचे निधन झाले. कुटुंबातील व्यक्तीच्या निधनामुळे कुटुंबियांना दुःख होणे स्वाभाविक असते. परंतु अशाही परिस्तितीत गरजूंना या जगातील रंग पाहता येतील या उद्दात भावनेने परिवारातील सदस्यांनी विष्णू पांडुरंग पांडे, रमेश मारोतराव मालोकार, संजाब गुलाबराव भुजाडे, प्रकाशचंद्र चंपालाल कोचर यांचे नेत्रदान करण्याचा निर्णय घेतला. यासाठी त्यांनी अमरावती मधील दिशा ग्रुप व दिशा एज्युकेशन फाऊंडेशन द्वारा संचालित दिशा इंटरनॅशनल आय बँक या धर्मादाय नेत्रपेढीला संपर्क केला. दिशा ग्रुपचे सचिव स्वप्निल अरुण गावंडे, दिशा आय बँकेचे डेप्युटी मेडिकल डिरेक्टर डॉ. अंकित अनिल हरवानी, हिमांशू प्रमोद बंड, अनिल सदाशिवराव देशमुख, प्रणाली चांभारे यांनी मारनोतर नेत्रकमळ दान करून घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली.



# निम्न पेढी प्रकल्पातील नागरिकांना घरकुल मंजूर-जिल्हाधिकारी

**अमरावती/का.प्र.**

निम्न पेढी प्रकल्पात यावर्षीपासून पाणी साठविण्याची परवानगी देण्यात आली आहे. परिणामी गोपगव्हाण गावापर्यंत पाणी येणार आहे. त्यामुळे या गावातील स्थलांतरला वेग देण्यात आला आहे. त्यासाठी नागरिकांना राहण्यासाठी घरकुल मंजूर करण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज निम्न पेढी प्रकल्पाबाबत आढावा घेण्यात आला. बैठकीमध्ये जिल्हाधिकारी येरेकर यांनी हातुर्णा, गोपगव्हाण, कुंडखुर्द, अळणगाव, कुंड सर्जापूर या गावातील नागरिकांच्या स्थलांतरणाचा आढावा घेतला. नागरिकांनी पुनर्वसित गावात स्थलांतरण करावे, यासाठी त्यांना प्राधान्याने घरकुल मंजूर करण्यात येत आहे. यासाठी त्यांना घरकुलाचा पहिला हप्ता देण्यात येणार आहे. त्यासोबतच स्थलांतरासाठी दोन लाख रूपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. गावातील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत करण्यात येणार असून, विजेची समस्या निकाली काढण्यात येणार आहे. पाण्याचा प्रश्न असलेल्या गावात विंधनविहिरी घेण्यात येणार आहे. बुडीत क्षेत्रात जाणाऱ्या गावामधील स्थलांतराला वेग देण्यासाठी पुनर्वसित गावात प्रामुख्याने पाण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच पुनर्वसित गावात पायाभूत सुविधांसाठी ५७ कोटी रूपयांच्या कामाचे नियोजन करण्यात आले आहे.

ही कामे मंजुरीच्या प्रक्रियेत आहे. कुंड सर्जापूर येथील स्मशानभूमीच्या विकासासाठी निधी देण्यात आला आहे. जागाही ठरविण्यात आली असून येत्या काही दिवसात याठिकाणी कामे करण्यात येतील.

स्थलांतरण वेगाने व्हावे, यासाठी घरकुल मंजुरीचे पत्र आणि पहिला हप्ताही तातडीने देण्यात येणार आहे. तसेच स्थलांतरणाच्या भत्यासाठी नागरिकांचे अर्ज घेण्यात येणार आहे. यावेळी सरपंच यांनी पुनर्वसित गावात येणाऱ्या समस्यांची माहिती दिली.

### अतिक्रमण कारणावरून काठीने मारहाण

**चांदूर बाजार -** २३ डिसेंबरला पोलीस सूत्रांकडून नुकत्याच प्राप्त झालेल्या माहितीनुसार, चांदूरबाजार येथे अतिक्रमणाचा खोका हटविण्या करिता केलेल्या उपोषणाच्या कारणावरून झालेल्या भांडणात लाकडी काठीने मारून जखमी केल्याची घटना सायंकाळी साडेसहा वाजता च्या दरम्यान उघडकीस आली आहे. याबाबतीत संघदीप सुदामराव दांडगे यांनी चांदूरबाजार पोलीस स्टेशनला दाखल केलेल्या तक्रारीवरून चांदूरबाजार पोलिसांनी महिलांसहित चार जनावर गुन्हा दाखल करून तपासात घेतला आहे.

### कौशल्य स्पर्धेची पात्रता फेरी

**धारणी -** व्यावसायिक शिक्षण आणि जागतिक कौशल्य स्पर्धेच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून येथे जागतिक कौशल्य स्पर्धा विभागीय पात्रता फेरीचे आयोजन आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार भवन येथे ही स्पर्धा पार पडणार असून, जिल्हास्तरावर निवड झालेल्या उमेदवारांनी या विभागीय फेरीत आपले कौशल्य सादर करावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले.

# बनावट फोन-पे द्वारे सोनाराला गंडविणारे दोघे जेरबंद

**नागपूर आणि वाशिम जिल्ह्यातही केली फसवणुक**

**अमरावती/प्रतिनिधीः-** ऑनलाईन व्यवहाराचा बनाव करत सोन्याची अंगठी लंपास करणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगारांना अमरावती ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने वेळीच हेरून गजाआड केले. नकली फोन-पे ॲपचा वापर करून सोनाराची फसवणूक केल्याचा हा प्रकार असून आरोपींकडून १.३१ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अंजनगाव सुर्जी येथील गोपाळ नगर परिसरातील 'गुणगुण ज्वेलर्स' या दुकानात २३ डिसेंबर रोजी सायंकाळी दोन इसम सोन्याची अंगठी खरेदी करण्याच्या बहाण्याने आले. ३.३२० ग्रॅम वजनाच्या अंगठीची ४८,००४ किंमत ठरल्यानंतर आरोपींनी मोबाईलवर फोन-पेवरून



पैसे ट्रान्सफर झाल्याचा बनावट स्क्रीन दाखवलीं आणि क्षणार्धात दुचाकीवरून पलायन केले. काही वेळात खात्याची खात्री करताच पैसे जमा न झाल्याचे स्पष्ट झाल्याने सोनाराची फसवणूक झाल्याचे उघड झाले. घटनेची तक्रार अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात नोंदविल्यानंतर, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तातडीने तपासाचे आदेश दिले. तांत्रिक विश्लेषण, (पान २ वर)

## अमरावती मनपा निवडणूक :

# नामांकन प्रक्रियेच्या दुसऱ्या दिवशी ७९४ नामांकनाची उचल, एक दाखल

## आतापर्यंत एकूण १,८२० नामांकनांची उचल



**अमरावती/प्रतिनिधीः-** येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या अमरावती महानगरपालिका निवडणुकीसाठी नामांकन प्रक्रिया सुरू झाली आहे. या प्रक्रियेच्या दुसऱ्या दिवशी बुधवार, २४ डिसेंबर रोजी शहरातील २२ प्रभागांतील ४३९ इच्छुक उमेदवारांनी एकूण ७९४ नामांकन (पान २ वर)

# आंतरराज्यीय टोळीतील आरोपी अटकेत

## व्हॉट्सॲप लिंकद्वारे मोबाईल हॅक करून १६.५३ लाखांची फसवणूक

**अमरावती/प्रतिनिधीः-** व्हॉट्सॲप लिंकद्वारे मोबाईल हॅक करून १६.५३ लाखांची फसवणूक करणारा आंतरराज्यीय टोळीतील दुसरा आरोपी अमरावती शहर सायबर पोलिसांनी जेरबंद केला. आंतरराज्यीय टोळीतील आरोपी आशुतोष देवव्रत पांडे (वय २१, न्यु दिल्ली) आणि मृणाल उर्फ विक्रम पांडे (वय २६, झारखंड) अशी आरोपींची नावे आहेत.



त्यांनी व्हॉट्सॲपवर बनावट संदेश पाठवून एका व्यक्तीचा मोबाईल हॅक केला आणि १६,५३, (पान २ वर)

# 'माझी संकल्पना- सर्वोत्कृष्ट संकल्पना या आत्मविश्वासाने स्पर्धेत सहभागी व्हा' - कुलगुरू डॉ.मिलींद बारहाते

## जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६: विभागीय पात्रता फेरी उत्साहात





**अमरावती/प्रतिनिधीः-** जागतिक स्तरावर तरुणांच्या कौशल्यांना वाव देणाऱ्या आगामी 'जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६' साठी आयोजित करण्यात आलेली विभागीय पात्रता फेरी आज दि. २४ डिसेंबर २०२६ रोजी अत्यंत उत्साहात पार पडली. या स्पर्धेत विभागातील अनेक गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्यांचे प्रदर्शन केले. या माध्यमातून अमरावती विभागातील प्रतिभावान युवक-युवतींना आपली कौशल्ये जागतिक स्तरावर सिद्ध करण्याची आणि अमरावती विभागाचे नाव उंचावण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.

डॉ. श्रीकांत जिचकार सभागृह, (पान २ वर)

# गाडगेनगर उड्डानपुलाखाली अडकला कंटेनर

## गाडगेनगर-राठीनगर मार्ग ठप्प

### -रात्रीच्या सुमारास वाहतुक कोंडी

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील शिवाजी कॉलेज समोरून सुरुवात झालेल्या गाडगेनगर ते राठीनगर उड्डाणपुलाखाली मंगळवारी (दि.२३) रात्री अवजड कंटेनर अडकल्याने काही काळ परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. पुलाची उंची न लक्षात घेता कंटेनर पुढे नेल्याने वाहन थेट पुलाच्या संरचनेत अडकले आणि मुख्य मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली.

घटना घडताच मोठा आवाज झाल्याने आजूबाजूच्या परिसरातील नागरिक रस्त्यावर जमा झाले. कंटेनर पुलाखाली अडकल्यामुळे दोन्ही बाजूंनी वाहनांची लांबच लांब रांग लागली होती. दुचाकी, रिक्षा व चारचाकी वाहनचालकांना मार्ग बदलावा लागला, तर काही काळ संपूर्ण वाहतूक ठप्प अवस्थेत राहिली. घटनेची माहिती मिळताच गाडगेनगर (पान २ वर)

# बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचाराच्या निषेधार्थ आंदोलन

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** बांगलादेश येथे हिंदू समाजावर होत असलेल्या कथित अत्याचारांच्या निषेधार्थ यवतमाळ शहरात विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या वतीने बुधवारी (दि.२४ डिसेंबर) सायंकाळी दत्त चौकात तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलकांनी आतंकवाद्यांचा पुतळा दहन करून बांगलादेश सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

बांगलादेशमध्ये १८ डिसेंबरच्या रात्री हिंदू युवक दीपू



चंद्र दास याची हत्या करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. इस्लामचा अपमान केल्याचा आरोप त्याच्यावर करण्यात आला होता. या घटनेनंतर भारतासह विविध ठिकाणी या हत्येच्या निषेधार्थ आंदोलनांचा (पान २ वर)

# आरोग्याला धोका, भेसळयुक्त तेल बाजारात

## -संबंधित विभागाचे दुर्लक्ष

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** खाद्यतेल हे सर्रासपणे बाजारात भेसळयुक्त येत असल्याने जनतेच्या आरोग्याला धोका निर्माण होत असून या गंभीर प्रकाराकडे अन्न व औषध प्रशासन विभागाचे लक्ष नसल्याने सदर विभागा विषयी नागरिकात रोष निर्माण झाला.

बाजारात अनेक कंपनीच्या ब्रँडच्या तेलाचे डबे विक्रीला येत असून यामध्ये भेसळयुक्त तेलाची सुद्धा विक्री होत असून याचा परिणाम जनतेच्या आरोग्यावर होत असल्याचे नागरिक सांगत आहे. बाजारात विकल्या जाणाऱ्या भेसळयुक्त तेलाची तपासणी अन्न भेसळ विभागाकडून केल्या जात नसल्याने अशा तेलांची सर्रास विक्री होत असल्याची नागरिकात चर्चा आहे. विभागातर्फे बाजारामधून खाद्य तेलाचे नमुने तपासणी करिता पाठविणे अत्यंत गरजेचे असल्याचे नागरिक सांगत आहेत. अकोला मार्केट मधून खाद्य तेलाचे (पान २ वर)

# अंजनगाव शहरात दुषित पाणी पुरवठा

## -नागरिकांच्या आरोग्याशी खेळ

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** 'पाणी म्हणजे जीवन' असे म्हटले जाते, मात्र अंजनगाव सुर्जी शहरात हेच जीवन आज धोक्यात आले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत गेल्या काही दिवसांपासून शहराला पुरवठा करण्यात येणारे पाणी अक्षरशः गढूळ, चिखलयुक्त आणि दूषित स्वरूपाचे असून नागरिकांच्या आरोग्याशी सरळसरळ खेळ सुरू असल्याचा आरोप होत आहे. नळ उघडताच स्वच्छ पाण्याऐवजी मातीमिश्रित पाणी वाहू लागल्याने शहरवासीयांमध्ये तीव्र रोष उसळला आहे.

शहरातील बहुतांश भागांत हीच स्थिती असून पिण्यायोग्य पाण्याऐवजी रोगांचे आमंत्रण देणारे पाणी नागरिकांच्या नशिबी आले आहे. पाणी उकळूनही त्याचा रंग व वास जात नसल्याने अनेक कुटुंबांनी हे पाणी पिण्यास नकार दिला



आहे. परिणामी लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये पोटाचे विकार, (पान २ वर)

# एम.डी. विक्रीचा पर्दाफाश; ५७ ग्रॅम जप्त

## दोघे अटकेत, गुन्हे शाखेची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहरात अवैधरित्या मॅफेड्रॉन (एम.डी.) या अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या टोळीवर अमरावती शहर गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत दोघांना अटक केली आहे. आरोपींकडून ५७ ग्रॅम एम.डी. अंमली पदार्थासह एकूण ६ लाख १ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई २४ डिसेंबर रोजी फ्रेजरपुरा परिसरात करण्यात आली.

पोलीस आयुक्तांनी शहरातील अमली पदार्थ विक्रीविरोधात प्रभावी कारवाईचे आदेश दिल्यानंतर, पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त बातमीदाराच्या माहितीनुसार सापळा रचला. त्यानंतर , फ्रेजरपुरा हद्दीतील ऑक्सिजन पार्क येथे एम.डी. विक्रीच्या तयारीत उभे असलेले स्वदेश विरेंद्र कुमार (वय २६, रा. कैलास नगर) व शेख मोहसीन शेख सलीम (वय ३०, रा. हबीब नगर, (पान २ वर)

# जिल्हाभर एकाचवेळी ड्रगविरोधीत 'नाईट ऑपरेशन'

## ४६ बंद कारखाने, ३५ निर्जन स्थळांची तपासणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यात अमली पदार्थांची निर्मिती, साठवणूक आणि बेकायदेशीर व्यवहार रोखण्यासाठी पोलिसांनी रात्रीच्या वेळी जिल्हाभर व्यापक शोध मोहीम राबविली. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या आदेशान्वये २२ डिसेंबर रोजी एकाच वेळी संपूर्ण जिल्ह्यात विशेष 'नाईट ऑपरेशन' हाती घेण्यात आले.

या मोहिमेत सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी तसेच





स्थानिक गुन्हे शाखेची पाच विशेष पथके सहभागी झाली होती. मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ तैनात करून ग्रामीण व दुर्गम भागांसह औद्योगिक क्षेत्रे, बंद कारखाने, गोदामे, निर्जन शेड, बंद वसाहती आणि संवेदनशील ठिकाणी एकाच वेळी झडती कारवाया करण्यात आल्या. मोहीमेदरम्यान जिल्ह्यातील ४६ बंद कारखाने, ३५ निर्जन स्थळे, तसेच बंद असलेली फळ मंडी, सुतगिरण्या व साखर कारखाने आदी ठिकाणांची बारकाईने तपासणी करण्यात (पान २ वर)

# कु-हा ठाण्याच्या हद्दीत वृद्धेचा विनयभंग

**अमरावती/प्रतिनिधीः-** कु-हा पोलीस ठाणे हद्दीत एका वृद्ध महिलेचा विनयभंग झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पीडित वृद्धेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २२ डिसेंबर रोजी पीडित वृद्ध महिला गावाबाहेर शौचासाठी गेली होती. यावेळी आरोपीने पाठलाग करून तिला अडवले. त्यानंतर जबरदस्तीने तिला शेताच्या मेढावर नेऊन मारहाण करत विनयभंग केला. वृद्ध महिलेच्या किंकाळ्या ऐकून गावातील दोन युवक घटनास्थळी धावून आले असता आरोपीने तेथून पळ काढला. घटनेनंतर पीडित वृद्धेने कु-हा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपीविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदविला असून प्रकरणाचा तपास पोलीस करत आहेत. आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत.

# स्व.माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन

अमरावती/प्रतिनिधीः- स्व.माणिकराव घवळे स्मृती प्रतिष्ठान आणि डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने स्व.माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन सोमवार,दि.५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय अमरावती येथे करण्यात आले आहे.

शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सव निमित्ताने आयोजित ही स्पर्धा 'भारताच्या विकास प्रक्रियेत तरुणांचे प्रश्न दुर्लक्षित झाले आहेत' या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर रंगणार आहे. स्पर्धेत विषयाच्या अनुकूल व प्रतिकूल अशा दोन्ही बाजूंनी विचार मांडणारे महाविद्यालयीन संघ सहभागी होऊ शकणार आहेत.

स्पर्धेचे थेट प्रक्षेपण फेसबुक व युट्यूबच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. महाविद्यालयीन स्तरावरील प्रथम क्रमांकाच्या चमूला रु. ११,००१ रोख रक्कम व फिरता सुवर्ण चषक प्रदान करण्यात



येणार आहे. तसेच स्पर्धेतील विजेत्या वादविवादपटूंना रोख पारितोषिके, सन्मानचिन्हे व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येणार आहे.


वैयक्तिक पारितोषिकांमध्ये प्रथम क्रमांकासाठी रु. ७,००१ रोख, द्वितीय क्रमांकासाठी रु. ५,००१ रोख, तर तृतीय क्रमांकासाठी रु. ३,००१ रोख रक्कम तसेच सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

या स्पर्धेसाठी विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील नामवंत व अनुभवी वादविवादपटू परीक्षक म्हणून उपस्थित राहणार आहेत. अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ .वर्षा देशमुख तसेच आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.अधिक माहितीसाठी [illegible] घवळे,९३७०१०४२९३,डॉ. शितल बाबू तायडे – ९८२३९३८०८८,डॉ.अमित गावंडे – ९४२२३४३२९८ प्रा. रणजित देशमुख ९९६७६९८५८६,मयूर चौधरी – ७६७६०८०४००,रत्नाकर शिरसाट – ८८४९११३०३६ यांच्याशी संपर्क करावा असे संयोजकांच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# नांदरुन पाथरविरा ग्रामपंचायतच्या दुर्लक्षामुळे सांडपाणी रस्त्यावर

## ग्रामस्थाना नाहक त्रास

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यातील ९ सदस्य संख्या असलेल्या गट ग्रामपंचायत नांदरून पाथरविरा येथील नांदरून गावातील वॉर्ड नं ३ मधिल नाल्यांतील गाळ उपसा झाला नसल्याने सांडपाणी पूर्णता रस्त्यावरून वाहत आहे. त्यामुळे ग्रामस्थांना नाहक त्रास सहन करावा लागत असून याकडे



ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होत असल्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

जगतराव वानखडे यांच्या घरापासून ते संजय बगाडे यांच्या घरापर्यंत पूर्ण रस्त्यावरून सांडपाणी वाहत असल्याने रस्त्यावर घाणीचे साम्राज्य पसरले आहे. सांडपाण्याने गावातील मुख्य मार्ग घाणमय झाला आहे. गावातील काही रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण (पान २ वर)